Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुस्तानी-मराठी
शब्दकोश

"राष्ट्रभाषेची सर्वसामान्य व्याख्या नजरेपुढें ठेवूनच हा कोश तयार करण्यांत आला आहे.....आज राष्ट्रभाषेच्या अध्ययनाला सर्व दृष्टींनीं सुपयोगी पडेल असा कोश हाच आहे व याच हेतूनें याची किंमत अत्यंत स्वल्प ठेवली आहे."

—काका कालेलकर

अखिल महाराष्ट्र हिंदी प्रचार समिति
पुणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

by Arya Samaj Foundation Chennai and eGa



In Public Domain. Gurukul Kangri Collection, Ha

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

❀ ओ३म् ❀

पुस्तक-संख्या ९/५/९.३/५

पंजिका संख्या २११५०/५.३.२००२

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई महाशय ७ दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यह पुस्तक वितरित न की जाय
NOT TO BE ISSUED

सन्दर्भ ग्रन्थ
REFRENCE BOOK

Stock Verification-2024

Stock Verification-2024

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुस्तानी-मराठी

...KED 1973

संपादक-मंडळ

श्री **गो. प. नेने**, बी. अे. (बनारस हिन्दु विश्वविद्यालय)

प्रो. **तु. ना. देवरे**, अेम्. अे., अुर्दू व पर्शियन भाषांचे प्रोफेसर, वाडिया कॉलेज पुणें

श्री. **य. रा. दाते**, बी. अे., अेल्अेल्. बी., संपादक ज्ञानकोश व शब्दकोश पुणें

पं. श्री. **रामानंदजी शर्मा**, 'साहित्य-भूषण' (सं. वि. मं. काशी)

श्री. **कृ. ज. धर्माधिकारी**, बी. अे., मंत्री, अखिल महाराष्ट्र हिन्दी प्रचार समिति, पुणें



प्रथमावृत्ति] किंमत २ रुपये [सन १९३९

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संकेत-सूची

अ.—अरबी
अनु.—अनुकरणशब्द.
अव्य.—अव्यय.
अं.—अंग्रजी.
अुदा.—अुदाहरण.
क्रि. अ.—क्रियापद अकर्मक.
क्रिं. वि.—क्रियाविशेषण.
क्रि. स.—क्रियापद सकर्मक.
ग्री.—ग्रीक.
ची.—चिनी.
तु.—तुर्की.
दे.—देशज.
प.—पश्तो.
पु.—पुल्लिंग.
पोर्तु.—पोर्तुगीज
प्रत्य.—प्रत्यय.
फा.—फारशी.
बहु.—बहुवचन.
मु.—मुहावरा.
यौ.—यौगिक शब्द.
लॅ.—लॅटिन.
वि.—विशेषण.
सं.—संस्कृत.
सव.—सर्वनाम.
स्त्री.—स्त्रीलिंग.
स्पे.—स्पॅनिश.

मुद्रकः—**सदाशिव रामचंद्र सरदेसाअी**, बी.अे., अेल्अेल्.बी., नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत' छापखाना, ४१ बुधवार, पुणें २
प्रकाशकः—**कृ. ज. धर्माधिकारी**, मंत्री, **अखिल महाराष्ट्र हिंदी-प्रचार समिति**, ३७३ शनवार, पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुरस्कार

मुळाशीं असलेली दृष्टि

हा कोश अेका विशिष्ट दृष्टीनें लिहिला गेला आहे. देशामध्यें राष्ट्रभाषेचें महत्त्व लोकांना अधिकाधिक पटूं लागलें आहे. आंतर-प्रान्तीय व्यवहारासाठीं अेक स्वदेशी राष्ट्रभाषा असली पाहिजे व तिचें निदान कामचलाअू ज्ञान लहानथोर सर्वांनाच असलें पाहिजे याविषयीं आतां दुमत नाहीं.

ही गोष्ट सुद्धां आतां जवळ जवळ सर्वमान्य झाली आहे कीं, जर जनतेमध्यें जागृति आणावयाची आणि तिच्यांत स्वतःचा कारभार स्वतःच चालविण्याची शक्ति वाढवावयाची असेल तर लोकव्यवहार खालपासून वरपर्यंत त्या त्या प्रान्तांत त्या त्या प्रान्तीय भाषेंतूनच झाला पाहिजे. प्रत्येक प्रान्ताची संस्कृति भिन्न असते म्हणून नव्हे (धर्मभेद, जातिभेद, भाषाभेद अित्यादि भेद असूनहि स्वभाव, जीवनानुभव आणि जीवनदृष्टि या बाबतींत आपणां भारतीयांची संस्कृति स्थूल मानानें अेकच आहे आणि अेकच असणार), तर त्या त्या ठिकाणच्या जनतेच्या हृदयापर्यंत जाअून भिडून लोक-समुदायाच्या सर्व शक्ति जागृत करण्याचें सामर्थ्य त्या त्या प्रान्तीय भाषेंतच असतें म्हणून.

लोक-व्यवहार म्हटला म्हणजे त्यांत सार्वत्रिक आणि अुच्च शिक्षण आलें, राज्यकारभार आला, न्यायदान आलें आणि समाजाला स्वर्गांत किंवा नरकांत पोंहचवून देणारें वृत्तविवेचनहि आलें आणि या वृत्त-विवेचनाच्या हेलकाव्याप्रमाणें समर्थ किंवा दुर्बल होणारें राजकारण आणि त्यावर अवलंबून असलेला राज्यकारभारहि आला. या सर्व बाबतींत होतां होअील तों प्रान्तीय भाषांचाच अुपयोग झाला पाहिजे.

पण जर या अेका अखंड राष्ट्राचीं शकलें करून त्याचा नाश करावयाचा नसेल आणि आत्मघातकी प्रान्तीय संकीर्णता वाढवावयाची नसेल तर या प्रान्तीय समाजांनीं अेकमेकांपासून दूर न जातां, अेकमेकांची अीर्षा-द्वेष सोडून देअून जवळ आलें पाहिजे, परस्पर सहकार वाढविला पाहिजे आणि राष्ट्रैक्याचा अनुभव अुत्तरोत्तर पुष्ट केला पाहिजे.

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें करण्याचें अेक महत्त्वाचें साधन तें **'राष्ट्रभाषा'** होय.

ही राष्ट्रभाषा परदेशांतून आणून चालावयाची नाहीं, किंवा कृत्रिमपणें अेक अगदींच नवीन भाषाहि बनवितां यावयाची नाहीं. देशांतील अेखाद्या प्रतिष्ठित भाषेलाच ही पदवी देअून तिला वाढीस लावण्याचें कार्य सर्वांनीं यावच्छक्य केलें पाहिजे.

फार प्राचीन काळीं जेव्हां देशांतील निरनिराळ्या भागांत प्राकृत भाषा बोलल्या जात असत तेव्हां सर्व प्रान्तांना अेकत्र आणणारी आणि भारतीय संस्कृतीला परिपुष्ट करणारी अशी राष्ट्रीय भाषा म्हणजे संस्कृत होती. आज देखील मराठी, गुजराती, बंगाली, कानडी, तेलगू, तामिल, हिन्दी, अुर्दू या सर्व भाषांवर संस्कृतचा कमीअधिक प्रभाव दिसून येतो. पुढें कालांतरानें प्राकृत भाषांचा अपभ्रंश होअून त्यांतून निरनिराळ्या देशी भाषा निर्माण झाल्या आणि या देशी भाषांतून मुख्यतया धर्म, नीति, सदाचारविषयक आणि त्याबरोबर थोडेंबहुत ललित-वाङ्मय निर्माण होअूं लागलें. त्यांतल्या त्यांत साधुसंतांनीं आणि राजकारणी पुरुषांनीं अुत्तरेकडील हिन्दीचा विशेष पुरस्कार केला आणि राष्ट्रभाषेचें स्थान संस्कृत आणि पालीनंतर याच भाषेला मिळालें.

पठाण आणि मोंगल काळीं राज्यकर्त्यांनीं आपल्याबरोबर अरबी आणि फारसी या भाषा आणून पर्शियन दरबार सुरू केला, परंतु त्यांचा तो आग्रह चालूं शकला नाहीं. जरी त्यांचें राज्य झालें आणि कांहीं लोकांनीं त्यांचा धर्म स्वीकारला तरी लोकांना स्वभाषा सोडणें शक्य नव्हतें. यामुळें हिन्दी लोकांनीं राजकर्त्यांच्या अरबी, फारसी भाषेंतून यथेच्छ शब्द घेअून हिन्दींतूनच राज्यकर्त्यांशीं व्यवहार चालू केला. राज्यकर्त्यांनीं या नव्या भाषाशैलीला 'अुर्दू'–बाजारी किंवा छावणींतील भाषा–असें तुच्छतादर्शक नांव दिलें. परंतु देशांतील हिन्दुमुसलमानांनीं याच 'अुर्दू'ला प्रेमानें कमावून तिची साहित्य-शक्ति वाढविली आणि अशा रीतीनें अेकाच भाषेचे हिन्दी आणि अुर्दू असे दोन प्रवाह चालू झाले. अेकाच राष्ट्रांत आणि अेकाच समाजांत दोन भिन्न भिन्न शैली चालवणें सोपें नसतें. लोक आपआपसांत बोलूं लागले म्हणजे शब्दांची आणि वाक्-प्रचारांची देवघेव सुरू होतेच. हिन्दीनें स्वदेशीच राहण्याचा कितीहि आग्रह धरला तरी तींत अरबी-फारसीचे शब्द येणारच आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अुर्दूनें प्रयत्नपूर्वक देशी शब्द वगळून अरबी, फारसी शब्दांचीच रेलचेल करण्याचें ठरविलें तरी तिला आपला देशीपणा सोडून चालावयाचें नाहीं. त्या वेळच्या राज्यकर्त्यांना जनतेशीं देशी भाषांतून आपला संपर्क ठेवावा लागल्यामुळेंच तर अुर्दू राजमान्य झाली. असें सांगतात कीं, अुर्दूची अुत्पत्ति अुत्तर हिंदुस्थानांत झाली नसून दक्षिणेंतच तिचा प्रथम प्रादुर्भाव झाला.

कोणतीहि भाषा–मग ती लोकभाषा असो, सामान्य बोली असो, किंवा साहित्यिक भाषा असो–जनतेपासून जसजशी दूर जाते तसतसें तिचें सामर्थ्य क्षीण होत जातें. संस्कृत भाषा देववाणी बनली आणि स्वाभाविकपणें दिवंगत झाली. हिन्दी भाषा संस्कृतच्या आहारीं पडली त्या मानानें ती पंडित मंडळींच्या बाहेर दुर्बोध होअूं लागली. अुर्दूनें स्वतःचें देशीपण विसरून अरबी-फारसीचें अजीर्ण होअूं दिलें आणि मुसलमान समाजांत देखील ती भाषा समजेनाशी झाली. आजच्या सुशिक्षित समाजानें अिंग्रजीचा आश्रय केला आणि परिणामीं त्यांचा जनतेशीं संपर्क तुटला. ज्यांनीं ज्यांनीं लोकभाषेचा प्रान्तीय भाषांचा–पुरस्कार केला त्यांची त्यांची शक्ति वाढली. अँग्लो-अिंडियन लोकांनीं अिंग्रजीलाच स्वभाषा करण्याचा प्रयत्न केला, यामुळें देशांत त्यांचीं पाळेंमुळें रुजेनात. असा हा सार्वत्रिक नियम आहे.

तेव्हां अेकमात्र राष्ट्रीय नीति हीच होअूं शकते कीं, देशांत सर्वत्र ज्या ठिकाणीं जी प्रान्तीय भाषा असेल तिलाच महत्त्व दिलें पाहिजे आणि या प्रान्तीय भाषांनीं अेकमेकांशीं फटकून राहून सवतासुभा निर्माण न करतां अेकमेकींच्या जवळ येअून स्वतःची आणि राष्ट्राची शक्ति वाढविली पाहिजे. जर अेखादी भाषा निराळेपणा वाढवूं लागली तर अस्वस्थ होण्याचें कांहींच कारण नाहीं. कारण जी भाषा आपला निराळेपणा वाढवील तिला आपण अशक्त झाल्याचा आणि आपली लोक-संपर्क शक्ति नष्ट झाल्याचा अनुभव आपोआपच येअील. लोकशाहीच्या दिवसांत भाषा सर्वसुलभ आणि सर्वसंग्राहक झाल्यावांचून राहतच नाहीं. तेव्हां काल-बलानेंच जी गोष्ट घडून येणार आहे तिच्यासाठीं वृथा आक्रोश करण्यांत फायदा तो काय ?

आंतरप्रान्तीय व्यवहारासाठीं जी राष्ट्रभाषा वापरावयाची ती सर्वसुलभ, सर्वसंग्राहक आणि परस्परानुकूल असलीच पाहिजे. ज्याला म्हणून निर-निराळ्या प्रान्तांतील जनतेपर्यंत पोहोंचावयाचें असेल त्याला जनतेला सुपरि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित अशीच भाषा बोलली पाहिजे. साहित्यिक लोक आपल्या मनोविनोदनासाठीं संस्कृतनिष्ठ स्वभाषा वापरोत किंवा संस्कृतच वापरोत, अरबी-फारसीनिष्ठ उर्दू वापरोत किंवा प्रत्यक्ष अरबी-फारसीच वापरोत, त्यांना कोणीहि मना करीत नाहीं. भाषांचीं हीं रूपें राहणारच. पण जे कोणी लोकसुलभ, सर्वसंग्रहकारी आणि परस्परानुकूल भाषा वापरतील त्यांचाच प्रभाव जनतेवर पडणार आहे.

आपण सर्व बाजूंचा विचार करून 'अुत्तर हिन्दुस्थानांतील शहरांत आणि खेडेंगांवांत हिन्दु-मुसलमानादि सर्व लोक जी भाषा बोलतात किंवा समजतात त्या भाषेला' राष्ट्रभाषा म्हणून स्वीकारलें आहे. आतां हिला पूर्णपणें राष्ट्रीय करण्यासाठीं तिचा प्रचार सर्व देशभर करावयाचा आहे. या भाषेला जर खरोखरच राष्ट्रसुलभ आणि राष्ट्रप्रिय करावयाचें असेल तर हिच्या प्रचाराचें काम अुत्तर हिन्दुस्थानांतील साहित्यिक लोकांच्या हातींच न ठेवतां भिन्न भिन्न प्रान्तांतील राष्ट्रभाषाप्रेमी राष्ट्रसेवकांच्या सहकारानेंच हें काम झालें पाहिजे आणि राष्ट्रभाषेचें स्वरूप ठरवितांना प्रान्तीय भाषा बोलणाऱ्या लोकांना तें सोपें जाअील याचीहि काळजी घेतली पाहिजे. सर्वप्रान्तीय भाषांतून जे देशी शब्द समान आहेत (यांत अरबी, फारसी शब्दांचाहि समावेश होतो) त्यांना स्वाभाविकपणें राष्ट्रीय रूप येणारच. अशा सर्वसमान शब्दांच्या जोरावरच राष्ट्रीय भाषा राष्ट्रप्रिय आणि राष्ट्रसुलभ होअूं शकेल. राष्ट्रभाषा जरी शिक्षणाच्या द्वारा सार्वत्रिक करतां आली तरी तिचें स्वरूप जितकें लोकसुलभ असेल त्या मानानेंच जनतेमध्यें तिचा प्रचार होणार. जनतेंतील स्थितिस्थापकता (Inertia) व परिश्रमविमुखता ही देखील अेक शक्ति आहे. तिला विसरून चालावयाचें नाहीं. लोकसत्तेच्या दिवसांत हा अनुभव प्रत्येक सुधारकाला येतोच.

प्रस्तुत कोश अेवढी व्यापक दृष्टि बाळगून तयार केलेला नाहीं. राष्ट्रभाषेचा संपूर्ण कोश बनविण्याची महत्त्वाकांक्षा देखील येथें बाळगलेली नाहीं. यांत सांपडतील तेच शब्द राष्ट्रभाषेंत प्रधानपणें वापरले पाहिजेत असेंहि नाहीं. मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व प्रकारच्या लोकांना राष्ट्रभाषा शिकत असतां अडणारे शब्द देण्याचें धोरण येथें मुख्य आहे. तेव्हां अर्थातच जे शब्द मराठीला आणि राष्ट्रभाषेला समान आहेत (आणि अशांची संख्या थोडी-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थोडकी नाहीं) असे शब्द येथें देऊन कोशाचा आकार वाढविला नाहीं. अरबी-फारसी शब्दांत देखील जे शब्द राष्ट्रभाषेंत रूढ झाले आहेत अथवा जे शब्द अुत्तर हिन्दुस्थानांतील कांहीं लोकांच्या बोलण्या-लिहिण्यांत विशेष येतात ते शब्दच येथें प्रामुख्यानें दिले आहेत. कारण कोशाचा अुद्देशच महाराष्ट्रीयांची सोय हा आहे.

महाराष्ट्रीयांमध्यें संस्कृत भाषा न शिकलेल्या व अुच्च प्रगल्भ साहित्य न वाचणाऱ्या लोकांचाहि अंतर्भाव होतो. मराठी भाषा बोलणारे पारशी, ख्रिस्ती, यहुदी, मुसलमान हेहि महाराष्ट्रीयच होत. यांच्या सोयीसाठीं राष्ट्रभाषेमध्यें वारंवार येणारे संस्कृत कुटुंबांतील देशी शब्द मराठीला परिचित असूनहि येथें देणें आवश्यक समजून तसें केलें आहे.

संस्कृतिदृष्ट्या हिन्दीच्या अध्ययनांत अेक महत्त्वाचा हेतु लोकांच्या पुढें असतो. तुलसीदास, सूरदास, कबीर यांसारख्या कवींचें अध्ययन केवळ राष्ट्रीयदृष्ट्या नव्हे तर संस्कृतीच्या व जीवनाच्या समाधानाच्या दृष्टीनें देखील अत्यंत पोषक आणि अुन्नतिकारक आहे; म्हणून हा शब्दकोश तयार करीत असतांना या कवींच्या कवनांतून अडणारे शब्द मुद्दाम घेतले आहेत. असे जनतेच्या गाढ परिचयाचे पण सध्यांच्या भाषेंत प्रयोगांत न येणारे शब्द ओळखतां यावेत म्हणून ते तारकांकित केले आहेत.

राष्ट्रभाषेच्या प्रचारासाठीं प्रयाग, वर्धा आणि मद्रास या तिन्ही ठिकाणीं जे अभ्यासक्रम चालविले जातात आणि जीं पाठ्य पुस्तकें नेमलीं जातात त्यांमधून येणारे बहुतेक सर्व शब्द या कोशांत आलेच पाहिजेत असा आग्रह धरूनच शब्दसंग्रह केलेला आहे.

अशा रीतीनें हा कोश मराठी बोलणाऱ्यांची सर्व बाजूंनीं सोय करण्याच्या अुद्देशानें होतां होईल तों सोपा करण्याचा प्रयत्न झाला आहे.

आपल्या या विचित्र देशांत भाषेच्या नांवासंबंधानें देखील ओढाताण होते ही अेक आश्चर्याची गोष्ट आहे. राष्ट्रभाषेची व्याख्या जी महात्मा गांधींनीं अिन्दूरला हिन्दी साहित्य-सम्मेलनाच्या अध्यक्षपदावरून राष्ट्रापुढें मांडली ती सर्वांनाच सारखी मान्य झाली आहे. तीविषयीं कोठें दुमत नाहीं. असें असूनहि नांवासंबंधानें बरीच ओढाताण चालली आहे. हिन्दी, हिन्दुस्थानी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि अुर्दू हीं नांवें आपल्या भाषेला मुसलमानांनींच दिलीं. हिन्दी हें अरबी रूप आहे, हिन्दुस्तानी हें फारसी. काँग्रेसनें आपल्या कानपूरच्या ठरावांत राष्ट्रभाषेला हिन्दुस्तानी म्हटलें यामुळें काँग्रेस सरकारला तेंच नांव सर्वत्र वापरणें आवश्यक वाटतें. आपणांला दोन्ही नांवें सारखींच प्रिय आहेत. दोहोंमध्यें ती भाषा भारतवर्षाची आहे हें अगदीं स्पष्ट होतें. नांवाच्या झगड्यामुळें कोशाची अुपयुक्तता कमी होअूं नये म्हणून याचें नांव 'हिन्दुस्तानी-मराठी शब्दकोश' असें ठेवलें असून राष्ट्रभाषेची सर्वमान्य व्याख्या नजरेपुढें ठेअूनच हा कोश तयार करण्यांत आला आहे.

महाराष्ट्रांतील सर्व शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना हा कोश अुपयोगी होअील असा विश्वास वाटतो.

या कोशांत वापरलेल्या अक्षरांसंबंधानें दोन शब्द सांगणें आवश्यक आहे. हिन्दी साहित्यसंमेलनानें महाराष्ट्र साहित्य संमेलनाप्रमाणेंच लिपिसुधारणेचा विचार केलेला आहे आणि आनंदाची गोष्ट ही कीं, या बाबतींत दोन्ही संमेलनांचें जवळ जवळ अेकमत आहे. नागरी लिपि वापरणाऱ्या दोन्ही भाषांच्या साहित्यिक संस्थांचें अेकमत झाल्यानंतर या सुधारणांचा अंमल शक्य तोंवर सर्वत्र झाला पाहिजे. हिन्दी आणि मराठी या दोन्ही भाषांच्या नागरी लिपींत थोडासा फरक आहे. अ, ण, झ व अ, ण, झ मधील फरक सहज ध्यानांत येतो. श, ल, ज्ञ व श, ल, क्ष या अक्षरांत देखील थोडासा फरक आहेच. या बाबतींत मराठी आणि हिन्दी या दोन्ही साहित्यसंस्थांच्या प्रतिनिधींनीं बसून देवाण-घेवाणीच्या नात्यानें नव्हे तर लिपिसुधारणेच्या शुद्ध दृष्टीनें अुभयमान्य असे कांहीं फेरफार सुचविले आहेत. त्यांत अ, ण, झ, क्ष वगैरे अक्षरें आणि अंक हिन्दीनें मराठीचे पसंत केले आणि मराठीनें शेवटीं काना येतो म्हणून हिन्दीचा ल पसंत केला. श पेक्षां श लिहावयास सोपा म्हणून तोहि पसंत केला.

मुख्य सुधारणा केली ती स्वरांच्या बाबतींत. व्यंजनांच्या बाराखडीला जशीं स्वरचिन्हें लागतात तशीं चिन्हें 'अ' ला लावून सर्व स्वर व्यक्त केले असतां साक्षरताग्रहण बरेंच सोपें होतें. यासाठीं तींच स्वरूपें सर्रास स्वीकारलीं आहेत. या रूपांना 'अ'ची बाराखडी असें म्हणण्याचा प्रघात रूढ होअूं लागला आहे. पण ही भाषा अशास्त्रीय आहे. व्यंजनांत मागून स्वर मिसळले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणजेच बाराखडी होऊं शकते. 'ऑ' हा स्वर 'अ'ची विकृति होऊन तयार झालेला नाहीं. दोनतीन गोष्टी अत्यावश्यक असूनहि त्या येथें आणतां आल्या नाहींत. पण जी अल्पशी सुधारणा केली आहे तिला वाचकांची दृष्टि सरावली म्हणजे पुढचें पाऊल टाकणें अधिक सोपें जाऊल असा भरंवसा वाटतो. लिपिसुधारणेच्या मुळाशीं जनतेला–हजारों वर्षें निरक्षर असलेल्या जनतेला–साक्षर करण्याचें भगीरथ काम शक्य तितकें सोपें करावें आणि सर्वत्र ही सुधारलेली नागरीच अेकरूपानें वापरली जावी हा मुख्य अुद्देश आहे. मुद्रण जितकें सोपें होअील तितका साहित्यप्रचार स्वस्त करतां येअील हीहि दृष्टि आहेच. लिपींच्या चढाओढींत आज नागरी लिपि सुरक्षित नाहीं, तिची आवश्यक सुधारणा करूनच तिचें रक्षण करतां येअील ही गोष्ट लोकांना जितकी पटेल तितकी चांगली.

मोठमोठ्या संस्थांतून जशीं कामें केलीं जातात तशा पद्धतीनें जर हा कोश केला असता तर अितका सुटसुटीतहि झाला नसता व अितक्या थोड्या खर्चांत आणि अितक्या लवकरहि झाला नसता. या कोशाचें सर्व श्रेय श्री. नाना धर्माधिकारी यांना आहे. त्यांनींच अुत्साहानें हें काम हातीं घेतलें. श्री. गोपाळराव नेने (बी. अे., बनारस हिन्दु विश्वविद्यालय) व प्रो. देवरे, अेम्. अे., यांची मदत मिळविली. अेवढेंच नव्हे तर श्री. यशवंतराव दात्यांसारख्या कोशकार्यांत नाणावलेल्या सेवकांचा सहकार मिळविला व हें काम संकल्पित अवधीमध्यें पुरें केलें. श्री. गोपाळराव नेने हें महाराष्ट्रीय तरुण बनारसचेच रहिवाशी आहेत व हिन्दी भाषेशीं त्यांचा मातृभाषेसारखा परिचय असल्यामुळें हिन्दी शब्दांचे यथोचित अर्थ ठरवितांना अुत्तर हिन्दुस्थानांत प्रत्यक्ष राहिल्यामुळें त्यांचा अनुभव फार अुपयोगी पडला. श्री. तु. ना. देवरे हे स्थानिक कॉलेजांत अुर्दू व फारसीचे प्रोफेसर आहेत; अरबी-फारसी शब्दांची पसंती करण्यांत आणि अर्थनिर्णय करण्यांत त्यांचा विशेष अुपयोग झाला.

वर्ध्याच्या राष्ट्रभाषाप्रचारसमितीला या कोशनिर्मितीच्या कामीं प्रत्यक्ष आर्थिक मदत करणें शक्य नव्हतें, तरीहि त्या समितीनें श्री. रामानंद शर्मा यांची मदत तीन महिन्यांसाठीं देअून या कोशाच्या कामीं हातभार लावला आहे. प्राचीन साहित्यांतील शब्दांची पसंती आणि अर्थनिश्चिति करण्यांत शर्माजींचा विशेष अुपयोग झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मला वाटतें, कोश तयार करण्यासारखें चिकाटीचें काम तरुणांनीं स्वतःच्या हिमतीवर हातीं घेऊन सहकार्यानें पार पाडल्याचें हें पहिलेंच अुदाहरण असेल.

या कोशांत सुधारणेला पुष्कळ वाव आहे यांत शंका नाहीं. पण त्यावरोबर वाचकांनीं हीहि खात्री बाळगावी कीं, आज राष्ट्रभाषेच्या अध्ययनाला सर्व दृष्टींनीं अुपयोगी पडेल असा कोश हाच आहे व याच हेतूनें याची किंमतहि अत्यंत स्वस्त ठेवली आहे. सुटसुटीत असल्यामुळें प्रवासांत देखील बरोबर बाळगण्याला हा सोयीचा झाला आहे. सामान्यपणें वापरल्या जाणाऱ्या राष्ट्रभाषेंत येणारा शब्द या कोशांत सांपडणार नाहीं असें होणार नाहीं. तरीहि अेखादा शब्द नच मिळाला तर आपल्या पुस्तकांत योग्य स्थळीं किंवा पुस्तकाच्या शेवटीं तो लिहून ठेवावा आणि अशा शब्दांची अेक यादी तयार करून ती कोशकारांचेकडे पाठवून द्यावी. कोशासारखीं कामें चौकस वाचकांच्या मदतीनेंच शेवटीं संपूर्ण होअूं शकतात.

कोणत्याहि कृतीचा अुपयोग मूळ अुद्देशाहून अधिक होत नाहीं असें थोडेंच आहे! प्रस्तुत कोश महाराष्ट्रीयांना हिन्दी शिकतांना अुपयोगी असावा अेवढाच जरी अुद्देश असला तरी हिन्दीवाल्यांना किंवा हिन्दुस्तानी भाषा नव्यानें जाणणाऱ्या लोकांना पर्यायवाची मराठी शब्द हवा असल्यास हा कोश त्यांना फारच अुपयोगी होअील.

महाशिवरात्र
ता. १७-२-१९३९

काका कालेलकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रचना-परिचय

राष्ट्रभाषेचा वाढता प्रचार व लोकांची तात्कालिक गरज या दोन गोष्टी प्रामुख्यानें लक्षांत घेऊन प्रस्तुत कोशाचें स्वरूप निश्चित करण्यांत आलें. कोश आटोपशीर व स्वस्त तर असावा, शिवाय राष्ट्रभाषेच्या अभ्यासकांस कोणत्याहि प्रकारची अडचण भासूं नये म्हणून कोशरचनेच्या बाबतींत कांहीं सिद्धांत ठरवून नंतर शब्दांची निवड करण्यांत आली आहे, ही गोष्ट नमूद करणें अवश्य आहे.

कोशांत संस्कृत तत्सम शब्द, त्याचप्रमाणें राष्ट्रभाषा व मराठी या दोन्हींत समान व अेकाच अर्थानें रूढ असलेले शब्द वगळले आहेत. परंतु हिंदींत व मराठींत सामान्य असलेल्या ज्या शब्दांच्या अर्थांत व लिंगांत भेद आहे अशा शब्दांचा येथें मुद्दाम अंतर्भाव केला आहे. अुदाहरणार्थ, 'चेष्टा', 'अुपाधि' या हिंदी शब्दांचे अर्थ मराठीपेक्षां निराळे म्हणजे 'प्रयत्न' व 'पदवी' असे आहेत; तसेंच 'आत्मा' व 'देह' यांचें लिंग मराठीपेक्षां निराळें म्हणजे स्त्रीलिंग आहे. म्हणून हे शब्द घेतले आहेत. शिवाय कांहीं तत्सम शब्द राष्ट्रभाषेंत अत्यंत रूढ झाले असल्यानें नित्याच्या व्यवहारांत अुपयोगिले जातात. त्यांनाहि कोशांत स्थान देणें अपरिहार्य होतें म्हणून तसें केलें आहे.

हिंदुस्थानांत राष्ट्रभाषा-भाषीयांचा प्रांत विस्तृत असल्यानें त्यांच्या भाषेंत प्रांतिक भाषांतून व स्थानिक बोलींतून आलेले अनेक शब्द राष्ट्रभाषेचे सर्वमान्य शब्द आहेत अशी पुष्कळांची समजूत झाल्यासारखी दिसते. श्री. प्रेमचंदादि लेखकांच्या लिखाणांतून अेखाद्या स्थानाचें किंवा परिस्थितीचें चित्र वाचकांच्या नजरेसमोर अुभें राहावें म्हणून वर्ण्य स्थानाच्या बोलींतील शब्दांचाहि अुपयोग केलेला आपण पाहतों. अशा रीतीनें अुपयोगिल्या जाणाऱ्या स्थानीय बोलींतील शब्दांपैकीं कांहीं शब्द कालान्तरानें भाषेंतील सर्वमान्य शब्द म्हणून रूढ होतात व अशाच सर्वमान्य रूढ शब्दांचा दक्षतेनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवाडा करून राष्ट्रभाषेच्या या कोशांत त्यांना स्थान देण्यांत आलें आहे. प्रेमचंदादिकांनीं असे बोलींतील पुष्कळ शब्द वापरले म्हणून ते सर्वच्या सर्व प्रचलित व सर्वमान्य आहेत व त्यांचा राष्ट्रभाषेंत अुपयोग करण्यास हरकत नाहीं अशी समजूत करणें चुकीचें आहे.

हिंदींतील तुलसीदास, सूरदास व कबीर या प्राचीन कवींच्या काव्यांत, अर्वाचीन हिंदीचे प्रातिनिधिक लेखक श्री. प्रेमचंद यांचे ग्रन्थांत, वर्तमानपत्रें व मासिकें अित्यादींत सामान्यतः अुपयोजिल्या जाणाऱ्या तसेंच राजकारण, प्रवास, व्यापार, बाजार, सभा अित्यादि जीवनांतील विविध क्षेत्रांत प्रचलित असलेल्या शब्दांचा संग्रह या कोशांत केला आहे. याशिवाय राष्ट्रभाषाप्रचार-परीक्षांच्या क्रमिक पुस्तकांतील बहुतेक सर्व कठीण शब्दांचा संग्रह या कोशांत केलेला असून राष्ट्रभाषेंत अगदीं रूळून गेलेले असे आवश्यक अरबी, फारसी किंवा तद्भव शब्द येथें संगृहीत केले आहेत.

प्रस्तुत कोश आटोपशीर असला तरी तो शास्त्रीय असावा असा निर्णय कोशाच्या सुरुवातीपासूनच केला होता, त्याला अनुसरून शब्द ज्या मूळ भाषेंतून राष्ट्रभाषेंत आला किंवा आपलें मूळ रूप टाकून देअून व्युत्पत्ति लावणें देखील कठीण होअील अितक्या विकृत रूपांत भाषेंत रूळला त्याची व्युत्पत्ति निर्दिष्ट करण्यांत आली आहे. शब्दांची व्युत्पत्ति देतांना मूळ भाषेंतील शब्द व त्या शब्दास जोडलेला तद्भाषीय अथवा अन्यभाषीय प्रत्यय अित्यादि गोष्टी सविस्तरपणें देणें वांछनीय असलें तरी या संक्षिप्त कोशांत तसें करणें शक्य नव्हतें. तसें केलें असतें तर थोडक्या किंमतींत जास्तींत जास्त अुपयुक्त असा शास्त्रीय कोश लोकांच्या हातीं देणें न परवडल्यानें राष्ट्रभाषेच्या प्रचारकार्याचा मूळ हेतु मागें पडला असता. कोणतेंहि कार्य करतांना त्याचा पाया शास्त्रशुद्ध असावा व परिमित साधनांतच घडेल तितकी अधिकाधिक लोकसेवा करावी या दोन गोष्टी डोळ्यांपुढें ठेवून कोशांत शब्दांची व्युत्पत्ति दिग्दर्शित केली आहे. दुसरी अेक ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट अशी आहे कीं, हिंदींतील अनेक शब्द संस्कृत व फारसी यांच्या मिश्रणामुळें बनले आहेत. संस्कृत व फारसी या दोन्ही भाषा अेकाच मातेच्या अुदरांतून जन्मलेल्या दोन सख्ख्या बहिणी आहेत ही गोष्ट भाषाशास्त्रानें सिद्ध केली आहे. फारशींतील अनेक प्रचलित

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शब्दांचें मूळ पाहतां तें संस्कृतोत्पन्न आहे ही गोष्ट देखील अलीकडे सिद्ध होत चालली आहे. या मुद्याच्या स्पष्टीकरणाकरितां खालीं कांहीं शब्द दिले आहेत.

संस्कृत	फारसी	संस्कृत	फारसी
ग्रीष्म	गरमी	पंच	पंज
मास	माह	आप	आब
श्वेत	सफ़ेद	सप्त	हफ्त
गो	गाव	शर्करा	शकर
चतुः	चहार, चार	अश्रु	अश्क़
• जामाता	दामाद	अश्व	अस्प

हिंदी भाषेंत रूढ झालेले अनेक फारसी शब्द संस्कृतोत्पन्न असले तरी वास्तविक पाहतां असे कित्येक शब्द प्रत्यक्ष संस्कृतमधून हिन्दींत आलेले नसून फारशी भाषेचे द्वारा हिंदींत रूढ झालेले आहेत. कित्येक शब्द बाह्यतः सारखे किंवहुना अेकच असले तरी भाषाभेदामुळें त्यांच्या अर्थांत दोन ध्रुवांअितकें महदन्तर आहे. संस्कृतांतील 'देव' शब्दाचा अर्थ 'सुर' असा आहे, तर अगदीं त्या अुलट फारशींतील 'देव' चे अर्थ 'दैत्य' व 'धष्टपुष्ट माणूस' असे आहेत. फारशींतील 'पलंग' या शब्दाचा अर्थ 'हिंस्र पशु व वाघ' असा आहे. मराठीप्रमाणें हिंदींत देखील फारशींतील 'खाना', 'पोश' आदि शब्द दुसऱ्या शब्दांना जोडल्यामुळें यौगिक शब्द निर्माण होअून ते रूढ झाले आहेत. अुदा. 'पलंगपोश' हा यौगिक शब्द 'पर्यंक' पासून झालेल्या संस्कृतोत्पन्न 'पलंग' व 'पोश' या फारशी शब्दापासून बनलेला आहे. तसेंच 'हाथीखाना' हा शब्द संस्कृत व फारशी शब्दांचें मिश्रण होय.

शब्दांची व्युत्पत्ति कसोशीनें व शास्त्रशुद्ध रीतीनें देअून रूपभेद व अर्थभेद यांमुळें शब्दांच्या अर्थांच्या बाबतींत कोणत्याहि प्रकारचा गोंधळ होण्यास वाचकांच्या मनांत जागा राहूं नये असा प्रयत्न करण्यांत आला आहे.

शब्दांचे अर्थ देतांना शब्दास केवळ प्रतिशब्द ठेवून दिलेले नाहींत. अेका भाषेच्या प्रत्येक शब्दाकरितां दुसऱ्या भाषेंत तसाच तंतोतंत अर्थवाहक शब्द नेहमीं मिळतोच असें नाहीं, तथापि शब्दांचा अर्थ देतांना रूपसाम्य व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्थसाम्य दर्शविण्याच्या दृष्टीनें अगदीं तत्सदृश असा पर्यायवाची मराठी शब्द देण्याची खबरदारी घेण्यांत आली आहे. शिवाय शब्दांचे लाक्षणिक, व्यंग्य व रूढ असे निरनिराळ्या अर्थानें प्रयोग होतात त्या दृष्टीनें त्यांच निरनिराळे अर्थ आंकडे घालून अलग अलग दिले आहेत.

अर्थाच्या अधिक स्पष्टीकरणाकरितां प्रत्येक प्रमुख अर्थवाहक शब्दाला जोडून पूरक शब्द दिलेले आहेत. शब्दांचे कित्येक अर्थ नेहमींच्या व्यवहारांत रूढ नसून विशिष्ट ठिकाणीं विशिष्ट मतलबानें वापरले जातात. या बाबतींत व्यवहारांत होणाऱ्या चलनानुसार शब्दार्थांचा क्रम ठेवण्यांत आला आहे.

अेकाच शब्दापासून किंवा धातूपासून अुत्पन्न झालेले पण व्याकरण वा स्वरूपभेदामुळें निराळे झालेले शब्द व त्यांचे अर्थ त्या त्या मुख्य शब्दाच्या पोटांत दिले आहेत. तसेंच यौगिक शब्द व 'वाक्-प्रचार' (मुहावरे) त्या त्या शब्दांच्या पोटांत भिन्न टाअिपांत घातले आहेत. हिंदींतील प्रयोजक क्रियापदांच्या बाबतींत घोटाळा अुत्पन्न होअूं नये म्हणून तीं क्रियापदें स्वतंत्र घेण्यांत आलीं आहेत. हिंदींतील प्रयोजक क्रियापदांचीं रूपें दोन प्रकारचीं असतात. जसें, 'लिखना' पासून 'लिखाना, लिखवाना', 'पढ़ना' पासून 'पढ़ाना, पढवाना' अित्यादि. त्यांच्या अर्थांतहि सूक्ष्म फरक असतोच. या गोष्टींचा विचार करूनच प्रयोजक क्रियापदें स्वतंत्र दिलीं आहेत.

केवळ पद्यांत येणारे शब्द स्पष्टपणें ओळखूं यावेत म्हणून व त्यांचा अुपयोग व्यावहारिक भाषेंत कोणी चुकून करूं नये म्हणून ते शब्द तारकांकित केले आहेत.

कोशांतील शब्दांचा क्रम हिंदींतील अकारविल्ह्याच्या पद्धतीनें ठेवण्यांत आला आहे. हा क्रम मराठी वर्णानुक्रमापेक्षां पुढील बाबतींत भिन्न आहे. अनुस्वारयुक्त वर्णानें आरंभ होणारे शब्द प्रत्येक वर्णाच्या आरंभीं घेतले आहेत. क्ष व ज्ञ हीं जोडाक्षरें असल्यामुळें त्यांस स्वतंत्र स्थान न देतां क. व ज या वर्णांत घेतलें आहे.

कोशांत समसमान असलेल्या शब्दांची पुनरुक्ति होअून व्यर्थ विस्तार वाढूं नये म्हणून ते अेकाच ठिकाणीं दिले आहेत. अुदा. सौदामनी–मिनी, हरिआली–याली अि.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तुत शब्दकोश तयार करतांना 'हिन्दी शब्दसागर', प्रकाशक, "नागरी-प्रचारणी सभा, काशी," या बृहत्कोशाची प्रामुख्यानें मदत घेण्यांत आली आहे. या कोशांत शब्दांची व्युत्पत्ति, अर्थ, अित्यादि गोष्टी सविस्तर व अत्यंत शास्त्रीय पद्धतीनें दिल्या असून हिन्दी भाषेच्या महान् पंडितांनीं व साहित्यिकांनीं सदर कोशाचें संपादन केलें आहे. हा अेवढाच कोश हिन्दी भाषेंतील प्रमाणित, प्रातिनिधिक, सर्वशब्दसंग्राहक व शास्त्रीय असा आहे. यांत अेकंदर शब्दांची संख्या अेक लाखावर असून याची किंमत ५० रु. आहे.

अरबी, फारसी शब्दांकरितां श्री. रामचंद्र वर्मा यांच्या अुर्दू-हिंदी शब्दकोशाची व डंकन फोर्बसच्या हिन्दुस्तानी-अिंग्रजी शब्दकोशाची मदत घेतली आहे. श्री. वर्माच्या कोशांत शब्दांच्या व्युत्पत्तीसंबंधीं विशेष विचार केला असून हिन्दी भाषेंत सामान्यतः रूढ असलेल्या अरबी, फारसी शब्दांचा संग्रह केला आहे. याशिवाय अन्य कोशांचें साहाय्यदेखील या कामाकरितां घेतलें आहे. त्यांची व कांहीं हिन्दी भाषेंतील अुपयुक्त शब्दसंग्रहांची सूची पुढें दिली आहे.

१. संक्षिप्त हिन्दी शब्दसागर—संपादक : श्री. रामचंद्र वर्मा.
प्रकाशक : अिंडियन प्रेस, प्रयाग.

२. 'भाषा' शब्द-कोश— संपादक : श्री. रामशंकर शुक्ल.
प्रकाशक : रामनारायणलाल, प्रयाग.

३. हिन्दी शब्दसंग्रह— संपादक : श्री. मुकुंदीलाल, श्रीराजवल्लभ सहाय.
प्रकाशक, काशी विद्यापीठ, बनारस.

४. हिन्दुस्तानी कोश— रामनरेश त्रिपाठी, हिन्दीमंदिर, प्रयाग.

५. राजनीति शब्दावली— श्री. गदाधरदास अंबष्ठ व
श्री. भगवानदास केला.
प्रकाशक, भारतीय ग्रन्थमाला, वृन्दावन.

संपादक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवेदन

अखिल महाराष्ट्र हिन्दी प्रचार समितीची १९३७ च्या सेप्टेंबर महिन्यांत स्थापना झाल्यापासून राष्ट्रभाषेच्या प्रचाराची महाराष्ट्रांत झपाट्यानें प्रगति होत आहे. राष्ट्रभाषेच्या परीक्षांना बसणाऱ्यांची संख्या आतां तिपटी-चौपटीनें वाढली असून, कित्येक विद्यार्थी 'हिन्दी साहित्यसम्मेलन, प्रयाग'च्या 'विशारद', व 'साहित्यरत्न' या पदवी-परीक्षांकरितांहि तयारी करूं लागले आहेत. मुंबअी सरकारनें शाळांतून हिन्दुस्तानीचें शिक्षण देण्याचें ठरविल्यामुळें जिल्ह्याप्रमाणेंच तालुक्याच्या मुख्य मुख्य गांवीं व कित्येक खेडेगांवांतहि राष्ट्रभाषेचें अध्ययन विद्यार्थ्यांनीं व शिक्षक मंडळींनीं करण्यास सुरुवात केली आहे. जेथें राष्ट्रभाषेचें शिक्षण देणारा हिन्दी प्रचारक पोहोंचूं शकला नाहीं, अशा ठिकाणीं राष्ट्रभाषेचा अभ्यास करणाऱ्यांना मदत व्हावी म्हणून कित्येक साधनग्रंथांची आवश्यकता अुत्पन्न झाली आहे. अशा साधनग्रंथांच्या निर्मितींत राष्ट्रभाषा शिकण्यास अत्यंत अुपयोगी अशा राष्ट्रभाषेंतील शब्दांचा मराठींत शास्त्रीय पद्धतीनें अर्थ देणाऱ्या कोशाची पहिली गरज आहे. हें जाणून अखिल महाराष्ट्र हिन्दी प्रचार समितीनें आपल्या ता. २४-८-१९३९ च्या बैठकींत या कामाची योजना करण्याकरितां खालील गृहस्थांची शब्दकोश-समिति नेमली.

१ श्री. दत्तो वामन पोतदार, पुणें.
२ श्री. यशवंतराव दाते, महाराष्ट्र शब्दकोश मंडळ, पुणें.
३ श्री. पुण्डलीकजी कातगडे–संपादक 'हिन्दी–मराठी शब्दकोश', बेळगांव.
४ प्रो. तु. ना. देवरे, अुर्दू व पर्शियन भाषांचे प्रोफेसर, वाडिया कॉलेज, पुणें.
५ श्री. कृ. ज. धर्माधिकारी–संयोजक, शब्दकोशसमिति, पुणें.

या समितीनें शब्दकोशाच्या रचनेसंबंधीं कांहीं निश्चित सिद्धान्त ठरविले व प्रत्यक्ष संपादन-कार्यास सुरुवात करतांना अेक संपादन-व्यवस्थामंडळ नेमिलें, त्यांत श्री. दाते, प्रो. देवरे व श्री. धर्माधिकारी या समितीच्या सभासदांशिवाय श्री. गोपाळराव नेने व श्री. रामानंदजी शर्मा यांचाहि समावेश करून घेण्यांत येअून कामाची स्थूल मानानें विभागणी केली. महाराष्ट्र-समितीतर्फे सर्व कामाचा मुख्य भार श्री. गोपाळराव नेने यांचेवर सोंपविण्यांत आला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आचार्य श्री. काकासाहेब कालेलकर व श्री. दत्तोपंत पोतदार हे मधून मधून कोशाचें काम पाहून अत्यंत महत्त्वाच्या सूचना देत असत. या क्षेत्रांतील प्रथम कोशकार श्री. पुण्डलीकजी कातगडे हे रोजच्या कामांत प्रत्यक्ष हजर नसले तरी आपल्या 'हिन्दी-मराठी शब्दकोशा'च्या रूपानें हजर राहून योग्य ती सहायता करीत होते.

या कोशकार्याचें संपादन करतांना काम सुलभ व शास्त्रशुद्ध व्हावें या दृष्टीनें मराठी कोशकार श्री. दाते हे प्रत्यक्ष कामांत भाग घेऊन तंत्रविषयक सूचना करीत, अितकेंच नव्हे तर अर्थनिश्चिति आणि व्युत्पत्ति ठरवितांना स्वतःचा अमूल्य वेळ खर्च करून मदत करीत. प्रो. देवरे हे अुर्दू आणि अरबी-फारसीचे तज्ज्ञ आहेत. पण याशिवाय अलीकडे हिन्दीचाहि त्यांनीं जो विशेष अभ्यास केला आहे त्यामुळें व त्यांच्या अेकंदरीत चिकित्सक व शास्त्रीय दृष्टीमुळें शब्दांचे अर्थनिर्णय करण्याच्या कामीं त्यांची महत्त्वाची मदत झाली. आपलें व्यावसायिक अितर काम असतांहि कोशाच्या कामाकरितां बराच वेळ त्यांनीं अत्यंत हौसेनें दिला याबद्दल वरील सर्व मंडळीबरोबरच समिति त्यांचीहि विशेषरूपानें ऋणी आहे.

श्री. गोपाळराव नेने, श्री. रामानंदजी शर्मा व श्री. कृ. ज. धर्माधिकारी समितीचे घटक असल्यानें त्यांच्या कामाबद्दल प्रत्यक्ष कामच त्यांची योग्यता ठरवील म्हणून न लिहिलेलेंच बरें.

या कार्यांत ज्या व्यक्तींकडून आणि संस्थांकडून मदत झाली त्यांचाहि मी आभारी आहें. प्रामुख्यानें म्हणावयाचें म्हणजे अमळनेरचे श्रीमंत प्रताप-शेटजी यांनीं आपल्या नेहमींच्या औदार्यास अनुसरून समितीला दिलेल्या रु. ६००० च्या देणगींतून या कामाकरितां लागणारा खर्च करण्यास परवानगी दिली. याबद्दल समितीला कृतज्ञता वाटते. पुष्कळ चांगल्या चांगल्या योजना मनामध्यें असूनहि योग्य वेळीं आवश्यक द्रव्याची सहायता न झाल्यानें कितीतरी कामें पडून राहतात. श्री. प्रतापशेटजींच्या पैशाचा आम्ही अपेक्षिल्यापेक्षांहि अधिक मूल्यवान् असा अुपयोग होत आहे याचें आमचेप्रमाणेंच त्यांनाहि समाधान वाटेल.

धुळ्याचे श्री. रामेश्वरजी पोद्दार यांनीं आम्ही विनंति करतांच शंभर रुपये कार्यास देणगी म्हणून पाठवून दिले, याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रत्यक्ष काम चालू असतां ज्या कित्येक राष्ट्रभाषा-भक्तांची मदत झाली त्यांमध्यें आयुर्वेद-महाविद्यालयाचे प्राध्यापक वैद्य श्री. भास्कर विश्वनाथ अुर्फ मामा गोखले, 'आयुर्विद्या-पारंगत', 'राष्ट्रभाषा-कोविद', आणि 'सकाळ' पत्राच्या संपादकीय विभागांत काम करणारे श्री. भा. मो. भट यांची मदत अुल्लेखनीय आहे. श्री. वि. वा. चंद्रात्रे, 'राष्ट्रभाषा-कोविद', व श्री. द. ग. धारेश्वर, बी. अे., यांनींहि सोंपविलेलें काम जिव्हाळ्यानें व कसोशीनें केलें.

वर्ध्याच्या राष्ट्रभाषाप्रचारसमितीनें व महाराष्ट्र शब्दकोशमंडळानें आणि दुसऱ्या कांहीं व्यक्तींनीं कांहीं संदर्भग्रंथ वापरण्यास दिले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

हा शब्दकोश छापण्याच्या कामीं 'समर्थ भारत छापखान्या'चे व्यवस्थापक श्री. स. रा. सरदेसाअी, बी.अे., अेलअेल. बी., यांनीं जी आस्था व आपुलकी दाखविली आणि हें काम तडीस नेण्यास मदत केली त्याबद्दल त्यांचा व छापखान्यांतील अितर मंडळींचा मी आभारी आहें.

याच कोशाच्या धर्तीवर गुजराती, बंगाली, असामी, अुडिया आदि भाषांत कोश तयार केले गेले तर राष्ट्रभाषेबरोबर प्रांतीय भाषांतहि सहकार वाढेल अशी अुमेद आहे. गुजरातीमध्यें अशा प्रकारचा अेक कोश तयार केला जात आहे. त्यास आमच्या या कोशाची सहायता होत आहे हें नमूद करण्यास आनंद वाटतो

आचार्य श्री. काकासाहेब कालेलकरांनीं जी विद्वत्तापूर्ण प्रस्तावना लिहून राष्ट्रभाषेच्या स्वरूपाचें अधिकृत दिग्दर्शन केलें आहे त्याकडे वाचकांनीं विशेष लक्ष पुरवावें. महाराष्ट्रांतील जनता या शब्दकोशाचा मोठ्या प्रमाणावर अुपयोग करून राष्ट्रभाषा शिकण्याच्या राष्ट्रसंघटनेच्या कामांत अग्रेसर होअील आणि अशाच अितर आवश्यक ग्रंथांची निर्मिति करण्यास प्रोत्साहन देअील अशी आशा आहे.

पुणें,
ता. १२।४।१९३९

शं. द. देव,
अध्यक्ष, अखिल महाराष्ट्र हिन्दी-
प्रचारसमिति, पुणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुस्तानी-मराठी शब्दकोश

अ

अँकटा—पु. [सं.] खडा; लहान दगड. अँकटी-स्त्री.

अँकुड़ी—स्त्री. [सं.] १ आंकडी; हूक. २ बाणाचें वांकदार टोंक.

अंकमाल*—पु. [सं.] आलिंगन; भेट. अंकमालिका-स्त्री.

अंकवार—स्त्री. [सं.] कूस; मांडी. (मु.) अंकवार भरना-१ आलिंगन देणें; मिठी मारणें. २ पुत्रवती असणें.

अँकवारना*—क्रि. स. [सं.] आलिंगन देणें; भेटणें; अुराशीं धरणें.

अँकाअी—स्त्री. [सं.] १ अदमास; अटकळ. २ मालक व खंडकरी यांच्यांत पिकाच्या वाटणीबद्दल होणारा करार.

अँकाना—क्रि. स. [सं.] १ चिन्ह करणें; खूण करणें. २ किंमत ठरवून घेणें. ३ अंदाज करविणें. ४ पारख करविणें.

अँकुड़ा—पु. [सं.] वांकडी सळअी; आंकडा. अँकुड़ी-स्त्री.

अँकुसी—स्त्री. [सं.] आंकडी; हूक.

अँकोर*—पु. [सं.] १ कूस; मांडी. २ आलिंगन; भेट. ३ लांच. ४ शिदोरी; फराळाचें सामान.

अँखमीचनी*—स्त्री. [सं.] लपंडावाचा खेळ.

अँखिया—स्त्री. [सं.] छाप; ठसा.

अँखुआ—पु. [सं.] अंकुर; मोड.

अँखुआना—क्रि. अ. अंकुर येणें-फुटणें.

अंग—पु. [सं.] अंग. (मु.) अंग-अुभरना-वयांत येणें; तारुण्याचीं लक्षणें दिसणें. (मु.) अंग टूटना-आळसणें; आळोखे पिळोखे देणें.

अंगड़-खंगड़—वि. [सं.] १ अुरलें सुरलेलें. २ मोडकें तोडकें.

अँगड़ाअी—स्त्री. [सं.] आळस; आळेपिळे. अँगड़ाअी लेना-आळेपिळे देणें; आळस झाडणें.

अँगड़ाना—क्रि. अ. [सं.] आळेपिळे देणें.

अंगद—पु. [सं.] बाजूबंद.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अँगरा—पु. [सं.] निखारा; अंगार; विस्तव.

अंगराग—पु. [सं.] अुटी; अुटणें; चंदनाचा लेप.

अंगरी*—स्त्री. [सं.] कवच.

अँगरेज़—पु. [पोर्तु.] अिंग्रज. **अँगरेज़ी**–वि. अिंग्रजी.

अंगलेट—पु. [सं.] अंगाची ठेवण; शरीराचा बांधा.

अँगवना*—क्रि. स. [सं.] १अंगावर घेणें; जबाबदारी पत्करणें. २ सहन करणें.

अंगविकृति—स्त्री. [सं.] फेफरें; मिरगी; अपस्मार.

अंगविद्या—स्त्री. [सं.] सामुद्रिक विद्या.

अंगसिहरी—स्त्री. [सं.] हुडहुडी; कांटा; कंप.

अंगार—पु. [सं.] निखारा; विस्तव. (मु.) **अंगार अुगलना**–आग पाखडणें; रागाच्या भरांत फाडफाड बोलणें.

अँगारी—स्त्री. [सं.] १ करवा; गंडेरी. २ अुसाचीं लांब पानें.

अँगिया—स्त्री. [सं.] चोळी.

अँगीठा—पु. [सं.] शेगडी; आगटी. **अँगीठी**–स्त्री.

अंगुर*—पु. [सं.] बोट; अंगुलि.

अँगुरी*—स्त्री. [सं.] बोट; अंगुलि.

अंगुली—स्त्री. [सं.] बोट; अंगुलि.

अंगुल्यानिर्देश—पु. [सं.] १ बोट दाखविणें; अंगुलीनिर्देश. २ बदनामी; कलंक; लांछन.

अंगुश्तनुमाअी—स्त्री. [फा.] लांछन; दूषण; कलंक.

अंगुश्तरी—स्त्री. [फा.] अंगठी; मुद्रिका.

अंगुश्ताना—पु. [फा.] अंगुस्त्रान.

अँगुसी—स्त्री. [सं.] १ नांगराचा फाळ. २ सोनाराची फुंकणी.

अँगूठा—पु. [सं.] आंगठा. (मु.) **अंगूठा चूमना**–खुशामत करणें.

अँगूठी—स्त्री. [सं.] अंगठी; वेढें.

अंगूर—पु. [सं.] १ किरळ. २ अंकुर; मोड. (मु.) **अंगूर तडकना**–फटना–जखम उलणें.

अंगूर—पु. [फा.] द्राक्ष. **अंगूरी**—वि. फिकट हिरव्या रंगाचा.

अँगेठी—स्त्री. [सं.] शेगोटी; शेगडी.

अँगोछा—पु. [सं.] पंचा; टॉवेल; अुपवस्त्र. **अँगोछी**–स्त्री.

अँगौरिया—पु. [सं.] कूळ; भागेली; वाहुदार; खंडकरी.

अँघडा—पु. [सं.] काशाचीं जोडवीं.

अँघिया—स्त्री. [दे.] बारीक चाळणी.

अंघ्रि*—पु. [सं.] पाय; चरण.

अँचुरा*—पु. [सं.] पदर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंचल—पु. [सं.] १ अंचल; लुगड्याचा पदर. २ सरहद्दीजवळील भाग किंवा प्रांत. ३ किनारा. **अंचल-धन**—पु. लाडका मुलगा.

अँचवना, अचवना—क्रि. स. [सं.] १ आचमन करणें. २ पिणें. ३ हात धुणें; आंचवणें.

अंछर—पु. [सं.] १ तोंड येणें. २ जादुटोणा. ३ अक्षर.

अंजनहारी—स्त्री. [सं.] १ रांजणवाडी. २ कुंभारीण (किडा).

अंजना*—स्त्री. [सं.] अंजनी; हनुमानाची माता.

अंजरपंजर—पु. [सं.] हाडांचा सांपळा; बरगडी. (मु.) **अंजरपंजर ढीला होना**-हाडें खिळखिळीं होणें.

अँजवाना, अँजाना—क्रि. स. [सं.] काजळ घालून घेणें.

अंजाम—पु. [फा.] १ शेवट; समाप्ति. २ परिणाम; फळ. (मु.) **अंजाम करना-देना**—पूर्ण करणें; संपविणें; तडीस नेणें.

अंजुमन—स्त्री. [फा.] १ संस्था; समिति. २ परिषद; सभा.

अँजुरी-ली*—स्त्री. [सं.] ओंजळ.

अँजोरना*—क्रि. स. [सं.] १ गोळा करून घेणें. २ छिनावणें; हिसकावून घेणें.

अँजोरी*—स्त्री. [सं.] १ प्रकाश. २ चांदणें.

अंझा—पु. [सं.] सुट्टी; खाडा; अनध्याय.

अँटना—क्रि. अ. [सं.] १ मावणें. २ व्यवस्थित बसणें (झांकण अि.). ३ पुरेसें होणें.

अंटा—पु. [सं.] सुताचा किंवा रेशमाचा गुंडाळा; बिंडा. २ गोटी(मोठी). ३ बिलीयर्ड. ४ मोठी कौडी. **अंटाघर**—पु. बिलीयर्ड खेळण्याची जागा.

अंटा गुड़गुड़—वि. [सं. + अनु.] कैफ किंवा नशा चढलेला; गुंग.

अंटाचित—क्रि. वि. [सं.] चारी मुंडे चीत; अुताणा. (मु.) **अंटाचित होना**-विस्मित होणें; थक्क होणें; दिङ्मूढ होणें.

अँटिया—स्त्री. [सं.] पेंढी; भारा; मोळी.

अंटी—स्त्री. [सं.] वेचक; दोन बोटांतील जागा किंवा अंतर. (मु.) **अंटी मारना**-लांबविणें; पळविणें; न कळत काढून घेणें.

अँटौतल—पु. [सं.] ढापणी; अंधारी (घाण्याच्या बैलाची).

अंठी—स्त्री. [सं.] अठळी; आठी; कोय; बाठी.

अंडकटाह*—पु. [सं.] ब्रह्मांड; विश्व.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंडबंड—स्त्री. [अनु.] प्रलाप; विसंगत भाषण; बडबड. वि. असंबद्ध; विसंगत.

अँडरना—क्रि. अ. [सं.] कणसाला दाणे येणें.

अंडा—पु. [सं.] अंडें. (मु.) अंडा ढीला होना–१ खूप दमणें; शिथिल होणें. २ दिवाळखोर बनणें.

अँडुआना—क्रि. स. [सं.] खच्ची करणें.

अँडुआ बैल—पु. [सं.] सांड; पोळ.

अंडैल–वि. [सं.] अंडीं घालणारी.

अँतडी—स्त्री. [सं.] आंतडी. (मु.) अँतडी जलना–पोटांत कावळे कोकावूं लागणें.

अंतरजामी*—पु. [सं.] अंतर्यामी; ईश्वर.

अँतरा—पु. [सं.] १ खाडा; सुट्टी. २ अेक अंतराड (ज्वर). ३ कोपरा.

अंतरीप—पु. [सं.] भूशिर.

अँतरौटा—पु. [सं.] लुगड्याच्या आंतून नेसण्याचें वस्त्र.

अंतर्दशाह—पु. [सं.] मृताबद्दल दहा दिवसांचे आंत होणारें क्रियाकर्म.

अंतर्वेगी ज्वर—पु. [सं.] विषमज्वर; दोषी ताप.

अंतर्वेद—पु. [सं.] १ गंगा व यमुना या दोन नद्यांच्या मधील प्रदेश. २ अंतर्वेदी; दोआब. **अंतर्वेदी**—वि. गंगा व यमुना यांचे-मधील प्रदेशांत राहणारा.

अंतर्शय्या—स्त्री. [सं.] १ मृत्युशय्या. २ स्मशान.

अंतावरी*—स्त्री. [सं.] आंतडीं.

अंत्याक्षरी—स्त्री. [सं.] भेंड्या; भेंड्या.

अंदर—क्रि. वि. [फा.] १ आंत; आंतल्या बाजूस. २ ठराविक मुदतीच्या पूर्वी.

अंदरूनी—वि. [फा.] १ आंतील. २ गुप्त.

अंदाज़—पु. [फा.] १ अंदाज; अदमास; अटकळ; अनुमान. **अंदाज़न**—क्रि. वि. अदमासें; सुमारें.

अंदाज़ा—पु. [फा.] अटकळ; अनुमान.

अंदुआ—पु. [सं.] हत्तीच्या मागील पायांत घालावयाचा लांकडी खोडा.

अंदु, अंदुक—पु. [सं.] १ स्त्रियांचा पायांत घालावयाचा दागिना; पैंजण. २ हत्ती बांधण्याचा सांखळदंड किंवा दोरखंड.

अंदेशा—पु. [फा.] १ चिंता; काळजी. २ संशय; शंका; अंदेशा.

अंदोह—पु. [फा.] १ खेद; दुःख; शोक. २ अंदेशा; खटका; फिकीर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंधखोपड़ी--स्त्री. [सं.] अज्ञानी; मूर्ख; ठोंब्या; मठ्ठ.

अंधड़--पु. [सं.] १वावटळ; झंझावात. २ वादळ; तुफान.

अंधर*—पु.[सं.] १वावटळ; झंझावात. २ अंधेर. ३ वादळ; तुफान.

अँधरा*—पु. [सं.] आंधळा माणूस. वि. आंधळा.

अँधरी—स्त्री. [सं.] १ चाकाचा आरा. २ आंधळी स्त्री.

अंधा—पु. [सं.] आंधळा मनुष्य. वि. आंधळा. (मु.) अंधे की लकड़ी–१ अेकमात्र आधार; अेकुलता अेक मुलगा.

अंधाधुंध—स्त्री. [सं.] १ काळोख. २ गोंधळ; अंदाधुंदी; अन्याय. वि. १ अंदाधुंद. २ अतिशय; पुष्कळ.

अँधियारी—स्त्री. [सं.] १ डोळे बांधण्याची पट्टी (विशेषतः अुपद्रवी पशुपक्ष्यांच्याकरितां).

अंधेर—पु. [सं.] १ अन्याय; अत्याचार. २ अव्यवस्था; अंदाधुंदी.

अंधेर खाता—पु. [सं.+अ.] अनागोंदी जमाखर्च.

अँधेरा—पु. [सं.] अंधकार; काळोख. वि. अंधार.

अँधेरा-अुजाला–पु. [सं.] १ मुलांचा अेक खेळ.२अून-सावलीचा खेळ.

अँधेरिया—स्त्री. [सं.] १ काळोख; अंधकार.२ काळोखी रात्र. ३ कृष्ण पक्ष.

अंधेरी—स्त्री. [सं.] १ अंधार; काळोख. २ अंधेरी रात्र. ३ सोसाट्याचा वारा. ४ झांपड (घोड्याची अथवा वैलाची).

अँधोटी-धौटी—स्त्री. [सं.] डोळ्यांची झापड; ढापणी (जनावरांची).

अंबरडंबर—पु. [सं.] सूर्यास्ताच्या वेळची लालिमा.

अंबरबारी—पु. [सं.] दारुहळद; आंबेहळद.

अंबार—पु. [फा.] रास; ढीग.

अँबिया—स्त्री. [सं.] कैरी.

अँबिरथा*—वि.[सं.] व्यर्थ; फुकट.

अंबोह—पु. [फा.] लोकांची गर्दी; दाटी.

अंस-सु*—पु. [सं.] १ खांदा. २ अंश; भाग.

अँसुआ-वा*—पु.[सं.]अश्रु;आंसू.

अँसुवन*—पु. [सं.] आंसू; अश्रु. ('आँसू' बहु.)

अअूत*—वि. [सं.] निपुत्रिक. अअूती–वि. स्त्री.

अकड़—स्त्री. [सं.] १ ताठरपणा; ताठा; घमेंड. २ तणाव; ताण.

अकड़ना–क्रि. अ. १ आकसणें;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संकोच पावणें. २ ऐट दाखविणें; घमेंड करणें. ३ हट्ट करणें. ४ टणक होणें. ५ गारठणें; बधिर होणें.

अकड़बाअी—स्त्री. [सं.] खेंच; ताण; ओढ (शरीरांतील नसा). अकड़ाव-पु.

अकड़बाज़—वि. [सं. + फा.] घमेंडखोर. अकड़बाज़ी-स्त्री. ऐट; घमेंड.

अकड़ैत—वि. [सं.] घमेंडखोर.

अकथ*—वि. [सं.] अकथनीय; अवर्णनीय.

अकनना*—क्रि. स. [सं.] कान देणें; ऐकणें; कानोसा घेणें. अकनि-क्रि. वि. ऐकून.

अकना—क्रि. अ. [सं.] त्रासणें; कंटाळणें; विटणें.

अकबक—स्त्री. [अनु.] असंबद्ध भाषण; वटवट; बडबड. अकबकाना-क्रि. अ. असंबद्ध प्रलाप काढणें; बडबडणें.

अकबकाना—क्रि. अ. [सं.] चकित होणें; थक्क होणें.

अकबर—वि. [फा.] श्रेष्ठ; महान्; थोर.

अकबरी—स्त्री. [फा.] १ ऐक पक्वान्न. २ लांकडावरील नक्षीकाम.

अकरकरा—पु. [सं.] अक्कलकरा-क़ाढा.

अकरा—वि. [सं.] १ महाग. २ चोख; अुत्तम.

अकरी—स्त्री. [सं.] पाभर.

अकल—वि. [सं.] १ अवयवरहित. २ अखंड. ३ अगम्य; निराकार (परमेश्वराचें विशेषण).

अकल—वि. [सं.] अस्वस्थ; बेचैन.

अकल—स्त्री. [अ.] अक्कल; बुद्धी.

अकलखुरा—वि. [सं. + फा.] १ आपलपोट्या; २ स्वार्थी; अुदासीन; ऐकलकोंडा. ३ मत्सर करणारा; द्वेष करणारा.

अकवन*—पु. [सं.] रुअी; मंदार.

अकवाम—स्त्री. [अ.] जाती('क़ौम' बहु.).

अकस—पु. [सं.] आकस; द्वेष; वैर. अकसना-क्रि. स. द्वेष करणें; वैर करणें.

अकसर, अक्सर—क्रि. वि. [अ.] प्रायः; बहुधा; नेहमीं. वि. पुष्कळ; अधिक.

अक़साम—स्त्री. [अ.] १ प्रकार; भाग; हिस्से ('क़िस्म' बहु.). २ शपथा ('क़सम' बहु.).

अकसीर, अक्सीर—स्त्री. [अ.] रसायन; किमया. वि. रामबाण; अचूक गुण देणारें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अकह-हुवा—वि. [सं.] अवर्णनीय; अकथनीय.

अकाज—पु. [सं.] १ विघाड; कार्यनाश; हानि. २ कुकर्म; दुष्कर्म.

अकाट्य—वि. [सं.] अखंडनीय; दृढ; मजबूत.

अकारज*—पु. [सं.] हानि; अपकार.

अकारथ—वि., क्रि. वि. [सं.] व्यर्थ; निरथक.

अकाल—पु. [सं.] १ दुष्काळ. २ अयोग्य काळ; अवेळ.

अकास*— पु. [सं.] आकाश.

आकिल—स्त्री. [अ.] अक्कल; बुद्धि. **अकिलदाढ़**-पु. अक्कलदाढ.

अक़ीक़—पु. [अ.] अेक प्रकारचें तांबूस रत्न; लाल.

अक़ील—पु. [अ.] बुद्धिमान्; शाहणा.

अकुलाना—क्रि. अ. [सं.] १ अुतावीळ होणें. २ घाबरणें; व्याकुळ होणें.

अकेला—वि. [सं.] अेकाकी; अेकटा. (यौ.) **अकेला दम**—अेकटा; अेकाकी.

अकौआ-वा— पु. [सं.] रुई.

अक्खड़—वि. [सं.] अक्कडबाज; अुच्छृंखल. **अक्खड़पन**—पु. असभ्यता; उद्धटपणा; उच्छृंखलता.

अक्खर*—पु. [सं.] अक्षर; वर्ण.

अक्खा—पु.[सं.] गोणी; अखें; पोतें.

अक्खो मक्खो—पु. [सं.] मुलाची दृष्ट काढतांना उच्चारिले जाणारे शब्द.

अक़्द—पु. [अ.] १ विवाह. २ विक्री. ३ करार.

अक़्ल—स्त्री. [अ.] अक्कल; बुद्धि; समज. (मु.) **अक़्लका दुश्मन**—मूर्ख; मंदबुद्धि.

अक़्लमंद—वि. [अ. + फा.] बुद्धिमान्; चतुर; समजूतदार. **अक़्लमंदी**-स्त्री. हुशारी; बुद्धिमत्ता.

अक्स—पु. [अ.] १ प्रतिबिंब; छाया. २ चित्र; तसवीर.

अखज—वि. [सं.] १ खाण्यास अयोग्य. २ खराब; वाअीट.

अख़ज़-पु. [अ.] १ घेणें; ग्रहण करणें. २ काढून घेणें. ३ अुतारा घेणें; अुद्धृत करणें.

अखड़ैत—पु. [सं.] मल्ल; तालीमबाज मनुष्य.

अखती-तीज—स्त्री. [सं.] अक्षय तृतीया.

अख़बार—पु. [अ.] वर्तमानपत्र.

अख़बार-नवीस-पु. [अ. + फा.] संपादक; पत्रलेखक.

अखय—वि. [सं.] अक्षय.

अखर*—पु. [सं.] अक्षर; वर्ण.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अखरना—क्रि. स. [सं.] मनास लागणें; वाअीट वाटणें.

अखरोट—पु. [सं.] अक्रोड.

अख़लाक़—पु. [अ.] १ शील; नीतिमत्ता. २ शिष्टाचार. ३ संवय. ('खुलक' बहु.)

अख़ीर—पु. [अ.] शेवट; अंत.

अखूट-वि. [सं.] कमी न होणारा; अखंड; अक्षय.

अखैबर—पु. [सं.] अक्षयवट.

अखोर*—वि. [सं.] १ सालस; सज्जन. २ सुंदर. ३ निर्दोष.

अखोह—पु. [सं.] खडबडीत किंवा अुंचसखल जमीन.

अखौट-टा—पु. [सं.] १ जात्याच्या खालच्या तळीची मधली खुंटी. २ हुंडा. ३ खराडीचा लोखंडी किंवा लांकडी दांडा.

अख़्वाह—अव्य. [अनु.] अुद्वेग किंवा आश्चर्यसूचक शब्द.

अख़्तर—पु. [अ.] तारा; नक्षत्र.

अख़्तियार—पु. [अ.] अधिकार; सामर्थ्य.

अगड़—पु. [सं.] अभिमान; अैट; ताठा.

अगड़धत्ता—वि. [सं.] १ अुंच; लांबटांग्या. २ श्रेष्ठ; मोठा. पु. अमरवेल.

अगड़ बगड़—पु. [अनु.] असंबद्ध प्रलाप; वडबड. २ अनावश्यक काम; नसता खटाटोप. वि. निरर्थक; निरुपयोगी.

अगत-ति—स्त्री. [सं.] दुर्गति; वाअीट दशा.

अगनित*—वि. [सं.] अगणित; असंख्य.

अगनेअु, अगनेत*—पु. [सं.] आग्नेय दिशा.

अगमन*—क्रि. वि. [सं.] १ अगोदर; प्रथम. २ पूर्वापासून.

अगर—पु. [सं.] अगरु; एक प्रकारचें सुगंधी झाड.

अगर—अव्य. [फा.] जर; जरी. (मु.) **अगर मगर करना**—हुज्जत घालणें.

अगरचे—अव्य. [फा.] यद्यपि; जरी.

अगरना—क्रि. अ. [सं.] पुढें जाणें; पुढाकार घेणें.

अगरबत्ती—स्त्री. [सं.] अुदवत्ती.

अगरी—स्त्री. [सं.] अडसर.

अगरु—पु. [सं.] अूद; अगराचें लांकूड.

अगलबगल—क्रि. वि. [फा.] अिकडे तिकडे; आसपास.

अगला—वि. [सं.] १ पुढचा; समोरचा. २ पूर्वीचा. ३ आगामी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अगवना*--क्रि. स. [सं.] १ पुढाकार घेणें. २ तत्पर असणें.

अगवाँसी--स्त्री. [सं.] नांगराचा दांडा.

अगवाई-नी--स्त्री. [सं.] सामोरें जाणें; स्वागत करणें.

अगवाड़ा--पु. [सं.] घराच्या पुढचा भाग.

अगस्त--पु. [इं.] ऑगस्ट महिना.

अगह*--वि. [सं.] १ हातीं न लागणारा; चंचल. २ अवर्णनीय. ३ अगम्य. ४ कठीण.

अगहन-पु. [सं.] मार्गशीर्ष महिना.

अगाड़ी—क्रि. वि. [सं.] १ पुढें; समोर. २ भविष्यकाळीं. ३ प्रत्यक्ष. पु. १ घोड्याच्या गळ्याला पुढच्या बाजूला बांधण्याच्या दोऱ्या. २ वस्तूचा पुढचा किंवा समोरचा भाग.

अगाही—स्त्री. [सं.] पूर्वसूचना.

अगिन*—स्त्री. [सं.] अग्नि; विस्तव.

अगियाना—क्रि. अ. [सं.] दाह होणें; अंग तापणें.

अगुआ-वा—पु. [सं.] १ नेता; पुढारी. २ मार्गदर्शक वाटाड्या. ३ लग्न जुळविणारा मध्यस्थ. **अगुआई**--स्त्री. पुढाकार; अग्रेसरत्व. **अगुआना**—क्रि. स. पुढारी बनविणें. क्रि. अ. पुढें होणें.

अगुआनी-वानी—स्त्री. [सं.] सामोरें जाणें.

अगोरदार—पु. [सं. + फा.] संरक्षक; देखरेख ठेवणारा; राखण करणारा.

अगोरना—क्रि. स. [सं.] १ वाट पाहणें; प्रतीक्षा करणें. २ राखण करणें. **अगोरिया**-पु. रखवालदार.

अग्य*—वि. [सं.] अज्ञ.

अग्याँ-ग्या—स्त्री. [सं.] आज्ञा.

अग्रशोची—पु. [सं.] दूरदर्शी.

अग्रसर—पु. [सं.] १ पुढारी. २ आरंभ करणारा.

अघट—वि. [सं.] कधीं कमी न होणारा; अक्षय.

अघवाना—क्रि. स. [सं.] १ पोटभर खाऊं घालणें. २ संतुष्ट करणें.

अघाना—क्रि. अ. [सं.] १ पोटभर खाणें. २ संतुष्ट होणें; तृप्त होणें. ३ प्रसन्न होणें; खुष होणें.

अचंभा—पु. [सं.] अचंबा; आश्चर्य.

अचकन—पु. [सं.] अुत्तर हिंदुस्थानी लांब अंगरखा.

अचरज—पु. [सं.] आश्चर्य.

अचवन—पु. [सं.] १ आचमन. २ चूळ भरणें. **अचवना**-क्रि. स. १ आचमन करणें. २ आंचवणें; हात धुणें. ३ गमाविणें.

अचार—पु. [फा.] लोणचें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अचिरात्—क्रि. वि. [सं.] शीघ्र; लवकर.

अचेत—वि. [सं.] चेतनारहित; मूर्च्छित.

अच्छ*—वि. [सं.] स्वच्छ, निर्मळ. पु. डोळा.

अच्छत—पु. [सं.] अक्षत.

अच्छा—वि. [सं.] छान; अुत्तम; ठीक. (मु.) अच्छे आना–योग्य वेळीं येणें.

अछत*—क्रि. वि. [सं.] असतांना; जीवित असतांना.

अछना—क्रि. अ. [सं.] असणें; विद्यमान असणें.

अछवानी—स्त्री. [सं.] बाळंतिणीस द्यावयाची अेक औषधीयुक्त पौष्टिक मिठाअी.

अछूत—पु. [सं.] १ अस्पृश्य; हरिजन. वि. १ अस्पृष्ट; न शिवलेला. २ नवीन.

अछूता—वि. [सं.] १ नवीन; नावीन्यपूर्ण. २ अस्पृष्ट.

अछेह*—वि. [सं.] सतत; निरंतर; लागोपाठ.

अछोह—पु. [सं.] १ शांति; स्थिरता. २ निर्दयता.

अज़—अव्य. [फा.] कडून; पासून (प्रत्यय).

अज—वि. [सं.] स्वयंभू.

अजगुत-अजुगुत—पु. [सं.] १ आश्चर्यकारक गोष्ट; चमत्कार. २ अयोग्य गोष्ट.—वि. आश्चर्यकारक.

अज़ग़ैब*—पु. [फा. + अ.] अदृष्ट स्थान. अज़ग़ैबी—वि. १ गुप्त; २ रहस्यपूर्ण.

अज़दहा—पु. [फा.] अजगर.

अजनबी—वि. [अ.] १ अज्ञात; अपरिचित. २ नवखा; परदेशी.

अजपा*—पु. [सं.] मनांतल्या मनांत करावयाचा जप.

अजब—वि. [अ.] विलक्षण; अद्‌भुत.

अज़मत—स्त्री. [अ.] १ प्रताप; महत्त्व; थोरवी. २ चमत्कार.

अज़माना—क्रि. स. [फा.] १ अजमावणें. २ अंदाज करणें.

अजल—स्त्री. [अ.] मृत्यु.

अज़ल—स्त्री. [अ.] १ आराम; विश्रांति. २ मूळ उद्‌गम. ३ अनादि काळापासून चालत आलेला. [यौ.] रोज़े अज़ल–सृष्टीचा उत्पत्ति-दिन.

अजवाअिन-यन—स्त्री. [सं.] ओवा.

अजस*—पु. [सं.] अपयश; अपकीर्ति. अजसी–वि. अपयशी.

अज़हद—वि. [फा.] अमर्याद; पुष्कळ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अजहुँ-हूँ*--क्रि.वि. [सं.] आतांपावेतों.

अजान--वि. [सं.] अबोध; अज्ञानी.

अज़ाब--पु. [अ.] १ दुःख; कष्ट. २ संकट; आपत्ति. ३ पाप.

अजायब—वि. [अ.] विलक्षण; अद्भुत.

अजायबखाना-घर-पु. [अ.+फा., + सं.] वस्तुसंग्रहालय; अजबघर.

अजिर--पु. [सं.] १ अंगण. २ वारा. ३ शरीर.

अजी--अव्य. [सं.] अहो; अरे (संबोधनसूचक शब्द).

अज़ीज़--वि. [अ.] १ प्रिय. २ प्रतिष्ठित. पु. मित्र.

अजूबा—वि. [अ.] अद्भुत; विलक्षण.

अजे-जै—वि. [सं.] अजिंक्य.

अजोग—वि. [सं.] अयोग्य.

अजोता—पु. [सं.] चैत्री पूर्णिमा. या दिवशीं बैल जोडीत नाहींत; अेक सण.

अजौं*—क्रि. वि. [सं.] अद्यापि; अजूनसुद्धां; आतांपर्यंत.

अज़्म—पु. [अ.] १ निश्चय. २ अनुकरण.

अटक—स्त्री. [सं.] अडवणूक; प्रतिबंध; अडचण.

अटकना—क्रि.अ. [सं.] १थांबणें; अडणें. २ प्रेमांत सांपडणें.

अटकनी—स्त्री. [सं.] अडकणी (चरखा).

अटकल--स्त्री. [सं.] अटकळ; अनुमान; अंदाज. **अटकल पच्चू**-पु. आडाखा; अंदाज.

अटका—पु. [सं.] पुरीच्या जगन्नाथाच्या नैवेद्याचा भात किंवा अितर अर्पण केलेल्या वस्तु.

अटकाना—क्रि. स. [सं.] थोपविणें; अडवणें; हरकत करणें.

अटपट*—वि. [सं.] १ असंबद्ध. २ कठीण; विकट.

अटपटाना—क्रि. अ. [सं.] घोटाळणें; गोंधळणें; गडबडून जाणें.

अटपटी*—स्त्री. [सं.] खोडी; अुपद्व्याप; अुचापत.

अटल—वि. [सं.] स्थिर; दृढ; नित्य.

अटारी—स्त्री. [सं.] १ गच्ची. २ माडी. ३ माळा.

अटाला—पु. [सं.] १ रास; ढीग. २ सामान.

अटूट—वि. [सं.] अखंड; सतत.

अटेरन—पु. [सं.] सूत गुंडाळण्याचा फाळका.

अटेरना—क्रि. स. [सं.] फाळक्यावर सूत गुंडाळणें.

अट्टहास—पु. [सं.] खो खो हंसणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अट्टालिका—स्त्री. [सं.] गच्ची.
अट्टी—स्त्री. [सं.] फाळक्याभोंवतीं गुंडाळलेलें सूत; लड; लट.
अट्ठा—पु. [सं.] अठ्ठ्या [पत्त्यांतील].
अट्ठाअिस-अीस—वि. [सं.] अठ्ठावीस.
अट्ठानवे—वि. [सं.] अठ्ठ्याण्णव.
अट्ठावन—वि. [सं.] अठ्ठावन.
अठासी-अट्ठासी—वि. [सं.] अठ्ठ्यायशी.
अठअीं—स्त्री. [सं.] अष्टमी तिथि.
अठखेली—स्त्री. [सं.] विनोद; क्रीडा. वि. खेळकर.
अठत्तर-हत्तर—वि. [सं.] अठ्ठ्याहत्तर.
अठन्नी—स्त्री. [सं.] अधेली (नाणें).
अठवाँसा—वि. [सं.] आठोळा; आठव्या महिन्यांत झालेला.
अठवारा—पु. [सं.] आठवडा.
अठारह—वि. [सं.] अठरा.
अठोतरी—स्त्री. [सं.] अेकशें आठ मण्यांची माळ.
अड़ंगा—पु. [सं.] १ पायांत पाय घालणें. २ अडथळा; अडवणूक.
अड़गोड़ा—पु. [सं.] लोढणें.
अड़तालीस—वि. [सं.] अठ्ठेचाळीस.
अड़दार—वि. [सं.+फा.] अडेलतट्टू.
अड़ना—क्रि. अ. [सं.] १ अडणें. २ हट्ट करणें.
अड़र—वि. [सं.] निर्भय.
अड़सठ—वि. [सं.] अडुसष्ट.
अड़हुल—पु. [सं.] जास्वंदीचें फूल.
अड़ान—स्त्री. [सं.] १ आधार; टेंकण. २ मुक्काम.
अड़ाना—क्रि. स. [सं.] अडविणें.
अड़ार—पु. [सं.] लांकडाची वखार.
अड़ियल—वि. [सं.] १ अडेलतट्टू. २ मठ्ठ.
अड़ी—स्त्री. [सं.] १ हट्ट; आग्रह. २ गरजेची वेळ; गरज. ३ आडकाठी; अडथळा.
अड़ोल—वि. [सं.] १ स्थिर; अचल. २ स्तब्ध.
अड़ोस पड़ोस—पु. [सं.] शेजार; आसपास. अड़ोसी पड़ोसी-पु. शेजारी-पाजारी.
अड्डा—पु. [सं.] अड्डा; जमण्याची जागा.
अढ़तिया—पु. [सं.] १ वखारवाला. २ दलाल; अडत्या.
अढ़वना, अढ़ौना—क्रि. स. [सं.] कामाला लावणें. पु. सोंपविलेलें काम.
अढ़क—पु. [सं.] ठोकर; ठेंच.
अढ़कना—क्रि. अ. ठोकर खाणें.


ख़ज़ानची—पु. [फा.] खजिनदार; कोषाध्यक्ष.

ख़ज़ाना—पु. [अ.] खजिना.

खजुली—स्त्री. [सं.] खरुज; खाज.

खट—पु. [अनु.] अेखादी वस्तु फुटल्याचा किंवा दुसऱ्यावर आपटल्याचा आवाज. (मु.) खटसे–चटकन्; झट्दिशीं.

खटक—स्त्री. [अनु.] १ आशंका; अंदेशा. २ काळजी; चिंता. ३ खटखट असा आवाज.

खटकना, खड़कना—क्रि. अ. [अनु.] १ खटखट आवाज होणें. २ टोचणी लागणें; मनाला लागणें. ३ दुखणें; ठसठसणें. ४ भांडण होणें. ५ न अुमगणें. ६ साशंक होणें. ७ काळजी वाटणें. ८ विटणें; विरक्त होणें.

खटका—पु. [अनु.] १ बोलट; खिटी. २ आशंका; भीति; चिंता.

खटकाना—क्रि. स. [अनु.] १ चिंता किंवा काळजी अुत्पन्न करणें. २ ठोठावणें; खटखट आवाज करणें.

खटखट—स्त्री. [अनु.] १ ठकठक. २ कटकट. ३ तंटा-बखेडा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खटखटाना—क्रि. स. [अनु.] ठोठावणें; ठकठक आवाज करणें.

खटना—क्रि. अ. [सं.] १ मेहनत करणें; परिश्रम करणें. २ खूप श्रम करून कमी मोबदला मिळणें.

खटना—क्रि. स. [सं.] पैसे मिळविणें.

खटपट—स्त्री. [अनु.] १ खटका; झकाझकी. २ बेबनाव; वैमनस्य.

खटपद—वि. [सं.] षट्पाद; सहा पायांचा. पु. भौरा.

खटपाटी—स्त्री. [सं.] बाजेचें लांकूड.

खटबुना—पु. [सं.] बाज विणणारा.

खटमल—पु. [सं.] ढेंकूण.

खटमिट्ठा—वि. [सं.] आंबटगोड.

खटराग—पु. [सं.] १ षट् राग; संगीताचे सहा राग. २ भानगड; बखेडा.

खटाअी—स्त्री. [सं.] १ आंबटपणा. २ आंबट; आम्ल वस्तु. ३ बेबनाव; वैमनस्य. (मु.) खटाअीमें डालना–१ संशयांत ठेवणें; दुरध्यांत ठेवणें. २ विलंब लावणें.

खटाखट—क्रि. वि. [अनु.] १ झटपट; भरभर. २ तत्काळ; लागलींच.

खटाना—क्रि. अ. [सं.] १ निर्वाह होणें; निभणें. २ थांबणें; टिकणें. ३ परीक्षेंत पूर्ण अुतरणें.

खटाना—क्रि. अ. [सं.] अंबणें; अंबुसणें.

खटापटी—स्त्री. [अनु.] बेबनाव; भांडण.

खटास—स्त्री. [सं.] आंबटपणा.

खटिक—पु. [सं.] १ भाजी विकणारा; काची. २ फळें, भाजीपाला विकणारी जात.

खटिया—स्त्री. [सं.] खाटलें; बाज.

खटोलना, खटोला—पु. [सं.] लहान बाज. स्त्री. खटोली.

खट्टा—वि. [सं.] आंबट. (मु.) जी खट्टा होना–अप्रसन्न होणें; नाखुष होणें.

खट्टामीठा—वि. [सं.] आंबटगोड.

खट्टू—पु. [सं.] कमविणारा; मिळविणारा. [किंवा खूर.

खट्वांग—पु. [सं.] बाजेची पाटी

खट्वा—स्त्री. [सं.] बाज.

खड़खड़ा—पु. [अनु.] नवशिका घोडा प्रथम जुंपतांना टांग्याला लावतात ते लांब पोल.

खड़खड़ाना—क्रि. अ. [अनु.] खडखड आवाज होणें; खडखडणें. क्रि. स. खडखड करणें. [मेणा.

खड़खड़िया—स्त्री. [सं.] पालखी;

खड़बड़—स्त्री. [अनु.] १ फेरबदल; अदलाबदल. २ खळबळ; गडबड.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खड़बड़ाना—क्रि. अ. [अनु.] १ बावरणें; गोंधळून जाणें; घाबरणें. २ अस्ताव्यस्त होणें; अव्यवस्थित होणें.

खड़बड़ाहट, खड़बड़ी— स्त्री. [अनु.] १ खडबड. २ अुलथापालथ; खळबळ.

खड़मंडल—पु. [सं.] १ घोटाळा; गोंधळ. २ खळबळ; गडबड.

खड़ा—वि. [सं.] १ अुभा. २ सिद्ध; तयार; तत्पर. ३ सरळ. ४ सुरुवात. ५ रचलेला. ६ कच्चा. (मु.) खड़ेखड़े–अुभ्याअुभ्या. खड़ा जबाब–समयसूचक अुत्तर.

खड़ाअूँ—स्त्री. [सं.] खडावा; पादुका.

खड़ानन—पु. [सं.] कार्तिकस्वामी.

खड़िया, खड़ी—स्त्री. [सं.] खडू; चुन्याची फक्की.

खड़ी बोली—स्त्री. [सं.] दिल्लीच्या आसपास बोलली जाणारी भाषा; हिन्दी गद्याची भाषा.

खड्डा, खड्ढा—पु. [सं.] खड्डा.

ख़त—पु. [अ.] १ पत्र. २ कानाजवळचे किंवा दाढीचे केस. ३ रेषा.

खत—पु. [सं.] क्षत; जखम.

ख़तना—पु. [अ.] सुंता.

ख़तम—वि. [अ.] समाप्त; पूर्ण. (मु.) ख़तम करना–१ संपविणें. २ मारून टाकणें.

ख़तर-रा—पु. [अ.] १ भय; भीति. २ शंका. ३ धास्ती; काळजी.

ख़ता—स्त्री. [अ.] १ चूक. २ अपराध; दोष. ३ धोका.

ख़तावार—वि. [अ. + फा.] दोषी; अपराधी.

खति*—स्त्री. [सं.] क्षति; नुकसान; हानि.

खतियाना—क्रि. स. [अ.] खतावणी करणें; खातें लिहिणें.

खतियौनी—स्त्री. [अ.] १ खतावणीचें काम. २ खातेवही.

खत्ता—पु. [सं.] १ खड्डा; खळगा. २ धान्याचें कोठार.

खदबदाना—क्रि. अ. [अनु.] खदखदणें; शिजणें.

ख़दशा—पु. [अ.] १ धास्ती; काळजी; भय. २ अंदेशा; शंका.

खदान—स्त्री. [सं.] खाण.

खदिर—पु. [सं.] १ कातांचें झाड. २ कात. [घेणारा.

खदुका*—पु. [सं.] ऋणको; कर्ज

खदेरना—क्रि. स. [सं.] १ दूर करणें. २ फरपटत नेणें.

खद्दड़, खद्दर—पु. [?] १ खादी.

खन*—पु. [सं.] क्षण.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खनक—पु. [सं.] १ अुंदीर. २ जमीन खणणारा. ३ भिंत फोडून चोरी करणारा. ४ सोन्याची खाण.

खनकना, खनखनाना—क्रि. अ. [अनु.] खणखणाट होणें.

खनकाना—क्रि. स. [अनु.] खणखणाट करणें. [खणणें.

खनना*—क्रि. स. [सं.] खोदणें;

खनिज—वि. [सं.] खाणींतून खणून काढलेला.

खपची—स्त्री. [तु.] बांबूची लवचीक कामटी.

खपड़ा—पु. [सं.] १ कौल. २ भिक्षापात्र. ३ खापरी. ४ कासवाची पाठ.

खपड़ी—स्त्री. [सं.] खापरी; खापर; मातीचा मोठा परळ.

खपड़ैल, खपरैल—स्त्री. [सं.] १ घराचें कौलार. २ कौल.

खपत-ती—स्त्री. [सं.] १ खप; विक्री. २ समावेश.

खपना—क्रि. अ. [सं.] १ खर्च होणें; व्यय होणें. २ खपणें. ३ अुपयोगास येणें. ४संपणें. ५निभणें.

खपाना—क्रि. स. [सं.] १ खपविणें. २ खर्च करणें. ३ निर्वाह करणें; निभावणें. ४ संपविणें. (मु.) **माथा अथवा सिर खपाना**–डोकें पिकविणें.

खप्पड़, खप्पर—पु. [सं.] १ खापरी. २ कौल. ३ मातीचा परळ. ४ भिक्षापात्र. ५ डोक्याची कवटी.

ख़फ़गी—स्त्री. [फा.] १ रोष; राग. २ अप्रसन्नता.

ख़फ़ा—वि. [फा.] १ अप्रसन्न. २ रुष्ट; नाराज; खप्पा.

ख़फ़ीफ़—वि. [अ.] १ थोडा; कमी. २ किंचित्. ३ तुच्छ; हीन. ४ शरमलेला; लज्जित झालेला.

ख़फ़ीफ़—स्त्री. [अ.] लहान व नकदी रकमेचे दावे चालविणारें दिवाणी कोर्ट.

ख़बर—स्त्री. [अ.] १ बातमी; वृत्तांत. २ माहिती. ३ निरोप. ४ सावधपणा; शुद्ध. ५ पत्ता; शोध. **ख़बर अुड़ना**–बातमी फैलणें; बाजारगप्प अुठणें. **ख़बर लेना**–१ समाचार घेणें; सहानुभूति दाखविणें. २ शिक्षा करणें.

ख़बरदार—वि. [अ. + फा.] सावध; जागृत. **ख़बरदारी**–स्त्री. सावधगिरी.

खबाअी—स्त्री. [सं.] १ खादाडपणा. २ खूप खाणें; आकंठ जेवणें.

ख़बीस—पु. [अ.] १ खबीस; दुष्ट; खुनशी. २ राक्षस; पिशाच; सैतान.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ख़ब्त—पु. [अ.] वेड; छांदिष्टपणा; नाद. **ख़ब्ती**–वि. वेडा; विक्षिप्त.

खभरना*—क्रि. स. [सं.] १ मिसळणें. २ गोंधळ माजविणें.

खभार*—पु. [सं.] १ चिंता; दुःख. २ भय; व्याकुळता.

ख़म—पु. [अ.] १ वांकडेपणा; झुकाव. २ दंड; बाहु. (मु.) ख़म ठोकना–दंड थोपटणें. ख़म खाना–१ पराजय कबूल करणें; हार खाणें. २ वांकणें; झुकणें.

ख़मदम—पु. [अ.+फा.] पुरुषार्थ; पराक्रम.

ख़मसा—पु. [अ.] पांच श्लोकांचें कडवें (दहा चरण).

ख़मीर—पु. [अ.] १ तिंबलेली कणीक. २ भिजविलेलें पीठ. ३ स्वभाव; प्रकृति. ४ अननस, गरे वगैरे आंबवून काढलेलें पाणी.

ख़मीरा—पु. [अ.] १ अेक प्रकारची तंबाखू. २ औषधी काढा.

ख़मोश—वि. [फा.] गप्प; चूप.

खय*—स्त्री. [सं.] क्षय; विध्वंस.

ख़यानत—स्त्री. [अ.] १ दुसऱ्याच्या ठेवीची किंवा पैशाची अफरातफर. २ अप्रामाणिकपणा.

ख़याल, ख़्याल—पु. [अ.] १ विचार. २ स्मृति; आठवण. ३ लक्ष.

खरक—पु. [सं.] १ गोठा. २ कुरण. ३ वांवूच्या कामट्यांचें दार.

खरकना—क्रि. अ. [अनु.] १ ठसठसणें; दुखणें. २ निसटणें; जाणें.

खरका—पु. [सं.] काडी. (मु.) खरका करना–काडीनें दांत कोरणें.

ख़रख़शा—पु. [फा.] १ भांडण; वखेडा. २ आशंका; भीति.

खरगोश—पु. [फा.] ससा.

खरचना—क्रि. स. [फा.] १ खर्च करणें. २ कामीं लावणें; अुपयोगांत आणणें.

खरता—वि. [सं.] तीक्ष्ण धारेचा.

खरधार—पु. [सं.] तीक्ष्ण शस्त्र.

खरब—पु. [सं.] खर्व.

ख़रबूज़ा—पु. [फा.] खरबूज.

खरभर*—पु. [अनु.] १ गलबला. २ खळबळ.

खरभराना—क्रि. अ. [अनु.] गोंधळ करणें; गडबड करणें.

ख़रमस्ती—स्त्री. [फा.] दुष्टपणा; पाजीपणा; द्वाडपणा.

खरमास—पु. [सं.] पौष व चैत्र महिने. या वेळेस सूर्य धन व मीन राशीला असतो व हे मंगल कार्याकरितां वर्ज्य मानले आहेत.

खरल—पु. [सं.] औषधें कुटण्याचा खल.

खरसा—पु. [सं.] अेक पक्वान्न.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खरसान—स्त्री. [सं.] १ हत्यारांना धार लावण्याचा दगड. २ सहाण. [२ खरारा.

खरहरा—पु. [अनु.] १ खराटा.

खरहा—पु. [सं.] ससा.

खरा—वि. [सं.] १ तीक्ष्ण; तिखट धारेचा. २ शुद्ध. ३ चांगला; अुत्तम. ४ खरपूस. ५ चिवट; कडकडीत. ६ निर्दोष. ७ रोख; नगद (दाम). ८ स्पष्टवक्ता. ९ सत्य; वास्तविक. स्त्री. खरेपणा.

खराअी—स्त्री. [दे.] सकाळीं बराच वेळपर्यंत खावयास न मिळाल्यामुळें होणारी कासाविसी.

ख़राद—पु. [फा.] लांकूड, धातू वगैरेंना तासण्याचें व गुळगुळीत करण्याचें चाक; लेथ.

ख़रादना—क्रि. स. [फा.] धातू अित्यादि तासून गुळगुळीत करणें.

ख़रादी—पु. [फा.] धातू तासून गुळगुळीत व सुडौल करणारा; लेथकाम करणारा. [सचोटी.

खरापन—पु. [सं.] खरेपणा;

ख़राब—वि. [अ.] १ खराब; वाअीट. २ निकृष्ट. ३ पतित; हलकट.

ख़राबा—स्त्री. [अ.] १ खराबी; नासाडी. २ दुर्दशा. ३ दोष; अवगुण. स्त्री. ख़राबी.

खरायँध—स्त्री. [सं.] लघवीची घाण.

खरारि-री*—पु. [सं.] १ राम. २ विष्णु. ३ कृष्ण.

ख़राश—स्त्री. [फा.] कांतून निघालेला भुसा; तासून निघालेला ढलपा. [गोठा.

खरिक-का*—पु. [सं.] गायरान;

खरिया—स्त्री. [सं.] १ बारीक दोरीचें जाळें (गवत अि. बांधण्यासाठीं). २ पिशवी. ३ खडू.

खरियाना—क्रि. स. [सं.] १ हस्तगत करणें; घेणें. २ थैलींत भरणें.

खरिहान—पु. [सं.] खळें.

ख़रीता—पु. [अ.] १ थैली; पैशाची पिशवी. २ खलिता; लखोटा. ३ खिसा.

ख़रीद—स्त्री. [फा.] खरेदी. [घेणें.

ख़रीदना—क्रि. स. [फा.] विकत

ख़रीददार—पु. [फा.] गिऱ्हाअीक.

ख़रीफ़—स्त्री. [अ.] खरीफाचें पीक.

खरींच—स्त्री. [सं.] ओरखडा.

खरींचना—क्रि. स. [सं.] १ ओरखडणें; बोचकारा काढणें. २ खरडणें. [बोचकारा.

खरींट—स्त्री. [सं.] ओरखडा;

खरींहा—वि. [सं.] किंचित् खारट.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ख़र्च-र्चा—पु. [फा.] खर्च.

खर्चीला—वि. [फा.] १ खर्चिक; अुधळ्या. २ पुष्कळ खर्चाचे.

खर्राटा—पु. [अनु.] घोरणें. (मु.) खर्राटा भरना, मारना, अथवा लेना–डाराडूर निजणें; घोरणें.

खलअी*—स्त्री. [सं.] दुष्टावा; वाअीटपणा.

ख़लक़—पु. [अ.] १ निर्मित सृष्टि. २ जग; विश्व. [जनसमूह.

ख़लक़त—पु. [अ.] १ जग. २

खलता—स्त्री. [सं.] नीचता;दुष्टावा.

खलना—क्रि. अ. [सं.] वाअीट वाटणें; मनाला लागणें.

खलबल—स्त्री. [अनु.] १ खळबळ; गडबड. २ घाबरें; व्याकुळ होणें. ३ गोंगाट; गोंधळ.

खलबलाना—क्रि. अ. [अनु.] खळबळणें; अुकळणें.

खलबली—स्त्री. [अनु.] खळबळ.

ख़लल—पु. [अ.] अडथळा; आडकाठी.

खलाना*—क्रि.स.[अ.] १ रिकामें करणें. २ खळगा करणें. ३ पिचणें; आंत दाबणें. (मु.) पेट खलाना–रिकामें पोट दाबून दाखविणें; पोटावर हात मारणें.

खलाल—पु. [अ.] दांत-कोरणें.

ख़लास—वि. [अ.] १ खलास; समाप्त. २ सुटलेला; मुक्त.

खलासी—स्त्री. [अ.] सुटका; मुक्तता. पु. १ खलाशी. २ तोफ डागणारा; गोलंदाज.

खलित*—वि. [सं.] स्खलन पावलेला; पदच्युत झालेला; स्खलित.

खलियान, खलिहान—पु. [सं.] १ खळें. २ रास; ढीग.

खलियाना—क्रि.स. [सं.] १कातडें काढणें, सोलणें. २ रिकामें करणें; मोकळें करणें.

ख़लिश—स्त्री. [फा.] १ बोंच; टोंचणी; २ दुःख; क्लेश. ३ चिंता; अंदेशा; भीति.

खली—स्त्री. [सं.] पेंड.

ख़लीक़—वि. [अ.] १ सुस्वभावी; सुशील. २ मनमिळाअू.

ख़लीज—स्त्री. [अ.] अुपसागर.

ख़लीफ़ा—पु. [अ.] १ खलीफा; वारस. २ अधिकारी. ३ न्हावी. ४ वयोवृद्ध व्यक्ति.

खल्वाट—पु. [सं.] टक्कल. वि. टक्कल पडलेला; टकल्या.

खवा*—पु. [सं.] खांदा.

खवाना*—क्रि. स. [सं.] खाविणें; जेवावयास घालणें.

ख़वास—पु. [अ.] हुजऱ्या; शागीर्द.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ख़वासी—स्त्री. [अ.] शागीर्दी; चाकरी. [खाणारा.

खवैया—पु. [सं.] १ खादाड. २

ख़स—स्त्री. [फा.] खस; वाळा.

खसकंत*—स्त्री. [सं.] निसटणें.

ख़सकना—क्रि. अ. [अनु.] निसटणें; सटकणें.

खसकाना—क्रि. स. [अनु.] १ सरकविणें; हटविणें; वाजूला सारणें. २ हळूंच पळविणें. [खस.

खसखस-खास—स्त्री. [सं.] खस-

ख़सख़ाना—पु. [फा.] वाळ्याचे पडदे लावलेली खोली.

खसखासी—वि. [सं.] निळसर पांढऱ्या रंगाचा.

ख़सम—पु. [अ.] १ पति; नवरा; २ स्वामी; मालक.

ख़सरा—पु. [अ.] १ चोपडी; बुक. २ शेताचें नोंदणी-बुक. ३ जमाखर्चाची चोपडी.

ख़सलत—स्त्री. [अ.] १ स्वभाव; संवय. २ गुण.

खसिया, खसी—पु.[अ.] १ खच्ची केलेला बैल. २ नपुंसक. ३ बकरा.

ख़सीस—वि. [अ.] १ कृपण; कंजूष. २ दुष्ट; वाअीट. ३ अयोग्य.

खसोट—स्त्री. [सं.] १ अुपटून काढणें. २ ओरखडणें. ३ ओढाताण; झोंबाझोंबी. ४ छिनावणें.

खसोटना—क्रि. स. [सं.] १ अुखडणें; अुपटून टाकणें. २ हिसकावून घेणें; छिनावणें.

ख़स्ता—वि. [फा.] १ खुसखुशीत; खमंग. २ घायाळ. ३ दुःखी.

खहि*—स्त्री. [सं.] धूळ.

खाँग—पु. [सं.] १ न्यूनता; कमतरता. २ सुळा; दांत.

खाँगड़, खाँगड़ा—वि. [सं.] १ अणकुचीदार; सुळेदार. २ हत्यारबंद. ३ वळकट. ४ अुद्धट; अुच्छृंखल.

खाँगना*—क्रि. अ. [सं.] खंगणें; कमी होणें. [अुणीव; तोटा.

खाँगी*—स्त्री. [सं.] कमतरता;

खाँच*—स्त्री.[सं.] १ सांधा; जोड. २ रेघोटी; खूण. ३ जडणकाम.

खाँचना*—क्रि.स.[सं.] १ रेखाटणें. २ चिन्ह करणें. ३ आकर्षित करणें.

खाँचा—पु. [सं.] पाटी; हारा; टोपली (मोठी). [साखर.

खाँड़—स्त्री. [सं.] स्वच्छ न केलेली

खाँड़ना—क्रि. स. [सं.] खांडके पाडणें.

खाँड़ा—पु. [सं.] दुधारी तलवार.

खाँड़ा—पु. [सं.] १ तुकडा. २ भाग; अंश.

खाँवाँ—पु. [सं.] रुंद व मोठा खंदक.

खाँसना—क्रि. अ. [सं.] खोकणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खाँसी—स्त्री. [सं.] खोकला.

खाअी—स्त्री. [सं.] खंदक.

खाअू—वि. [सं.] खादाड.

ख़ाक—स्त्री. [फा.] माती; धूळ. (मु.) ख़ाकमें मिलना–धुळीस मिळणें. ख़ाक छानना–दीनवाणें फिरणें. वि. तुच्छ; अकिंचन.

ख़ाकसार—वि. [फा.] तुच्छ (विशेषतः नम्रता प्रगट करण्याकरितां स्वतःस हें विशेषण लावतात).

ख़ाका—पु. [फा.] १ रूपरेषा; आराखडा; कच्चा नकाशा. २मसुदा. ३ कच्ची यादी. ४ खर्चाचें अंदाजपत्रक. (मु.) ख़ाका अुडाना–रेवडी अुडविणें; टर अुडविणें.

ख़ाकी—वि. [फा.] १ पडीक (जमीन). २ खाकी रंगाचा.

खाजा—पु. [सं.] १ खाद्य वस्तु. २ अेक मिठाअी.

खाट—स्त्री. [सं.] बाज; खाट.

खाड़ी—स्त्री. [सं.] आखात.

ख़ातमा—पु. [अ.] १ शेवट; निकाल. २ अंत; मृत्यु.

ख़ातिर—स्त्री. [अ.] आदर; सन्मान. अव्य. साठीं; करितां.

ख़ातिर-ख़्वाह—क्रि. वि., अव्य. [अ.] अनुरूप; यथेच्छ; मनाजोगा; मनपसंत.

ख़ातिरजमा—स्त्री. [अ.] खात्री; समाधान; खातरजमा.

ख़ातिरदारी—स्त्री. [अ. + फा.] आगतस्वागत; मानसन्मान; आदरातिथ्य.

ख़ातिरी—स्त्री. [अ.] १ आदरातिथ्य. २ सांत्वना; संतोष.

ख़ातून—स्त्री. [तु.] १ विदुषी. २ सभ्य स्त्री.

खाद—स्त्री. [सं.] खत; राब.

खादर—पु. [सं.] सपाटीची जमीन.

ख़ादिम—पु. [अ.] १ मुसलमानी तर्थिस्थानचा पुजारी किंवा अधिकारी. २ सेवक.

ख़ान—पु. [सं.] १ जेवणखाण. २जेवण्याची पद्धत. ३ भोजनसामग्री.

ख़ानक़ाह—स्त्री. [अ.] मठ; विहार (मुसलमानी).

ख़ानगी—वि. [फा.] खाजगी; घरगुती. स्त्री. नायकीण; वेश्या.

ख़ानदान—पु. [फा.] कुळ; वंश; घराणें. ख़ानदानी–वि. १ अुच्चकुलीन. २ वंशपरंपरागत.

खानपान—पु. [सं.] १ जेवणखाण. २ अन्नपाणी; दाणापाणी. ३ रोटीव्यवहार. ४ जेवण्याची पद्धति.

ख़ानसामा—पु. [फा.] बबरची; अिंग्रज किंवा मुसलमानांचा स्वयंपाकी.

खाना—क्रि. स. [सं.] १ खाणें; जेवणें. २ गिळणें; गट्ट करणें. ३ फस्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करणें. ४ लांच घेणें. ५ सहन करणें; सोसणें. (मु.) मुँहकी खाना–१ पाहणें. २ हारणें; पराजित होणें.

ख़ाना—पु. [फा.] १ घर; स्थान (अदा. दवाखाना). २ कप्पा; खण. ३ रकाना; कोष्टक. ४ घराचा भाग.

ख़ानातलाशी—स्त्री. [फा. + तु.] घराची झडती.

ख़ानापुरी—स्त्री. [फा.] कोष्टक भरण्याचें काम. [नसलेला.

ख़ानाबदोश—वि. [फा.] घरदार

खानि*—स्त्री. [सं.] १ खाण. २ दिशा; बाजू. ३ तऱ्हा; प्रकार.

खानिक*—स्त्री. [सं.] खाण.

ख़ाम—वि. [फा.] १ कच्चा; अपरिपक्व. २ वाअीट. [विचार.

ख़ामख़याली—स्त्री. [फा.] निरर्थक

ख़ामख़ाह—क्रि. वि. [फा.] जाणून-बुजून; हेतुपुरस्सर.

ख़ामोश—वि. [फा.] गप्प; चूप.

ख़ामोशी—स्त्री. [फा.] मौन; स्तब्धता; शांतता.

ख़ार—पु. [फा.] १ कांटा. २ असूया; द्वेष.

खारा—वि. पु. [सं.] १ खारट. २ बेचव.

ख़ारिज—वि. [अ.] १ फेटाळून लावलेला; रद्द केलेला. २ वेगळा; भिन्न; अलग.

ख़ारिश—स्त्री. [फा.] खरूज; खाज.

खारुआँ—पु. [सं.] १ अेक तांबडा भडक रंग. २ या रंगाचे कापड.

खाल—स्त्री. [सं.] १ चामडी; कातडी. २ भाता. ३ मृत शरीर. ४ मोट. (मु.) खाल अुधेड़ना अथवा खींचना–पाठीचें धिरडें काढणें; बेदम मारणें.

खाल—स्त्री. [सं.] १ खोलगट, सखल जमीन. २ आखात. ३ रिकामी जागा.

खाला—वि. [सं.] खोलगट; सखल.

ख़ाला—स्त्री. [अ.] मावशी. (मु.) ख़ालाजीका घर–फुकटची खीर.

खाला—स्त्री. [सं.] १ सखल जमीन. २ रिकामी जागा. ३ खाडी.

ख़ालिस—वि. [अ.] शुद्ध; पवित्र; निर्भेळ.

ख़ाली—वि. [अ.] १ रिकामा; रिता; मोकळा. २ वृथा; वांया. ३ निरुपयोगी. ४ वापरांत नसलेली (वस्तु). ५ रहित; विहीन; वांचून.

खाविंद—पु. [फा.] १ पति. २ खावंद; धनी; मालक.

ख़ास—वि. [अ.] १ विशेष; प्रमुख. २ खाजगी; खतःचा. ३ निखालस; शुद्ध. (मु.) ख़ासकर–विशेषतः; मुख्यतः.

ख़ासकलम—पु. [अ.] प्रायव्हेट सेक्रेटरी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ख़ासगी—वि. [अ.] खाजगी; स्वतःचें.

ख़ासबरदार—पु. [अ. + फा.] भालदार-चोपदार.

ख़ासा—वि. [अ.] १ चांगला; अुत्तम. २ निकोप; निरोगी. ३ सुंदर; सुरेख. ४ भरपूर; पुरेसें. पु. १ खाशा स्वारींचें भोजन वाहनादि. २ अेक प्रकारची अुंची मलमल.

ख़ासियत—स्त्री. [अ.] १ विशेषता; वैशिष्ट्य. २ स्वभाव; संवय. ३ गुणधर्म.

खिंचना—क्रि. अ. [सं.] ओढलें जाणें; ताणलें जाणें.

खिंचवाना, खिंचाना—क्रि. स. [सं.] दुसऱ्याकडून ओढविणें अगर ताणविणें.

खिंचाअी—स्त्री. [सं.] १ ओढाताण. २ ओढण्याची मजुरी.

खिंचाव—पु. [सं.] ताण.

खिचड़वार—पु. [सं.] मकर संक्रांत.

खिचड़ी—स्त्री. [सं.] खिचडी. (मु.) खिचड़ी पकाना—गुप्त सल्लामसलत करणें. वि. १ भेसळ; गोंधळ; गडबड.

खिजलाना—क्रि. अ. [सं.] चिडणें. क्रि. स. चिडविणें.

ख़िज़ाँ—स्त्री. [फा.] १ हेमंत ऋतु. २ पडता काळ.

ख़िज़ाब—पु. [अ.] कलप.

खिझना—क्रि. अ. [सं.] चिडणें; त्रागा करणें.

खिझाना—क्रि. स. [सं.] चिडविणें; खिजविणें.

ख़िताब—पु. [अ.] किताब; पदवी.

ख़ित्ता—पु. [अ.] प्रदेश; प्रांत.

ख़िदमत—स्त्री. [अ.] सेवा; चाकरी.

ख़िदमतगार—पु. [अ. + फा.] चाकर; सेवक.

ख़िदमती—वि. [फा.] १ चाकरीबद्दल मिळणारें (वेतन). २ कष्टाळू (सेवक).

खिन*—पु. [सं.] क्षण.

खिपना*—क्रि. अ. [सं.] १ खपणें; खर्च होणें; व्यतीत होणें. २ तादात्म्य पावणें; तल्लीन होणें.

ख़ियानत—स्त्री. [अ.] दगा; विश्वासघात.

खियाना—क्रि. अ. [सं.] झिजणें.

खिरनी—स्त्री. [सं.] खिरणीचें झाड व फळ.

ख़िरमन—पु. [फा.] १ रास; ढीग. २ खळें.

ख़िराज—पु. [अ.] कर; खंडणी.

ख़िलअत—स्त्री. [अ.] मानाचीं वस्त्रें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ख़िलक़त—स्त्री. [अ.] १ सृष्टि; जग. २ जनसमूह. ३ गर्दी.

खिलखिलाना—क्रि. अ. [अनु.] मोठमोठ्यानें हंसणें; खदखदा हांसणें.

खिलना—क्रि. अ. [सं.] १ अुमलणें; विकसणें. २ प्रफुल्लित होणें. ३ शोभणें. ४ अुलणें.

ख़िलवत—स्त्री. [अ.] १ अेकान्त. २ निर्जन स्थान.

ख़िलवतख़ाना—पु. [अ.+फा.] गुप्त सल्लामसलत करण्याची जागा.

खिलवाड़, खेलवाड़—पु. [सं.] खेळ; मौज.

खिलवाना—क्रि. स. [सं.] दुसऱ्याकडून खाअूं घालणें किंवा भरविणें.

खिलाअी—स्त्री. [सं.] खाणें; जेवणखाण.

खिलाअी—स्त्री. [सं.] लहान मुलांना खेळविणारी दाअी किंवा मोलकरीण.

खिलाड़ी—पु. [सं.] १ खेळाडू. २ डोंबारी. ३ कसरत्या.

खिलाना—क्रि. स. [सं.] १ जेवविणें. २ शपथ घेवविणें.

खिलाना—क्रि. स. [सं.] खेळविणें.

ख़िलाफ़—वि. [अ.] प्रतिकूल; विरुद्ध; अुलट.

खिलौना—पु. [सं.] खेळणें (बाहुली वगैरे).

ख़िल्त—पु. [अ.] कफ. (यौ.) ख़िल्तमिल्त–मिसळलेला.

खिल्ली—स्त्री. [सं.] १ हंशा; विनोद. २ थट्टा; मस्करी. ३ विडा.

खिल्लीबाज़—वि. [सं.+फा.] थट्टेखोर.

खिसकना—क्रि. अ. [सं.] निसटणें; नजर चुकवून जाणें.

खिसाना*—क्रि. अ. [सं.] १ संतापणें; रागावणें; नाखुष होणें. २ लज्जित होणें; शरमणें.

खिसारा—पु. [फा.] तोटा; हानि; नुकसान.

खिसियाना—क्रि. अ. [सं.] १ चिडणें. २ कातावणें; रागावणें. ३ लाजणें; शरमणें. ४ रुसणें.

खिसी*—स्त्री. [सं.] लाज; शरम.

खींच—स्त्री. [सं.] ओढ; ताण; तणाव.

खींचतान, खींचाखींची, खींचातानी—स्त्री. [सं.] १ ओढाताण. २ परस्पराविरुद्ध कारवाअी.

खींचना—क्रि. स. [सं.] १ ओढणें. २ ताणणें. ३ पिळणें. ४ आकर्षित करणें. ५ (दारू अित्यादी) गाळणें. ६ (अर्क वगैरे) काढणें.

खीज—स्त्री. [सं.] १ चीड; त्रागा. २ चिडण्याजोगी गोष्ट. [रागावणें.

खीजना—क्रि. अ. [सं.] चिडणें;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खीझना*—क्रि. अ. [सं.] चिडणें; त्रागा करणें. **खीझ**–स्त्री. खिजवणी; चिरड; चीड.

खीन*—वि. [सं.] १ क्षीण; दुर्बल. २ सूक्ष्म. **खीनता**–पु. दौर्बल्य; क्षीणता. **खीनताअी**–स्त्री.

खीर—स्त्री. [सं.] खीर. (मु.) **खीर चटाना**–अुष्टावण करणें. लहान मुलांना प्रथम अन्न खाअूं घालणें.

खीरा—पु. [सं.] खीरा काकडी; काकडी.

खीरी—स्त्री. [सं.] खिरणीचें फळ.

खीरी—स्त्री. [सं.] दुभत्या जनावरांची कास. [साळीच्या लाह्या.

खील—स्त्री. [सं.] १ लाही. २

खीली—स्त्री. [सं.] विडा.

खीसा—पु. [फा.] १ खिसा. २ पिशवी; थैली.

खुँटिहअी*—स्त्री. [?] गुडघ्यावर धोतर नेसण्याची पद्धत.

खुआर*—वि. [फा.] १ आपन्न; बापुडा; दीन. २ नष्ट; नाश पावलेला. ३ अपमानित.

खुक्ख—वि. [सं.] १ मोकळा; रिता. २ कफल्लक.

खुखड़ी—स्त्री. [सं.] १ चातीवरील सुताची गुंडी. २ नेपाळी सुरा.

खुगीर—पु. [फा.] खोगीर. (मु.) **खुगीरकी भरती**–खोगीरभरती.

खुचर, खुचुर—स्त्री. [सं.] व्यंग काढणें; दूषण देणें.

खुजलाना, खुजाना—क्रि. स. [सं.] खाजविणें. **खुजलाहट**–स्त्री. खाज; कंड्. **खुजली**–स्त्री. १ खाज. २ खरूज.

खुटक*—स्त्री. [अनु.] संदेह; शंका; भीतियुक्त संशय. [तोडणें.

खुटकना—क्रि. स. [सं.] खुडणें;

खुटका—पु. [अनु.] १ वोलट. २ भीति; आशंका.

खुटचाल*—स्त्री. [सं.] १ खोटेपणा; छद्मी वागणूक. २ हलकटपणा; पाजीपणा. ३ दुराचरण. ४ खोडसाळपणा. **खुटचाली**–वि. १ हलकट. २ अुपद्व्यापी. ३ दुराचारी; बदफैली.

खुटना*—क्रि. अ. [सं.] १ संपणें; पूर्ण होणें. २ अुघडणें. ३ वेगळें होणें.

खुटपन, खुटपना—पु. [सं.] १ खोटेपणा. २ दोष; अवगुण.

खुटाअी—स्त्री. [सं.] खोटेपणा.

खुटाना*—क्रि. अ. [सं.] संपणें; खलास होणें. [खपली.

खुट्टी—स्त्री. [?] जखमेवरील

खुड्डी, खुड्ढी—स्त्री. [सं.] शौचकूपांतील खड्डा किंवा पाय ठेवून बसण्याची जागा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ख़ुतबा—पु. [फा.] १ प्रशंसा; तारीफ. २ राजाची स्तुति व गादीवर आल्याची घोषणा. ३ प्रवचन (प्रार्थनेनंतर).

ख़ुद—अव्य. [फा.] स्वतः. (मु.) ख़ुदबख़ुद-आपोआप. **ख़ुदी**-स्त्री. १ अहंकार. २ अभिमान. ३ आत्मभाव.

ख़ुदकाश्त—स्त्री. [फा.] कुळास न देतां स्वतः लागवड केलेली जमीन.

ख़ुदग़रज़—वि. [फा.] आपमतलबी; स्वार्थी. **ख़ुदग़रज़ी**-स्त्री. स्वार्थ; आपलपोटेपणा; आपमतलबीपणा.

ख़ुदना—क्रि. अ. [सं.] खणलें जाणें; खोदलें जाणें.

ख़ुदमुख़्तार—वि.[फा.] १स्वतंत्रपणें वागण्यास मोकळीक असलेला. २ स्वैर; अनियंत्रित.

ख़ुदरा—पु. [सं.] किरकोळ वस्तू.

ख़ुदवाई—स्त्री. [सं.] खणण्याचें काम किंवा मजुरी.

ख़ुदवाना—क्रि. स. [सं.] खणविणें.

ख़ुदा—पु. [फा.] ईश्वर; परमात्मा.

ख़ुदाई—स्त्री. [फा.] ईश्वरनिर्मित सृष्टि. वि. ईश्वरी; दैवी.

ख़ुदात्ताला—पु. [फा.] ईश्वर; परमात्मा.

ख़ुदा-दाद—वि. [फा.] ईश्वरदत्त; दैवी.

ख़ुदावंद—पु. [फा.] १ मालक; स्वामी. २ बड्या लोकांकरितां उपयोजिलें जाणारें संबोधन.

ख़ुदा-हाफ़िज़— [फा.] ईश्वर तुमचें रक्षण करो (निरोप घेतांना वापरला जाणारा वाक्प्रचार).

ख़ुद्दी—स्त्री. [सं.] तांदुळाची कणी.

ख़ुनकी—स्त्री. [फा.] १ शीतलता; गारवा. २ आर्द्रता. [रुसवा.

ख़ुनस—स्त्री. [सं.] राग; क्रोध;

ख़ुनसाना—क्रि. अ. [सं.] रागावणें; रुसणें. [दुराग्रही.

ख़ुनसी—वि. [सं.] रागीट; हट्टी;

ख़ुफ़िया—वि. [अ.] १ गुप्त. २ लपलेला; अप्रगट.

ख़ुफ़िया-पुलीस—पु. [अ. + इं.] हेर; गुप्त पोलीस.

ख़ुभी—स्त्री. [अनु.] कानांत घालावयाची लवंग.

ख़ुम—पु. [फा.] १ मातीची घागर. २ मद्यपात्र.

ख़ुमान—वि. [सं.] दीर्घायुषी; आयुष्मान् (आशीर्वाद).

ख़ुमार—स्त्री. [अ.] १ कैफ; निशा; मद. २ जागरणामुळें आलेला थकवा. ३ नशा उतरतांना येणारा थकवा. **ख़ुमारी**-स्त्री.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खुरंड—स्त्री. [सं.] जखमेवरील खपली.

खुर—पु. [सं.] जनावरांचे खूर.

खुरखुर—स्त्री. [सं.] खरखर असा आवाज.

खुरखुरा—वि. [सं.] १ खडबडीत. २ खरखरीत. **खुरखुराना**–खोकल्यामुळें घशांत खरखर होणें; खरखरणें.

खुरखुराहट—स्त्री. [अनु.] १ घशांतील खरखर. २ घोरतांना होणारा आवाज.

खुरचन—स्त्री. [सं.] १ खरवड. २ खरवडून काढलेली वस्तु.

खुरचना—क्रि. स. [सं.] खरडणें; खरवडणें. [२ पडशी.

खुरजी—स्त्री. [फा.] १ गोणी.

खुरदरा—वि. [फा.] खडबडीत.

ख़ुरदा, ख़ुर्दा—१ मोड (नाण्याची). २ बारीकसारीक वस्तु.

खुरपका—पु. [सं.] जनावरांच्या जिभेवर व खुरांवर व्रण निघतात तो रोग.

खुरपा—पु. [सं.] खुरपें. **खुरपी**–स्त्री.

ख़ुरमा, ख़ुर्मा—स्त्री. [फा.] १ खारीक. २ अेक प्रकारचें पक्कान्न.

ख़ुराक—स्त्री. [फा.] १ भोजन; खाणें. २ खाण्याचें प्रमाण. ३ चंदी.

ख़ुराकी—स्त्री. [फा.] जेवणखाणाच्या खर्चासाठीं दिलेले पैसे.

ख़ुराफ़ात—स्त्री. [अ.] १ वायफळ बडबड. २ कुरापत; कुचाळी. ३ शिवीगाळ. ४ भांडण; तंटा.

ख़ुर्द—वि. [फा.] १ लहान. २ फुटकळ. [यंत्र.

ख़ुर्दबीन—स्त्री. [फा.] सूक्ष्मदर्शक

ख़ुर्दबुर्द—पु. [फा.] १ वाओट मार्गानें मिळविलेलें धन. २ अपव्यय.

खुर्राँट—वि. [दे.] १ अनुभवी वृद्ध; म्हातारा. २ कावेबाज; धूर्त.

खुलना—क्रि. अ. [सं.] १ अुघडणें; खुलें होणें; मोकळें होणें. २ सुटणें (गांठ). ३ प्रगट होणें; अुघडकीस येणें. ४ सुरुवात होणें. ५ अुलणें; फाटणें. (मु.) **खुले आम, खुलेख़ज़ाने, खुले मैदान**–अुघडपणें; जाहीरपणें.

खुलवाना—क्रि. स. [सं.] अुघडविणें.

खुला—वि. पु. [सं.] १ खुलें; अुघडा. २ बंधनरहित; मोकळा. ३ स्पष्ट; प्रगट.

ख़ुलासा—पु. [अ.] सारांश; तात्पर्य. वि. १ मोकळा. २ अुघड-अुघड. ३ स्पष्ट.

ख़ुलूस—पु. [अ.] १ पावित्र्य. २ सरळपणा. ३ निष्ठा.

ख़ुल्क—पु. [अ.] सौजन्य.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खुल्लमखुल्ला—क्रि. वि. [सं.] अुघडअुघड; जाहीरपणें.

ख़ुश—वि. [फा.] १ खूष; प्रसन्न. २ अुत्तम; चांगला (अुदा. ख़ुशहाल).

ख़ुशकिस्मत, ख़ुशनसीब—वि. [फा.+अ.] भाग्यवान्; सुदैवी.

ख़ुशख़बरी—स्त्री. [फा.] आनंददायक बातमी.

ख़ुशदिल—वि. [फा.] १ आनंदी; अुत्साही; प्रसन्नचित्त. २ गमत्या; थट्टेखोर.

ख़ुशबू—स्त्री. [फा.] सुगंध.

ख़ुशबूदार—वि. [फा.] सुगंधी.

ख़ुशहाल—वि. [फा.] १ सुखी; संपन्न. २ कुशल.

ख़ुशामद—स्त्री. [फा.] खुशामत; समजूत.

ख़ुशामदी—वि. [फा.] हाँजीखोर; खुशामत्या.

ख़ुशामदी टट्टू—वि. [फा.+अनु.] लाळघोट्या.

ख़ुश्क—वि. [फा.] १ कोरडा; शुष्क. २ कांहीं अुत्पन्न नसलेला; कफल्लक. ३ नीरस. (मु.) ख़ुश्की जमीन–१ कोरडेपणा. २ नीरसता.

ख़ुसाल, ख़ुस्याल*—वि. [फा.] ख़ुशाल; आनंदी.

ख़ूँख़ार—वि. [फा.] १ क्रूर; भयावह; भयंकर. २ रक्तपिपासु. ३ निर्दय; क्रूर.

ख़ूँट—पु. [सं.] १ कोना; कोपरा; टोंक. २ बाजू; दिशा. ३ भाग; हिस्सा.

ख़ूँट—स्त्री. [सं.] कानांतील मळ.

ख़ूँटा—पु. [सं.] १ मेख. २ खुंटा.

ख़ूँटी—स्त्री. [सं] १ खुंटी. २ ज्वारी वगैरेंचे खुंट (कापणीनंतर). ३ विटी. ४ हद्द; सीमा.

ख़ूँद—स्त्री. [सं.] घोड्याचें नाचणें; खिदळणें.

ख़ूँदना—क्रि. अ. [सं.] १ नाचणें; पाय आपटणें. २ तुडविणें.

ख़ूटना*—क्रि. अ. [सं.] १ व्यतीत होणें. २ खुंटणें; बंद होणें; थांबणें.

ख़ून—पु. [फा.] १ रक्त. २ खून; हत्त्या. (मु.) ख़ून ख़राबा-बी–रक्तपात. ख़ूनका प्यासा–रक्तपिपासु. ख़ून सिरपर सवार होना–खून चढणें. ख़ून पीना–रक्ताचा घोंट घेणें.

ख़ूनी—वि. [फा.] १ खून करणारा. २ अत्याचारी.

ख़ूब—वि. [फा.] १ चांगला; भला; अुत्तम. २ खूप; पुष्कळ. क्रि. वि. चांगल्या किंवा अुत्तम तऱ्हेनें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खूबसूरत—वि. [फा.] सुंदर; रूपवान्. स्त्री. खूबसूरती–सौंदर्य.

खूबानी—स्त्री. [फा.] जरदाळू.

खूबी—स्त्री. [फा.] १ चांगुलपणा; उत्तमता. २ वैशिष्ट्य; गुणविशेष.

खूसट—पु. [सं.] घुबड. वि. १ अपशकुनी. २ निर्बुद्ध. ३ अरसिक.

खेत—पु. [सं.] १ शेत. २ पीक. ३ युद्धक्षेत्र. (मु.) **खेत आना** अथवा **रहना**–युद्धांत कामास येणें; मारलें जाणें. **खेत रखना**–युद्धांत विजय मिळविणें.

खेतिहर—पु. [सं.] शेतकरी.

खेती—स्त्री. [सं.] १ शेती. २ पीक.

खेतीवारी—स्त्री. [सं.] १ शेती-वाडी. २ शेतीचें काम.

खेद—पु. [सं.] १ खेद; दुःख. २ शैथिल्य; थकवा.

खेदा—पु. [सं.] १ रान अुठविण्याचें काम; हांका. २ शिकार.

खेना—क्रि. स. [सं.] १ वल्हविणें. २ वेळ घालविणें; कालक्षेप करणें.

खेपना—क्रि. स. [सं.] घालविणें; व्यतीत करणें.

खेम*—पु. [सं.] क्षेमकुशल.

खेमा—पु. [अ.] तंबू; डेरा; राहुटी.

खेरा*—पु. [सं.] खेडें.

खेलक*—पु. [सं.] खेळाडू.

खेलना—क्रि. अ. [सं.] १ खेळणें; क्रीडा-विहार करणें. क्रि. स. करमणूक करणें. २ अभिनय करणें. **जान** अथवा **जी पर खेलना**–जीवावर अुदार होणें.

खेलवाड़—पु. [सं.] १ मनोरंजन; करमणूक; मौज. २ खेळ.

खेलवाड़ी, खेलाड़ी—वि. [सं.] १ खेळाडू; खेळणारा. २ खेळकर. ३ विनोदी; गमती; खिलाडू. पु. १ खेळकरी. २ तमासगीर; गारुडी.

खेलवार*—पु. [सं.] खेळ; हास्य-विनोद; मौज; तमाशा. वि. खेळ करणारा.

खेलाना—क्रि. स. [सं.] खेळविणें.

खेवक*—पु. [सं.] नावाडी; कोळी.

खेवट—पु. [सं.] पटवाऱ्याजवळील पट्टेकऱ्यांच्या नांवांची यादी, जींत प्रत्येक पट्टेदाराचा हिस्सा लिहिलेला असतो.

खेवा—पु. [सं.] १ नावेचें भाडें. २ नावेंतून नदी ओलांडणें. ३ खेप. **खेवाअी**– १ नांव हाकारण्याची मजुरी. २ हाकारणी (नावेची).

खेसारी—स्त्री. [सं.] १ लाख. २ अेक प्रकारचें कडधान्य.

खेह, खेहर—स्त्री. [सं.] १ धूळ. २ भस्म.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ख़ैर—स्त्री. [फा.] क्षेमकुशल. अव्य. असो; अस्तु; कांहीं हरकत नाहीं; ठीक.

ख़ैरख़ाह—वि. [अ.+फा.] शुभचिंतक; हितचिंतक; हितेच्छु.

ख़ैरवाद—पु. [फा.] खुशाल रहा (निरोप घेतांना म्हणतात).

ख़ैरमक़दम—पु. [अ.] स्वागत (कोणी आले असतां 'या, वसा' म्हणण्याची पद्धत).

ख़ैरात—स्त्री. [अ.] दान; पुण्य.

ख़ैरियत—स्त्री. [फा.] १ क्षेमकुशल; खुशाली. २ आनंदमंगल; कल्याण; हित. [२ पंगु.

खोंड़ा—वि. [सं.] १ बोचरा.

खोंता—पु. [दे.] घरटें.

खोंपा—पु. [सं.] वेणी; बुचडा.

खोंसना—क्रि. स. [सं.] खोचणें; खुपसणें; खोंवणें.

खोखला—वि. [सं.] पोकळ.

खोज—स्त्री. [सं.] १ शोध; तपास. २ ठसा; निशाणी.

खोजना—क्रि. स. [सं.] शोधणें; हुडकणें; धुंडाळणें.

खोट—स्त्री. [सं.] १ दोष; खोड. २ भेसळ; खोट. वि. दुष्ट; अवगुणी.

खोटा—वि. [सं.] खोटा; असत्य. **खोटी खरी सुनाना**—दटावणें; झिडकारणें.

खोटता*—स्त्री. [सं.] खोटेपणा.

खोटाई—स्त्री. [सं.] १ खोटेपणा; दुष्टावा. २ कपट; द्वेष. ३ दोष; वैगुण्य.

खोड़रा—पु. [सं.] जुन्या वृक्षाच्या खोडांतील पोकळी; डोली.

ख़ोद—पु. [फा.] शिरस्त्राण.

खोदना—क्रि. स. [सं.] १ अुकरणें; खणणें. २ कोरणें; नक्षीकाम करणें. ३ चेतविणें; अुत्तेजन देणें. ४ खरडवणें. [विणें.

खोदवाना—क्रि. स. [सं.] खणखोदाई—स्त्री. [सं.] १ खणण्याचें काम; खोदणी. २ खणण्याची मजुरी.

खोना—क्रि. स. [सं.] १ गहाळ करणें; हरवणें; गमावणें. २ विसरणें; टाकून येणें. ३ नासाडी करणें. क्रि. अ. गमावणें; गहाळ होणें.

खोन्चा—पु. [फा.] भेळवाल्याचा हारा ठेवण्याचा कामट्याचा स्टँड किंवा परात.

खोपड़ा—पु. [सं.] १ डोक्याची कवटी. २ डोकें. ३ नारळाचा गुंड; नारळ.

खोपड़ी—स्त्री. [सं.] १ कवटी. २ डोकें. (मु.) **अंधी अथवा औंधी खोपड़ीका**–मूर्ख; बेअकली. **खोपड़ी खा जाना अथवा चाट जाना**–डोकें पिकविणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खोपा—पु. [सं.] १ छप्पराचा कोपरा. २ घराचा रस्त्याला लागून असलेला कोपरा. ३ तीन पेडी वेणी. ४ वेणी. [समूह; झुंड.

खोम*—पु. [अ.] १ जाति. २

खोया—पु. [सं.] खवा.

खोर—स्त्री. [सं.] १ अरुंद गल्ली; बोळ. २ जनावरांना चारा द्यावयाची डोणी. [करणें; नहाणें.

खोरना*—क्रि. अ. [सं.] स्नान

खोरा—पु. [सं.] १ फुलपात्र; पेला; पाणी पिण्याचें भांडें. २ वाडगा.

खोरि*—स्त्री. [सं.] १ अरुंद गल्ली; बोळ. २ दोष; अवगुण. ३ चंदनाचें आडवें गंध.

खोल—पु. [सं.] १ खोळ; अभ्रा. २ जाड चादर. **खोली**—स्त्री.

खोलना—क्रि. स. [सं.] १ अुघडणें. २ सोडणें. ३ मोकळें करणें; खुलें करणें. ४ काढणें (दार वगैरे). ५ प्रकट करणें. ६ भोंक पाडणें.

खोह—स्त्री. [सं.] गुहा; कंदर; गुंफा.

खौफ़—पु. [अ.] भीति; भय; दहशत.

खौर—स्त्री. [सं.] १ त्रिपुंड; चंदनाचें आडवें गंध. २ स्त्रियांचा अेक दागिना. ३ चंदनाची अुटी.

खौरना—क्रि. स. [सं.] गंध लावणें.

खौरा—पु. [सं.] खवडा; अेक प्रकारची खरूज.

खौलना—क्रि. अ. [सं.] अुतास येणें; अुकळणें; सळसळणें.

खौलाना—क्रि. स. [सं.] कढविणें; अुकळविणें.

ख़्यात—वि. [सं.] विख्यात; प्रसिद्ध. **ख़्याति**—स्त्री. ख्याति; प्रसिद्धि.

ख़्याल—पु. [अ.] १ लक्ष्य; ध्यान. २ विचार. ३ कल्पना. ४ स्मरण; आठवण. ५ आदर. ६ मत. **ख़्याली**—वि. कल्पित. (मु.) **ख़्याली पुलाव पकाना**—मनाचे मांडे खाणें; मनोराज्य करणें. **ख़्याल रखना**—लक्ष ठेवणें; लक्ष असणें.

ख़्वाजा—पु. [फा.] १ घरधनी. २ सरदार; पुढारी. ३ प्रतिष्ठित व्यक्ति. ४ अंतःपुरांतील हिजडा नोकर; कंचुकी. [२ स्वप्न.

ख़्वाब—पु. [फा.] १ झोंप; निद्रा.

ख़्वार—वि. [फा.] १ खाणारा; भक्षण करणारा. २ दुर्दशाग्रस्त. ३ तिरस्करणीय.

ख़्वाह—वि. [फा.] अिच्छुक. स्त्री. अिच्छा; कामना. अव्य. अथवा; किंवा; नाहींतर.

ख़्वाहिश—स्त्री. [फा.] अिच्छा; अभिलाषा; आकांक्षा. **ख्वाहिशमंद**—वि. अिच्छुक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग

गंग-वरार—पु. [सं. + फा.] मळींची जमीन; नदीचा प्रवाह बदलल्यामुळें वर आलेला जमिनीचा भाग.

गंग-शिकस्त—पु. [सं. + फा.] प्रवाहानें वाहून गेलेली जमीन.

गंगोझ*—पु. [सं.] गंगोदक; गंगाजल.

गंज—पु. [सं.] १ डोक्याचे केस गळून पडण्याचा रोग; टक्कल. २ डोक्यावर पुरळ होणें. **गंजा**-पु. १ टक्कल पडलेला माणूस; टकल्या. डोक्याचे केस गळून पडण्याचा रोग.

गंज—पु. [फा.] १ ढीग; रास. २ धान्याचा बाजार; मंडी. ३ खजिना. ४ वस्तूंचा संचय.

गंजन—पु. [सं.] १ अवज्ञा; तिरस्कार. २ नाश. ३ दुःख; पीडा. **गंजना**-क्रि. स. १ नाश करणें; चक्काचूर करणें. २ अवज्ञा करणें.

गंजी—स्त्री. [अं.] गंजी-फरास; बनियन.

गंजी—स्त्री. [फा.] रास; ढीग; गंज.

गँजेड़ी—वि. [सं.] गांजा पिणारा.

गँठजोड़ा, गँठबंधन—पु. [सं.] विवाहाचे वेळीं वर व वधूच्या पदरांची गांठ बांधण्याची पद्धत.

गंड—पु. [सं.] १ गाल. २ कानशीळ. ३ फोड. ४ गांठ. ५ चिन्ह; खूण.

गँड़ासा—पु. [सं.] १ परशु. २ गवत कापण्याचा कोयता.

गँड़ेरी—स्त्री. [सं.] अुसाची गंडेरी.

गंता—पु. [सं.] जाणारा.

गंदगी—स्त्री. [फा.] १ अस्वच्छता; गलिच्छपणा; घाण. २ विष्ठा. ३ अपवित्रपणा; अशुद्धता.

गंदना—पु. [सं.] अेक प्रकारचा मसाला (कांदा किंवा लसुणीच्या मसाल्यासारखा).

गँदला—वि. [फा.] घाणेरडा; अस्वच्छ; गलिच्छ.

गंदा—वि. [फा.] १ घाणेरडा; गलिच्छ. २ मळकट; अस्वच्छ.

गंधाना—क्रि. स. [सं.] दुर्गंधित करणें; घाण करणें.

गंधाबिरोजा—पु. [सं. + ?] अेका झाडाचा औषधी चीक; गंधाविरोझा.

गंधी—पु. [सं.] १ अत्तरें, सुगंधी तेलें अि. विकणारा. २ अेक प्रकारचें गवत. ३ अेक किडा.

गंधीला*—वि. [सं.] घाणेरडा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गँवँ*—स्त्री. [सं.] १ संधि; वेळ; योग. २ अुपाय; युक्ति. ३ हेतु; मतलब. ४ पाळत.

गँवई—स्त्री. [सं.] १ लहान गांव; खेडें. २ खेड्यांतील वस्ती.

गँवना*—क्रि. अ. [सं.] जाणें.

गँवरमसला—पु. [सं. + अ.] १ ग्रामीण वाक्प्रचार किंवा म्हण. २ खेडवळांचा वाक्प्रचार.

गँवाना—क्रि. स. [सं.] १ कालक्षेप करणें; वेळ घालविणें. २ हरविणें; गमाविणें.

गँवार-रू—वि. [सं.] १ खेडवळ; गांवठी. २ असभ्य; अशिष्ट. ३ अडाणी; मूर्ख.

गँवारी—स्त्री. [सं.] १ खेडवळपणा; अडाणीपणा. २ मूर्खता. ३ अडाणी स्त्री. वि. १ अडाणी; गांवढळ. २ कुरूप.

गँवेली—स्त्री. [सं.] खेडवळ स्त्री; अडाणी स्त्री.

गँस*—पु. [सं.] १ हाडवैर. २ वर्मी लागणारी गोष्ट.

गँस*—स्त्री. [सं.] बाणाचें टोंक.

गँसना*—क्रि. स. [सं.] १ घट्ट आंवळून बांधणें; जखडणें. २ विणतांना धागे घट्ट करणें.

गँसीला—वि. [सं.] १ घट्ट; मजबूत विणेचा; दणकट. २अणकुचीदार.

गअींद*—पु. [सं.] १ गजेंद्र. २ मोठा हत्ती.

गअीवहोर—वि. [सं.] १ हरवलेली वस्तु पुन्हां मिळविणारा. २ बिघडलेल्या कामाची घडी बसविणारा.

गगरा—पु. [सं.] घागर.

गगरिया, गगरी—स्त्री. [सं.] कळशी; लहान घागर.

गच—पु. [अनु.] १ फरशीची जमीन. २ गच्ची. ३ चुनेगच्ची बनवावयाचा मसाला.

गचकारी,गचगीरी—स्त्री.[अनु.+फा.] चुनेगच्चीचें काम.

गछना*—क्रि. अ. [सं.] जाणें. क्रि. स. चालवून घेणें; निभावणें.

ग़ज़क़—स्त्री. [फा.]१दारू प्याल्यानंतर तोंडाची घाण जाण्यासाठीं खावयाचा पदार्थ (पापड, भजीं, अि.). २ न्याहारी; फराळ.

गजगाह—पु. [सं.] हत्तीची झूल.

ग़ज़ब—पु. [अ.] १ गहजब; राग; संताप. २ जुलूम; अन्याय. ३ आपत्ति. ४ अनपेक्षित गोष्ट.

गजर—पु. [सं.] गजर (घड्याळ, घंटा, वाद्य अि.). (मु.) गजरदम–भल्या पहाटेस.

ग़ज़ल—स्त्री. [अ.] फारशी किंवा अुर्दूतील अेक प्रकारची कविता; गझल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गटकना—क्रि. स. [अनु.] १ गिळणें; गट्ट करणें. २ गडप करणें; लांबविणें.

गटगट—पु. [अनु.] गटागट आवाज (पितांना होणारा आवाज).

गटपट—स्त्री. [अनु.] १ गाढ स्नेह; दाट परिचय. २ निकट सहवास.

गट्टा—पु. [सं.] १ मनगट. २ पायाचा घोंटा.

गट्ठर—पु. [सं.] मोठें गाठोडें; बोजकें.

गट्ठा—पु. [सं.] १ भारा; मोळी; ओझें. २ कांदा किंवा लसूण अि. ची गांठ. ३ मोठें गाठोडें किंवा गठ्ठा.

गठन—स्त्री. [सं.] घडण.

गठना—क्रि. अ. [सं.] १ सांधलें किंवा जोडलें जाणें; जुळणें. २ लांब टाक्याची शिवण असणें. ३ वीण घट्ट असणें. ४ गुप्त विचारांत सामील होणें. ५ वश होणें; गठला जाणें. ६ दाट मैत्री असणें; दृढ संबंध होणें. (यौ.) **गठा बदन**–प्रमाणबद्ध कसलेलें शरीर.

गठरी—स्त्री. [सं.] १ गाठोडें; बोचकें. २ सांठविलेली संपत्ति. (मु.) **गठरी मारना**–ठकविणें; लांबविणें.

गठवाना—क्रि. स. [सं.] १ गांठविणें; गाठून घेणें. २ जोड बसविणें. ३ शिवून घेणें.

गठिया—स्त्री. [सं.] १ ओझ्याचें पोतें; गोणी. २ मोठें गाठोडें. ३ संधिवात.

गठियाना—क्रि. स. [सं.] १ गांठ मारणें. २ वस्त्रांत बांधून घेणें.

गठीला—वि. [सं.] गांठी गांठी असलेला.

गठीला—वि. [सं.] १ प्रमाणबद्ध; डौलदार. २ कसलेला; मजबूत; बळकट.

गठौत-ती—स्त्री. [सं.] १ मैत्री; स्नेह. २ अेकत्र जमून नंतर झालेला निश्चय किंवा बेत.

गड़—पु. [सं.] १ अडोसरा. २ आवार; तट. ३ खड्डा.

गड़गड़—स्त्री. [अनु.] १ मेघ गरजण्याचा आवाज; गडगडाट. २ पोटांतील गुरगुर; आवाज. **गड़-गड़ाना**–क्रि. अ. कडाडणें; गडगड आवाज होणें. क्रि. स. गडगड आवाज करणें. **गड़गड़ाहट**–स्त्री. गडगडाट; कडाडण्याचा आवाज.

गड़दार—पु. [सं.+फा.] १ माहूत. २ माजलेल्या हत्तीवरोवर चालणारा नोकर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गड़ना—क्रि. अ. [सं.] १ बोचणें; टोचणें. २ दुखणें; वेदना होणें; सलणें. ३ दबलें जाणें; गाडलें जाणें; पुरलें जाणें. ४ स्थिर होणें; जम बसणें.

गड़पना—क्रि.स. [अनु.] १ गिळणें; गिळंकृत करणें. २ बळकावणें.

गड़प्पा—पु. [सं.] १ खळगा; खड्डा. २ जाळ्यांत सांपडण्याची जागा.

गड़बड़ाना—क्रि. अ. [सं.] १ गोंधळणें; घोंटाळ्यांत पडणें. २ विघडणें; अव्यवस्थित होणें. ३ अस्ताव्यस्त होणें. क्रि. स. १ भ्रमांत पाडणें; गोंधळांत पाडणें. २ बिघडवून टाकणें; विघडविणें.

गड़बड़िया—वि. [सं.] अुपद्रवी; गडबड्या; अुपद्व्यापी.

गड़रिया, गड़ेरिया—पु. [सं.] धनगर; मेंढपाळ. [गड्डा.

गड़हा—पु. [सं.] खळगा; खड्डा;

गड़ा—पु. [सं.] रास; ढीग.

गड़ाना—क्रि. स. [सं.] टोंचणें; भोंसकणें; खुपसणें.

गड़ाना—क्रि. स. [सं.] दुसऱ्याकडून पुरणें. [टोंचणारा.

गड़ायन*—वि. [सं.] बोंचणारा;

गड़ारी—स्त्री. [सं.] १ वर्तुळ; गोल रेषा. २ आडव्या धारी (वस्त्राच्या). [गिरकी.

गड़ारी—स्त्री. [सं.] कप्पी; चाक;

गड़ारीदार—वि. [सं.+फा.] आडव्या रेघा असलेलें (कापड) (धारीदार).

गड़ुआ—स्त्री. [सं.] तोटी असलेली लोटी; झारी. **गड़ुवा**—पु. तोटीदार लोटा; गडू; गडवा.

गड्डी—स्त्री. [सं.] चवड; चळत; रास; ढीग. [खड्डा.

गड्ढा—पु. [सं.] गढ्ढा; खळगा;

गढ़ंत—वि. [सं.] कल्पित; बनावट (गोष्ट).

गढ़—पु. [सं.] १ गड; किल्ला. २ खाअी; खंदक. **गढ़ी**—स्त्री. लहान किल्ला. **गढ़पति**—पु. किल्लेदार.

गढ़न—स्त्री. [सं.] घडण; बनावट; घाट; डौल.

गढ़ना—क्रि. स. [सं.] १ बनविणें; घडणें. २ बनवून सांगणें; खोटेंनाटें रचणें. **गढ़ाअी**—स्त्री. १ घडणावळ. २ घडण्याचें काम. [बनविणें.

गढ़ाना—क्रि. स. [सं.] घडविणें;

गढ़ाना—क्रि. अ. [सं.] कष्टकर वाटणें; दुःसह होणें. [करणारा.

गढ़िया—पु. [सं.] घडणकाम

गढ़ैया—वि. [सं.] घडण कामाचें; घडणास योग्य.

गत—वि. [सं.] १ झालेला; व्यतीत. २ मेलेला. ३ विरहित. स्त्री. १ गत; अवस्था. २ वाद्यांची गत; वादन (सतार, वीणा अि.).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३ दुर्दशा; दुर्गति. ४ अुपयोग. ५ नाचण्याचा ढंग; तऱ्हा.

गतका-दका—पु. [सं.] गदगा (फरीगदगा).

गतालखाता, गत्तालखाता—पु. [सं. + अ.] बुडीत खातें.

गत्ता—पु. [दे.] पुठ्ठा; पुष्टिपत्र.

गथ—पु. [सं.] १ धनसंपत्ति. २ माल. ३ झुंड; समूह.

गथना*—क्रि. स. [सं.] १ गुंफणें; ओवणें. २ गोष्टी बनविणें; थापा देणें.

गद—पु. [सं.] १ व्याधी. २ विष.

गदकारा—वि. पु. [अनु.] मअू; गुबगुबीत.

गदर—पु. [अ.] १ खळबळ; दंगाधोपा. २ बंड; अुठावणी.

गदराना—क्रि. अ. [अ.] १ पिकणें; बहर येणें. २ यौवनावस्थेंत अंग भरणें. ३ डोळ्यांस चिपडें येणें.

गदहपचीसी—स्त्री. [सं.] गद्धेपंचविशी.

गदहपन—पु. [सं.] गाढवपणा; मूर्खपणा.

गदहा—पु. [सं.] १ गाढव. २ मूर्ख; बेअकली.

गदाथी—स्त्री. [फा.] भिक्षावृत्ति. वि. १ तुच्छ; नीच; क्षुद्र. २ वाह्यात; रद्दी; कुचकामाचा.

गदेला—पु. [अनु.] जाड गादी किंवा रजअी.

गद्दर—वि. [दे.] अर्धवट पिकलेला.

गद्दा—पु. [अनु.] १ जाड गादी. २ गठ्ठा; भारा (गवत, कापूस वगैरेचा). **गद्दी**—स्त्री. १ गादी. २ घामोळें (खोगीराखालीं घालावयाचें). ३ अधिकारपद. ४ तळहात किंवा तळपाय.

गद्दीनशीन—वि. [अनु. + फा.] १ गादीवर बसलेला; सिंहासनारूढ. २ वारस.

गधा—पु. [सं.] गाढव.

गन*—पु. [सं.] १ गण; सेवक; अनुचर. २ झुंड; समूह.

गनगौर—स्त्री. [सं.] चैत्र शुद्ध तृतीया; गौरी बसण्याचा दिवस.

ग़नी—पु. [अ.] धनवान्; श्रीमंत.

ग़नीम—पु. [अ.] १ लुटारू; डाकू. २ शत्रु; वैरी; गनीम.

ग़नीमत—स्त्री. [अ.] १ लुटीचा माल. २ दुःखांत सुखाची गोष्ट. ३ सहजासहजीं हातीं लागलेली वस्तु.

गन्ना—पु. [सं.] अूंस.

गप, गप्प—स्त्री. [सं.] १ गप्प; थाप; बनावट गोष्ट. २ अफवा. ३ बढाअी. ४ गप्पागोष्टी. (यौ.) **गप शप**—१ अिकडच्या तिकडच्या गोष्टी. २ गप्पा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गप—पु. [अनु.] १ अेकदम पदार्थ गिळल्यानें होणारा आवाज. २ भक्षण. (यौ.) **गपागप**–अेकदम; झटदिशीं.

गपकना—क्रि. स. [अनु.] गिळणें; घशांत टाकणें; गिळंकृत करणें.

गपड़चौथ—स्त्री. [सं.] १ भरमसाट किंवा विसंगत गप्पा. २ निरर्थक वडबड. [मारणें.

गपना*—क्रि. स. [सं.] गप्पा

गपोड़ा—पु. [सं.] गप्प; थाप; बनावट गोष्ट.

गप्पा—पु. [सं.] फसवेगिरी; कपट.

गप्पी—वि. [सं.] थापेबाज; गप्पीदास.

गफ़—वि. [फा.] घट्ट व दाट विणीचें (कापड).

ग़फ़लत—स्त्री. [अ.] १ निष्काळजीपणा; बेपर्वाअी. २ चूकभूल.

गफ्फा—पु. [अनु.] १ मोठा घास. २ लाभ; फायदा. [तफर.

ग़बन—पु. [अ.] ठेवीची अफरा-

गबरू—वि. [फा.] १ तरणाबांड; भर ज्वानींतला. २ भोळा; अननुभवी.

गबरुन—पु. [फा.] रेघारेघांचें जाड व मजबूत कापड.

गब्बर—वि. [सं.] १ गबर; श्रीमंत. २ घमेंडी; गर्विष्ठ. ३ मठ्ठ; आळशी.

गभुआर-वार—वि. [सं.] १ जावळ न काढलेला. २ जन्मल्यापासून ठेवलेलें (जावळ). ३ अज्ञ; नादान.

गम—स्त्री. [सं.] प्रवेश; गति (अेखाद्या विषयामध्यें अगर वस्तुमध्यें).

ग़म—पु. [अ.] १ दुःख; शोक. २ चिंता; काळजी. (मु.) **ग़म खाना**–क्षमा करणें. [शील.

ग़मख़ोर—वि. [अ.+फा.] सहन-

ग़मग़लत—पु. [अ.] १ मनोरंजनाचें साधन. २ खेळ; तमाशा. ३ मद्य; दारू.

ग़मगीं—वि. [अ. + फा.] १ अुदास; खिन्न. २ दुःखी.

ग़मज़ा—पु. [अ.] प्रेमिकेचा नखरा किंवा हावभाव.

गमना*—क्रि. अ. [सं.] जाणें; गमत जाणें.

गमला—पु. [?] रोप लावण्याची मातीची कुंडी.

गमाना*—क्रि. स. [सं.] १ गमविणें; वेळ घालविणें. २ हरविणें.

ग़मी—स्त्री. [अ.] १ मरणानंतरचा शोक. २ शोकाचा काल; सुतक. ३ मृत्यु; निधन.

गयंद*—पु. [सं.] गजेंद्र.

गय—पु. [सं.] १ घर. २ धन. ३ आकाश. ४ प्राण. ५ पुत्र.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गय*—पु. [सं.] हत्ती.

गयावाल—पु. [सं.] गयेंतील पंड्या.

गर—पु. [सं.] १ रोग. २ विष; गरळ.

गर*—पु. [सं.] गळा; मान.

ग़रक़ाब—वि. [अ.] पाण्यांत बुडालेला.

ग़रक़ी—स्त्री. [अ.] १ बुडी; डुबकी. २ अतिवृष्टि. ३ आतरती जमीन. ४ पाण्याच्या पृष्ठभागाखालील जमीन; तळ.

गरगज—पु. [सं.] १ किल्ल्याचा बुरूज. २ अुंच टेकाड; टेकडी. ३ नावेचें लाकडी छत. ४ फाशीचा तख्ता. [आवाज.

गरजन*—पु. [सं.] गर्जना; मोठा

गरजना—क्रि. अ. [सं.] गरजणें.

ग़रज़—स्त्री. [अ.] १ गरज; जरुरी. २ आशय; तात्पर्य; प्रयोजन. ३ अिच्छा. ४ अुद्देश्य.

ग़रज़मंद—वि. [अ. + फा.] गरजू; अिच्छुक. [स्वार्थी.

ग़रज़ी—वि. [अ.] आपमतलबी;

गरदन—स्त्री. [फा.] मान; गळा. (मु.) **गरदन अुठाना**–विरोध करणें. **गरदन मारना**–शीर कांपणें. **गरदनियाँ**–स्त्री. गचांडी.

गरदा—पु. [फा.] धूळ; माती; केरकचरा. [छकडा; गाडी.

गरदूँ—पु. [फा.] १ आकाश. २

गरब*—पु. [सं.] १ गर्व; अभिमान. २ हत्तीचा मद. **गरबअी**–स्त्री. गर्विष्टपणा; ताठरता. **गरबित**–वि. घमेंडखोर; गर्विष्ट.

गरबना-बाना*—क्रि. अ. [सं.] गर्व करणें. [पक्ष.

गरमदल—पु. [फा.+सं.] जहाल

गरमागरम—वि. [फा.] गरम; अुष्ण. **गरमागरमी**–स्त्री. १ आवेश; अुत्साह. २ वाचाबाची; भांडण.

गरमाना—क्रि. अ. [फा.] १ गरम होणें; अून होणें. २ मस्त होणें. ३ रागावणें. ४ आवेश चढणें. क्रि. स. तापविणें. **गरमाहट**–स्त्री. अुष्णता.

गरमी—स्त्री. [फा.] १ अुष्णता; तपमान. २ अुन्हाळा. ३ राग; क्रोध. ४ आवेश; अुत्साह. ५ अुष्णता; लाही. ६ अेक स्पर्शजन्य रोग. (मु.) **गरमी निकालना**–गर्व हरण करणें; घमेंड अुतरविणें.

गरराना*—क्रि.अ.[अनु.] गरजणें; मोठा आवाज करणें.

गरह*—पु. सं.] १ ग्रह. २ संकट; अरिष्ट.

गराँव—पु. [सं.] जनावराच्या गळ्यास बांधण्याचा दुहेरी दोर.

गराड़ी—स्त्री. [अनु.] विहिरीचें चाक; कप्पी. [२ पिळणें.

गराना*—क्रि. स. [सं.] १ गाळणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गरास*—पु. [सं.] १ ग्रास; घास. २ पकड.

गरियार—वि. [सं.] सुस्त; आळशी (जनावर).

गरी—स्त्री. [सं.] १ खोबरें. २ गर (फळांतील).

ग़रीबनिवाज़—वि. [अ.+फा.] गरीबांवर दया करणारा; दयाळू.

ग़रीबपरवर—वि. [अ. + फा.] गरीबांचा कैवारी; कनवाळू.

गरुआई-वाई*—[सं.] १ जडत्व; गुरुत्व. २ मोठेपणा.

ग़रूर—पु. [अ.] गर्व; घमेंड.

गरेबान—पु. [फा.] गळपट्टी; सदरा, कुडतें अि. चा गळ्यावरील भाग.

गरैयाँ—स्त्री. [सं.] दावें.

गरोह—पु. [फा.] झुंड; टोळी; समूह.

गर्द—स्त्री. [फा.] धूळ; माती; राख. (यौ.) **गर्दगुबार**–धूळ; केरकचरा.

गर्दख़ोर-ख़ोरा—वि. [फा.] मळखाऊ; लवकर न मळणारें. पु. पायपुसणें.

गर्दना—पु. [फा.] गचांडी.

गर्दिश—स्त्री. [फा.] १ फेरा; चक्कर. २ चक्र (दैव). ३ विपत्ति; संकट.

गलकंबल—पु. [सं.] पोळी (गाय, बैल अि. चा मानेखालील लोंबता भाग).

गलका—पु. [सं.] १ हाताच्या किंवा पायाच्या बोटाला होणारा फोड. २ अेक प्रकारचा चावूक किंवा कोरडा.

गलगंज—पु. [सं.] गोंगाट; कोलाहल; गलबला.

गलचौर—स्त्री. [सं.] गप्पागोष्टी.

गलझंप—पु. [सं.] हत्तीच्या मानेवरील झूल किंवा साखळदंड (लोखंडी).

ग़लत—वि. [अ.] १ चुकीचें; चुकलेलें. २ अशुद्ध. ३ असत्य; खोटें. **ग़लती**–स्त्री. चूक; भूल.

गलतकिया—पु. [सं. + फा.] गिरदी.

ग़लतफ़हमी—स्त्री. [अ. + फा.] १ गैरसमज. २ भ्रम; घोटाळा (समजुतीचा). [स्तन.

गलथना—पु. [सं.] अजागल-

गलथैली—स्त्री. [सं.] माकडाच्या गालांतील थैली. [२ गळणें.

गलन—पु. [सं.] १ पतन; पडणें.

गलना—क्रि. अ. [सं.] १ विरघळणें. २ वितळणें; द्रवीभूत होणें. ३ शिजणें. ४ रोडावणें; सुकणें (शरीर). ५ हातपाय आंखडणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गलबाँही—स्त्री. [सं.] कंठालिंगन; गळ्यांत हात घालणें.

गलमुच्छा—पु. [सं.] कल्ला; गुलमिशा.

गलवाँना—क्रि. स. [सं.] १ विरघळविणें (दुसऱ्याकडून). २ शिजवून घेणें.

गला—पु. [सं.] १ गळा. २ गळा (कपड्याचा). ३ कंठ (आवाज). (मु.) **गला काटना** अथवा **रेतना**–१ गळा कापणें. २ अतिशय त्रास देणें. **गला घुटना**–श्वास थांबणें. **गला छूटना**–व्याद टळणें. **गला छुड़ाना**–तावडींतून सुटणें. **गले लगाना**–आलिंगन देणें.

गलाना—क्रि. स. [सं.] १ विरघळविणें. २ संपविणें. ३ खर्च करणें. ४ शिजविणें.

गलानि*—स्त्री. [सं.] १ ग्लानि; थकवा. २ दुःख; खेद. ३ पश्चात्ताप.

गलित—वि. [सं.] जीर्ण.

गली—स्त्री. [सं.] १ गल्ली; बोळ. २ मोहल्ला; आळी. (मु.) **गली गली मारे मारे फिरना**–दारोदार (पोटासाठीं) हिंडणें.

गलीचा—पु. [फा.] गालिचा.

ग़लीज़—वि. [अ.] १ घाणेरडा; गलिच्छ. २ अस्वच्छ; अशुद्ध. ३ दळदार; भरीव. पु. १ घाणेरडी वस्तु; केरकचरा. २ विष्ठा.

गलेबाज़—वि. [सं. + फा.] गोड आवाजाचा; सुरेल गळ्याचा.

गल्प—स्त्री. [सं.] १ लघुकथा. २ थाप; बनावट गोष्ट. ३ आत्मप्रौढी.

ग़ल्ला—पु. [अ.] १ पीक; शेताचें उत्पन्न. २ धान्य; अन्नसामग्री. ३ दुकानांत दररोज जमणारी रोकड.

गल्ला—पु. [अ.] गडबड; आरडाओरड.

गल्ला—पु. [फा.] झुंड; कळप (जनावरांचा).

गवँ-व—स्त्री. [सं.] १ सांधि; सुयोग. २ अुपाय; युक्ति. (मु.) **गवँसे**–१ सांधि साधून. २ गुपचूप; हळूच.

गवन*—पु. [सं.] गमन.

गवनचार—पु. [सं.] वधूचा वराचे घरीं जाण्याचा संस्कार.

गवनना*—क्रि. अ. [सं.] जाणें; गमन करणें.

गवर्नरी—स्त्री. [इं.] १ हुकमत; शासन. २ गव्हर्नराचा अधिकार, पद.

गवाछ*—पु. [सं.] गवाक्ष; झरोका.

गवारा—वि. [फा.] १ मनपसंत; अनुकूल. २ सह्य; अंगीकार करण्याजोगा. [करणारा.

गवास—पु. [सं.] कसाअी; हत्या

गवाह—पु. [फा.] साक्षीदार; साक्षी. **गवाही**–स्त्री. साक्ष.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गवेषणा—स्त्री. [सं.] शोध; संशोधन. **गवेषी**–वि. शोधक.

गवैंहा—वि. [सं.] गांवकरी; खेडूत.

ग़श—पु. [अ.] मूर्छा; ग्लानि. (मु.) **ग़श खाना**–मूर्च्छा येणें; बेशुद्ध होणें.

गश्त—पु. [फा.] १ भ्रमण; फिरती; दौरा. २ पहारा; गस्त.

गश्ती—पु. [फा.] पहारेकरी. वि. फिरणारा; हिंडणारा. **गश्ती चिठ्ठी**–परिपत्र. स्त्री. कुलटा; व्यभिचारिणी.

गसीला—वि. [सं.] १ घट्ट; आवळून बांधलेलें. २ दाट विणीचें (कापड अि.).

गहगह-गहा*—वि. [सं.] प्रफुल्लित; आल्हादित. क्रि. वि. जोरजोरानें (वाजा, वाद्य अि.).

गहगहाना—क्रि. अ. [सं.] १ आनंदित होणें; प्रसन्न होणें. २ बहर येणें; फुलणें; चांगलें पीक येणें.

गहगहे—क्रि. वि. [सं.] १ आनंदपूर्वक. २ थाटामाटानें.

गहड़ोरना—क्रि. स. [दे.] पाणी गढूळ करणें.

गहन—पु. [सं.] १ ग्रहण. २ कलंक. ३ दुःख; कष्ट.

गहन—वि. [सं.] १ गंभीर; खोल. २ दुर्गम; घन; निबिड. पु. १ खोली; खोलपणा. २ दुर्गम स्थान.

गहन—स्त्री. [सं.] १ पकड. २ हट्ट; आग्रह.

गहना—पु. [सं.] १ दागिना; अलंकार. २ गहाण; तारण.

गहना—क्रि. स. [सं.] पकडणें; धरणें.

गहनि*—स्त्री. [सं.] हट्ट; दुराग्रह.

गहबरना*—क्रि. अ. [सं.] १ गहिंवरणें. २ व्याकुळ होणें; घाबरणें. **गहबर**–वि. १ गहिंवरलेला; व्याकुळ. २ दुर्गम. ३ प्रेमविव्हळ.

गहर-रु—स्त्री. [?] अुशीर; विलंब.

गहर—वि. [सं.] गहन; गूढ.

गहरा—वि. [सं.] १ खोल; अथांग. २ पुष्कळ. ३ बळकट; मजबूत. ४ घट्ट; दाट. (मु.) **गहरी घुटना अथवा छनना**–१ दाट मैत्री असणें. **गहरे लोग**–चतुर व पाताळयंत्री लोक.

गहराना—क्रि. अ. [सं.] खोल होणें. क्रि. स. खोल करणें. **गहराअी**–स्त्री. खोली; खोलपणा.

गाँजना—क्रि. स. [फा.] रास लावणें; ढीग रचणें. **गाँज**–पु. रास; ढीग.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गाँठ—स्त्री. [सं.] १ गांठ. २ गांठोडें. ३ अवयवांचा सांधा. ४ पेर (अूंस, बांबू, बोट अि.). ५ गवताचा भारा; ओझें; गठ्ठा. (मु.) **गाँठ का पूरा**–श्रीमंत.

गाँठगोभी—स्त्री. [सं.] कोबीचा अेक प्रकार; गड्डा.

गाँठदार—वि. [सं.] गांठीगांठीचा.

गाँठना—क्रि. स. [सं.] १ गांठ मारणें; २ टाके मारणें; ठिगळ लावणें. ३ जोडणें. ४ वळवून घेणें; वश करणें; गठवणें. ५ गाठणें; जोडणें (माळ अि.). (मु.) **मतलब गाँठना**–मतलब साधणें.

गाँठी*—स्त्री. [सं.] गांठ.

गाँड़ा—पु. [सं.] १ झाड. २ फांदी किंवा देठाचा लहान भाग (खंड). ३ अुंसाची गंडेरी.

गाँस—स्त्री. [सं.] १ गांठ. २ बंधन; अटकाव. ३ वैर; द्वेष. ४ बाणाचें पोलादी टोंक. ५ देखरेख. ६ अडचण. ७ रहस्य.

गाँसना—क्रि. स. [सं.] १ गुंफणें. २ टोंचणें; भोंक पाडणें. ३ ठांसून भरणें. ४ ताणा घट्ट करणें. ५ ताब्यांत ठेवणें; मुठींत ठेवणें.

गाँसी—स्त्री. [सं.] १ बाणाचें टोंक; २ भाला आदि हत्यारांचा फाळ. ३ गांठ. ४ कपट. ५ किंतु.

गाँहक—पु. [सं.] ग्राहक; गिऱ्हाअीक.

गाअिगोठ*—स्त्री. [सं.] गोशाळा.

गागर-री*—स्त्री. [सं.] कळशी; लहान घागर.

गाछ—पु. [सं.] १ झुडुप; रोपटें. २ झाड; वृक्ष.

गाज—स्त्री. [सं.] १ विजेचा कडकडाट. २ वीज. ३ आरडाओरड; गर्जना.

गाजना—क्रि. अ. [सं.] ओरडणें; गर्जना करणें.

गाड़ी—स्त्री. [सं.] गाडी. **गाड़ीवान**–पु. गाडी हाकणारा; गाडीवाला.

गाढ़ा—वि. [सं.] १ खोल. २ दाट. ३ घट्ट विणीचें (कापड). ४ कठीण; बिकट. (मु.) **गाढ़े की कमाअी**–कष्टाची कमाअी.

गाढ़े—क्रि. वि. [सं.] १ चांगल्या प्रकारें. २ दृढतापूर्वक.

गात—पु. [सं.] गात्र; शरीर.

गाती—स्त्री. [सं.] वस्त्र नेसण्याची अेक पद्धत.

गादा—पु. [सं.] अर्धवट पिकलेलें धान्य (पीक).

गाध—पु. [सं.] १ जागा; स्थान. २ पाण्याचा तळ भाग. ३ नदीचा प्रवाह; धारा. ४ लोभ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गाध—वि. [सं.] १ अथळ. २ थोडा; किंचित्.

गाम*—पु. [सं.] गांव.

ग़ायब—वि. [अ.] अदृश्य; लुप्त.

ग़ार—पु. [अ.] १ खोल खळगा. २ गुंफा; गुहा.

ग़ारत—वि. [अ.] गारद; नष्ट. पु. १ लुटालूट. २ नाश.

गारद—स्त्री. [अं.] पहारेकरी शिपायांची टोळी; गारदी.

गारना—क्रि. स. [सं.] १ पिळणें (पाणी). २ अुगाळणें; रस काढणें. ३ सोडणें; त्यागणें.

गारना—क्रि. स. [सं.] नष्ट करणें.

गारा—पु. [सं.] गिलावा.

गारी—स्त्री. [सं.] १ शिवी. २ कलंक.

गारुड़ी—पु. [सं.] १ सर्पमांत्रिक. २ गारुडी.

गारो*—पु. [सं.] १ गर्व; अभिमान. २ प्रतिष्ठा; मान.

गालगूल*—पु. [सं. + अनु.] अद्वातद्वा गोष्टी.

गाला—पु. [सं.] निवडलेला कापूस; पेळू. (मु.) रूअी का गाला—अतिशय अुज्ज्वल; पांढरा स्वच्छ.

गाला—पु. [सं.] फाजील बोलण्याची संवय; वाचाळपणा.

ग़ालिब—वि. [अ.] १ श्रेष्ठ. २ विजयी. ३ वरचढ.

गाली—स्त्री. [सं.] गाली; शिवी. (मु.) गाली खाना—शिव्या खाणें.

गाली गलौज—स्त्री. [सं.+अनु.] शिवीगाळ.

गालीगुफ़्ता—पु. [सं. + फा.] शिवीगाळ.

गालू—वि. [सं.] १ घमेंडखोर. २ बाताड्या; गप्पीदास.

गाव-कुशी—स्त्री. [फा.] गोवध.

गाव-तकिया—पु. [फा.] लोड; मोठा तक्क्या.

गावदी—वि. [सं.] मठ्ठ; निर्बुद्ध; बेअकली.

गास*—पु. [सं.] संकट; आपत्ति.

गाह—पु. [सं.] १ बुडी मारणारा. २ मर्मज्ञ; विषयांत खोल जाणारा.

गाह*—पु. [सं.] १ पकड. २ मगर.

गाहक—पु. [सं.] ग्राहक; गिऱ्हाअीक. (मु.) जी अथवा प्राण का गाहक—प्राण घेण्यासाठीं टपून बसलेला.

गाहकताअी*—स्त्री. [सं.] गुण-ग्राहकता.

गाहना—क्रि. स. [सं.] १ बुडी मारणें. २ मंथन करणें. ३ पकडणें.

गाहा—स्त्री. [सं.] १ गाथा; कथा. २ वार्ता; वृत्तान्त.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गाही—स्त्री. [सं.] फाडें (पांचांचा गट).

गिंजना—क्रि. अ. [सं.] विसकटल्यामुळें खराब होणें; वाओट होणें (विशेषतः कपडे).

गिचपिच, गिचर-पिचर—वि. [अनु.] अस्पष्ट; गिचमिड (अक्षर).

गिजगिजा—वि. [अनु.] गिजगिजीत; गिळगिळीत; मोकळा नसलेला (भात वगैरे).

ग़िज़ा—स्त्री. [अ.] अन्न; खाद्य पदार्थ; भोजन.

गिटकिरी—स्त्री. [अनु.] गिरकी; तान घेतेवेळीं आवाजांत अुत्पन्न होणारा कंप.

गिटपिट—स्त्री. [अनु.] बडबड (मु.) गिटपिट करना-मोडकें तोडकें अिंग्रजी बोलणें. [खडा.

गिट्टक—स्त्री. [सं.] चिलमींतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जलाना—क्रि. स. [सं.] १ जाळणें. २ पेटविणें; लावणें (दिवा). ३ जाळून राख करणें. ४ पोळविणें; भाजविणें. ५ द्वेष किंवा ईर्ष्या अुत्पन्न करणें. [मत्सर.

जलापा—पु. [सं.] ईर्ष्या; असूया;

जलाल—पु. [अ.] १ तेज; प्रकाश; प्रभा. २ प्रभाव; दरारा; वचक.

जला-वतन—वि. [अ.] देशांतून हद्दपार केलेला. **जला-वतनी**—स्त्री.

जलावन—पु. [सं.] अिंधन; जळण; सरपण. [प्रदेश.

जलाहल—वि. [सं.] जलमय

जलील—वि. [अ.] श्रेष्ठ; वडा.

ज़लील—वि. [अ.] १ तुच्छ. २ अपमानित.

जलूस, जुलूस—पु. [अ.] १ मिरवणूक. २ वरात. [२ वेटोळे.

जलेबी—स्त्री. [सं.] १ जिलबी.

जलोका-लौका—स्त्री. [सं.] जळूं.

जल्द—क्रि. वि. [अ.] जलद; लवकर. **जल्दी**—स्त्री. घाअी; तांतडी.

जल्दबाज़—वि. [अ.+फा.] घाअी करणारा; लवकर काम करणारा.

जल्पना—क्रि. अ. [सं.] मिजास दाखविणें; शेखी मिरविणें.

जल्लाद—पु. [अ.] १ फांशी देणारा. २ क्रूर मनुष्य.

जल्वा—पु. [अ.] शोभा.

जवाँमर्द—वि. [फा.] शूरवीर; मर्द.

जवान—वि. [फा.] १ तरुण. २ वीर. ३ शिपाअी. **जवानी**—स्त्री. तारुण्य; यौवन.

जवाब—पु. [अ.] १ जवाब; अुत्तर. २ फेड; बदला. ३ बरोबरीची किंवा जोडीची वस्तु. ४ नोकरी-वरून काढल्याचा हुकूम. **जवाब दावा**—पु. कोर्टांत वादीच्या अर्जास प्रतिवादीनें दिलेलें अुत्तर. [दार.

जवाबदेह—वि. [अ.+फा.] जवाब-

ज़वाबित—पु. [अ.] नियम; कायदे ('जाब्ता'चें बहु.).

जवाल—पु. [अ.] १ अवनति. २ जंजाळ; संकट.

जवाहर—पु. [अ.] जवाहीर; रत्न.

जवाहरात—पु. [अ.] रत्नें; जड-जवाहीर.

जशन; जश्न—पु. [फा.] १ अुत्सव; समारंभ. २ आनंद; हर्ष.

जस*—क्रि. वि. [सं.] जसा.

जस*—पु. [सं.] यश; कीर्ति.

जस्ता—पु. [सं.] जस्त.

जहँ*—क्रि. वि. [सं.] जेथें.

जहँड़ना-ड़ाना—क्रि. अ. [सं.] १ नुकसान सोसणें. २ फसणें.

जहदा—पु. ?] दलदल.

ज़हन, ज़िहन—पु. [अ.] बुद्धि; धारणा; समज.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जहना*—क्रि. स. [सं.] १ सोडणें; टाकणें. २ नाश करणें.

जहन्नुम—पु. [अ.] नरक. (मु.) जहन्नुममें जाय–चुलींत जावो.

ज़हमत—स्त्री. [अ.] १ आपत्ति; संकट. २ झंझट; बखेडा; भानगड.

ज़हर—पु. [फा.] विष.

ज़हरबाद—पु. [फा.] काळपुळी.

ज़हरमोहरा—पु. [फा.] अेक काळा दगड (यानें सापाचें विष अुतरतें अशी समजूत आहे.).

ज़हरीला—वि. [फा.] विषारी.

जहाँ—पु. [फा.] जग.

जहाँ, जहान—क्रि. वि. [सं.] जेथें; ज्या ठिकाणीं. (मु.) जहाँ का तहाँ–जेथल्या तेथें. जहाँ तहाँ–१ अितस्ततः. २ अिकडेतिकडे; सर्वत्र.

जहाँपनाह—पु. [फा.] १ विश्वाचें रक्षण करणारा. २ सम्राटाचें संबोधन.

जहान—पु. [फा.] जग; दुनिया.

जहालत—स्त्री. [अ.] अज्ञान.

जहिया*—क्रि. वि. [सं.] जेव्हां.

जहीं*—क्रि. वि. [सं.] कोठेंहि.

ज़हीन—वि. [अ.] हुषार; बुद्धिमान्; तैलबुद्धीचा. [नीस.

जहीर—पु. [अ.] साहाय्यक; मदत-

ज़हूर—पु. [अ.] १ प्रकाशन. २ अुत्पन्न होणें; आरंभ. (मु.) जहूरमें आना–प्रगट होणें.

जहेज़—पु. [अ.] लग्नांत वरपक्षाला दिलें जाणारें धन; हुंडा; करणी वगैरे.

जाँगड़ा—पु. [दे.] भाट; चारण.

जाँगर—पु. [सं.] ताकद; सामर्थ्य.

जाँगलू—वि. [फा.] खेडवळ; अडाणी.

जाँघ—स्त्री. [सं.] मांडी. जाँघिया–पु. चड्डी; जंघा.

जाँच—स्त्री. [सं.] १ परीक्षा; तपासणी. २ शोध; चौकशी. जाँच पड़ताल–पु. शोध; चौकशी.

जाँचक, जाचक*—पु. [सं.] याचक; भिकारी. [पारखणें.

जाँचना—क्रि. स. [सं.] तपासणें;

जाँत, जाँता—पु. [सं.] जातें.

जाँवर*—पु. [सं.] गमन.

जा*—सर्व. [सं.] १ जो. २ ज्यांचा.

जाअी—स्त्री. [सं.] कन्या.

जाकड़—पु. [?] जांगड; दुकानांतून मोघम आणलेला माल (पसंतीसाठीं).

जाके*—सर्व. [सं.] ज्याचा.

जाको*—सर्व. [सं.] ज्याला.

जाग*—पु. [सं.] यज्ञ; याग.

जाग—स्त्री. [सं.] जागा; ठिकाण.

जाग—स्त्री. [सं.] जागरण.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जागना—क्रि. अ. [सं.] १ जागें होणें; झोपेंतून अुठणें. २ जाग्रण करणें; जागें राहणें. ३ सावध होणें. ४ अुत्साह येणें; नांवारूपास येणें; प्रज्वलित होणें. जगता–साक्षात्; प्रत्यक्ष.

जागबलिक—पु. [सं.] याज्ञवल्क्य.

जागीर—स्त्री. [फा.] जहागीर. जागीरदार–पु. १ जहागीरदार. २ श्रीमंत; सरदार.

जाजरा*—वि. [सं.] जर्जर; जीर्ण.

जा-ज़रूर—पु. [फा.] शौचकूप; संडास. [जाजम; गालिचा.

जाजम, जाजिम—स्त्री. [फा.]

जाठ—पु. [सं.] गुन्हाळांतील ओंडका.

जाड़ा—पु. [सं.] १ थंडी; गारठा. २ हिंवाळा; शीतकाल. [२ जात.

ज़ात—स्त्री. [अ.] १ शरीर; देह.

जातना—स्त्री. [सं.] १ यातना; कष्ट. २ यमयातना.

जातपाँत—स्त्री. [सं.] जातपात; ज्ञाति.

जातसपति—पु. [सं.] वरुण.

जाती—वि. [अ.] १ व्यक्तिगत. २ आपला; स्वतःचा.

जाते*—अव्य. [सं.] ज्यामुळें.

जादूगर—पु. [फा.] जादूगार. जादूगरी–स्त्री. जादुगिरी.

जान—स्त्री. [फा.] १ प्राण; जीव. २ बळ; सामर्थ्य. ३ सार; तत्त्व. (मु.) जान आना–शोभा येणें. जान के लाले पड़ना–जिवावर बेतणें. जान खाना–त्रास देणें; हैराण करणें. जान छुड़ाना या बचाना–भानगडींतून सुटका करून घेणें. जान पर खेलना–जीव धोक्यांत घालणें.

जान—स्त्री. [सं.] १ अनुमान; अंदाज. २ ज्ञान; माहिती. जान पहचान–परिचय; ओळख.

जानकार—वि. [सं.] १ माहितगार; तज्ज्ञ. २ चतुर; कुशल.

जानदार—वि. [फा.] सजीव; जिवंत.

जानना—क्रि. स. [सं.] १ जाणणें; समजाअून घेणें. २ ओळखणें; माहिती असणें.

जानपना*—पु. [सं.] चातुर्य; बुद्धिमत्ता; जाणतेपणा.

जानमनि—पु. [सं.] ज्ञानी पुरुष.

जानवर—पु. [फा.] १ जनावर; पशु. २ प्राणी; जीव.

जानहु*—अव्य. [सं.] समजा; गृहीत धरा.

जाना—क्रि. अ. [सं.] १ जाणें. २ अलग होणें. ३ नुकसान होणें. ४ हरवणें; गमावणें. ५ गुजरणें; येअून ठेपणें. ६ नष्ट होणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जानि—स्त्री. [सं.] भार्या; पत्नी.
जानिब—स्त्री. [अ.] दिशा; बाजू.
जानी—वि. [फा.] प्राणांशीं संबंध ठेवणारा. जानी दोस्त–जिवश्च कंठश्च मित्र. जानी दुश्मन–हाडवैरी.
जानुपाणि,जानुपानि*—क्रि.वि. [सं.] रांगत (हात व गुडघे टेकत चालणें).
जापक—पु. [सं.] जप करणारा.
जापा—पु. [सं.] सूतिकागृह; बाळंतिणीची खोली.
जाफ़त—स्त्री. [अ.] मेजवानी.
जाफ़रान—पु. [अ.] केशर. जाफ़रानी–वि. केशरी.
जाफ़री—स्त्री. [अ.] १ कामट्यांचा तट्टया. २ झेंडूचें फूल.
ज़ाब्ता—पु. [अ.] नियम; कायदा. ज़ाब्ता दीवानी–पु. दिवाणी कायदा. ज़ाब्ता फौजदारी-फौजदारी कायदा.
जाम—पु. [सं.] याम; प्रहर.
जाम—पु. [फा.] पेला. [कापड.
जामदानी—स्त्री. [फा.] बुट्टीदार
जामन—पु. [सं.] विरजण.
जामा—पु. [फा.] पोशाख. (मु.) जामे से बाहर होना–अत्यंत क्रुद्ध होणें. [संत्री.
जामिक*—पु. [सं.] पहारेकरी;
जामिनी—स्त्री. [सं.] रात्र.
जामुन—पु. [सं.] जांभूळ. जामुनी–वि. जांभळ्या रंगाचा.
जामें*—अव्य. [सं.] १ ज्यांत. २ तर; यासाठीं कीं.
ज़ायक़ा—पु. [अ.] चव; स्वाद.
ज़ायचा—पु. [फा.] जन्मपत्रिका.
जायज़—वि. [अ.] उचित; योग्य. [२ हजेरी.
जायज़ा—पु. [अ.] १ तपासणी.
जायदाद—स्त्री. [फा.] जमीन-जुमला; मालमत्ता.
जायनमाज़—स्त्री. [फा.] नमाज पढतांना जमिनीवर अंथरावयाची लहानशी सतरंजी.
जाया—स्त्री. [सं.] पत्नी.
ज़ाया—वि. [अ.] नष्ट.
ज़ार—पु. [फा.] जागा; स्थान. (यौ.) सब्ज़ ज़ार–हिरवेंगार मैदान.
जारी—वि. [अ.] प्रचलित; चालू.
जारी—स्त्री. [सं.] जारकर्म.
जाल—पु. [सं.] १ मासे किंवा पक्षी धरण्याचें जाळें. २ पाश; जाळें. ३ कोळ्याचें जाळें. (फसविण्याची युक्ति). जालदार– वि. जाळीदार.
जाल—पु. [अ.] कपट; फसवेगिरी.
जालसाज—पु. [अ.+फा.] ठग; फसव्या. जाल साज़ी–स्त्री. १ लबाडी; फसवेगिरी. २ खोटे कागद अगर नाणीं बनविणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाला—पु. [सं.] १ कोळ्याचें जाळें. २ डोळ्यांतील सारा. ३ जाळें. ४ रांजण (पाणी भरून ठेवण्याचा).

जालिका—स्त्री. [सं.] १ समूह. २ जाळी.

ज़ालिम—वि. [अ.] जुलूम करणारा; क्रूर.

जालिया—वि. [सं.] फसव्या; ठग.

जाली—वि. [अ.] वनावटी; खोटा.

जाली—स्त्री. [सं.] १ जाळी. २ कशीदा. ३ जाळीदार कापड. ४ आंब्यांतील केसर; रेषा.

जासु*—वि. [सं.] ज्याचा.

जासूस—पु. [अ.] जासूद; हेर. **जासूसी**–स्त्री. हेराचें काम.

जाह—पु. [अ.] १ श्रेष्ठ पद; किताब. २ प्रतिष्ठा. [धर्मनिष्ठ.

ज़ाहिद—पु. [अ.] अुपासक; **ज़ाहिर**—वि. [अ.] १ जाहीर; प्रगट. २ माहीत असलेला.

जाहिल—वि. [अ.] १ मूर्ख; अज्ञानी. २ अशिक्षित.

ज़ाहिरदार—वि. [अ. + फा.] दिखाअू. **ज़ाहिदारी**–स्त्री. दिखाअूपणा.

ज़ाहिरा—क्रि. वि. [अ.] १ प्रत्यक्ष; अुघड. २ वरवर पाहतां; सकृत्दर्शनीं. [अेक सुगंधी फूल.

जाही—स्त्री. [सं.] जाअीसारखें

ज़िंद—पु. [अ.] भूत.

ज़िंदगी—स्त्री. [फा.] १ आयुष्य; जीवन. २ वय; अुमर. [शाळा.

ज़िंदाँ—पु. [फा.] तुरुंग; बंदी-

ज़िंदा—वि. [फा.] जिवंत. **ज़िंदादिल**–वि. १ आनंदी; प्रसन्न. २ विनोदी.

जिंस, जिनिस—स्त्री. [अ.] १ प्रकार; तऱ्हा. २ वस्तू; जिन्नस. ३ सामान्य; सामग्री. ४ धान्य.

जिंसवार—पु. [अ. + फा.] पेरणीचें नोंदणीबुक (ज्यांत तलाठी शेतांतील धान्यांचीं नांवें लिहितो). वि. जिन्नसवार; क्रमवार.

जिअु*—पु. [सं.] जीव.

ज़िक्र—पु. [अ.] अुल्लेख; चर्चा.

जिगर—पु. [फा.] १ हृदय; काळीज. २ मन; चित्त. **जिगरी**–वि. १ घनिष्ठ; जिवश्च कंठश्च. २ अंतःकरणांतली (गोष्ट); हृदयापासूनची.

जिगरा—पु. [फा.] साहस; हिंमत.

ज़िच-च—स्त्री. [फा.] १ नाअिलाज; असहाय्यता; पेंच; अडचणूक. २ बुद्धिबळाच्या खेळांतील पेंचप्रसंग.

जित—पु. [सं.] विजय. वि. जिंकलेला.

जित*—क्रि. वि. [सं.] जिकडे.

जितना—वि. [सं.] जितका.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जितवना*—क्रि. स. [सं.] अुघड करणें; प्रकट करणें.

जितवाना, जिताना—क्रि. स. [सं.] जिंकविणें.

जिते*—वि. [सं.] जितके.

जितै*—क्रि. वि. [सं.] जेथें; जिकडे.

जितो*—वि. [सं.] जितका.

ज़िद—स्त्री. [अ.] १ हट्ट; दुराग्रह. २ वैर; शत्रुत्व. जिद्दी–वि. हट्टी; दुराग्रही. [जेथें.

जिधर—क्रि. वि. [सं.] जिकडे;

जिन—सर्व. [सं.] १ जे. २ ज्यांनीं. ३ ज्यांचा (' जिस 'चें बहु.).

जिन—पु. [अ.] भूत.

ज़िना—पु. [अ.] परस्त्रीगमन. ज़िनाकार–वि. व्यभिचारी. पु. जबरी संभोग.

जिन्ह*—सर्व. [सं.] ज्यांचा.

जिमाना—क्रि. स. [सं.] खाअूं घालणें; जेवावयास घालणें.

जिमि*—क्रि. वि. [सं.] जसें; ज्या प्रकारें.

ज़िम्मा—पु. [अ.] १ जिम्मा; हमी; जबाबदारी. २ देखरेख.

ज़िम्मादार, ज़िम्मेदार—पु. [अ.+फा.] जबाबदार; अुत्तरदायी.

ज़िम्मावार, ज़िम्मेवार—पु. [अ.] जबाबदार. अुत्तरदायी. जिम्मावारी–स्त्री. जबाबदारी; अुत्तरदायित्व.

जिय*—पु. [सं.] जीव; चित्त; मन; हृदय.

जियन*—पु. [सं.] जीवन.

जियवधा—पु. [सं.] हत्यारा; प्राणदंड देणारा.

जियरा*—पु. [सं.] जीव.

ज़िया, ज़ियान—पु. [फा.] १ हानि; नुकसान. २ तोटा.

जियाना*—क्रि. स. [सं.] १ जगविणें. २ पालन करणें.

ज़ियाफ़त—स्त्री. [अ.] १ मेजवानी. २ पाहुणचार; आतिथ्य.

ज़ियारत—स्त्री. [अ.] तीर्थयात्रा.

जियारी*—स्त्री. [सं.] १ जीवन; आयुष्य. २ अुपजीविका.

जिरगा—पु. [तु.] १ गट; टोळी. २ झुंड.

जिरह—स्त्री. [अ.] १ हुज्जत; तक्रार. २ अुलट तपासणी.

ज़िरह—स्त्री. [फा.] कवच; चिलखत. ज़िरही–वि. चिलखत घातलेला; कवचधारी.

जिला—स्त्री. [अ.] चकाकी; पॉलिश. (मु.) जिला देना–घांसून चकचकीत करणें; पॉलिश करणें.

ज़िला—पु. [अ.] जिल्हा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज़िलादार, ज़िलेदार—पु. [अ.+ फा.] जमीनदाराचा खंड वसूल करणारा सरकारी अधिकारी.

जिलाधीश—पु. [अ. + सं.] जिल्ह्याचा मुख्य अधिकारी; कलेक्टर.

जिलाना—क्रि. स. [सं.] १ जीवदान देणें. २ रक्षण करणें. ३ पालनपोषण करणें.

जिलाकार, जिलासाज़—पु. [अ. + फा.] हत्यारें अि. ना धार लावणारा.

जिल्द—स्त्री. [अ.] १ पुष्टिपत्र; पुस्तकाचा पुठ्ठा. २ चामडी; त्वचा. ३ कातडें.

जिल्दबंद, जिल्दसाद—पु. [अ.+ फा.] पुस्तकांची बांधणी करणारा; बुकबाअिंडर.

ज़िल्लत—स्त्री. [अ.] १ अनादर; अपमान. २ दुर्दशा; दुर्गति. (मु.) ज़िल्लत अुठाना या पाना–अपमानित होणें.

जिस्ता—पु. [सं.] जस्त.

जिस्म—पु. [अ.] शरीर; देह.

जिह*—स्त्री.[सं.] धनुष्याची दोरी.

ज़िहन—पु. [अ.] बुद्धि; अक्कल (मु.) जिहन खुलना–बुद्धीचा विकास होणें. ज़िहन लड़ाना–डोकें चालविणें; खूप विचार करणें. ज़िहननशीन होना–लक्षांत येणें.

जिहाद—पु. [अ.] धर्मयुद्ध.

जी—पु. [सं.] १ चित्त; हृदय; मन. २ प्रकृति; तब्येत. ३ शक्ति; धैर्य. ४ निश्चय; संकल्प. (मु.) जी खट्टा होना–विरक्त होणें; मन विटणें; मन अुडून जाणें. जी अुचटना अथवा अुड़ जाना–मन अुडणें. जी चुराना–अंगचोरपणा करणें; काम चुकविणें. जी टँगा रहना अथवा होना–चिंतित असणें. जी निढाल होना–मन ठिकाणावर नसणें. जी पर आ बनना–जीवावर बेतणें. जी भर आना–हृदय भरून येणें (दुःखानें). जी लगना–लक्ष लागणें. जी भरकर–यथेच्छ.

जीअ–अु*—पु. [सं.] जीव.

जीअन*—पु. [सं.] जीवन.

जीजा—पु. [सं.] मेहुणा (वडील बहिणीचा नवरा).

जीजी—स्त्री. [सं.] वडील बहीण.

जीट—स्त्री. [दे.] मिजास; शेखी.

जीत—स्त्री.[सं.] १ जय. २ फायदा.

जीतना—क्रि. स. [सं.] जिंकणें; विजय मिळविणें.

जीता—वि.[सं.] १ जिवंत. २ वजन किंवा मापांत किंचित् अधिक.

जीन*—वि. [सं.] १ वृद्ध. २ जुना.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज़ीन—पु. [फा.] खोगीर. ज़ीन-पोश-पु. खोगिरावर घालण्याचें कापड.

ज़ीनत—स्त्री. [फा.] शोभा.

ज़ीनसवारी—स्त्री. [फा.] खोगीर घालून घोड्यावर बसणें.

ज़ीना—पु. [फा.] जिना; शिडी.

जीना—क्रि. अ. [सं.] १ जिवंत राहणें. २ प्रसन्न होणें. (मु.) जीता जागता-जिवंत; धट्टाकट्टा. जीती मक्खी निगलना-हेतुपुरस्सर अन्याय किंवा अनुचित काम करणें.

ज़ीफहम—वि. [अ.] समंजस; हुषार; बुद्धिवान्.

जीभ—स्त्री. [सं.] १ जीभ. २ जीभ (धुनकणीला असलेला चामड्याचा तुकडा).

जीमना—क्रि. स. [सं.] जेवणें.

जीय*—पु. [सं.] जीव.

जीयति*—स्त्री. [सं.] जीवन; आयुष्य. [२ जिरें.

जीर—पु. [सं.] १ फुलाचें केसर.

जीरण, जीर्ण—वि. [सं.] जीर्ण.

जिरा—पु. [सं.] जिरें.

जीवट—पु. [सं.] धाडस; हिंमत.

जीवरा*—पु. [सं.] जीव; प्राण. जीवरि-पु. जीवन.

जीवा-जून*—पु. [सं.] जीवजंतु; प्राणिमात्र.

जीह, जीहि*—स्त्री. [सं.] जीभ.

जीहा*—स्त्री. [सं.] जिव्हा; जीभ.

जु*—वि. [सं.] जो.

जुआ—पु. [सं.] जुगार. जुआरी-पु. जुगारी.

जुआँ—स्त्री. [सं.] लीख; ऊ.

जुआचोर—पु. [सं.] ठग; फसव्या.

जुकाम—पु. [सं.] पडसें; सर्दी.

जुग*—पु. [सं.] १ युग. २ जोडी; युग्म. ३ पिढी.

जुगजुगाना—क्रि. अ. [सं.] १ लुकलुकणें. २ अुन्नति होणें; वर येणें.

जुगत, जुगुत—स्त्री. [सं.] १ अुपाय; युक्ति. २ व्यवहारचातुर्य; हातचलाखी.

जुगनी—स्त्री. [सं.] काजवा. जुगनू-पु. काजवा.

जुगवना—क्रि. स. [सं.] १ अेकत्र करणें; सांठविणें. २ काळजीपूर्वक ठेवणें.

जुगालना—क्रि. अ. [सं.] रवंथ करणें. जुगाली-स्त्री. रवंथ.

जुज़—पु. [अ.] १ फॉर्म (छपाई). २ भाग; हिस्सा. अव्य. शिवाय; अतिरिक्त.

जुज़बी—वि. [अ.] थोडा; किंचित्; कांहींसा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जुज्झ, जूझ—स्त्री. [सं.] लढाई; युद्ध. **जुझाऊ**-वि. युद्धविषयक. **जुझार**-वि. लढाऊ; वीर.

जुट—स्त्री. [सं.] १ जोडी; युग्म. २ गट; टोळी.

जुटना—क्रि. अ. [सं.] १ सांधलें जाणें; संयुक्त होणें; संबद्ध होणें. २ गुंतणें; गुंडाळणें जाणें. ३ संघटित होणें.

जुटली—वि. [सं.] केसाच्या लांब जटा असलेला.

जुटाना—क्रि. स. [सं.] १ सांधणें; जोडणें. २ अेकत्र करणें; जमविणें; संघटन करणें.

जुट्टी—स्त्री. [सं.] लहान पेंढी; जुडी (गवत वगैरेची).

जुठारना—क्रि. स. [सं.] अर्धवट खाऊन टाकणें; अुष्टें करणें. **जुठिहारा**-पु. अुष्टें खरकटें खाणारा.

जुड़ना—क्रि. अ. [सं.] १ जुटणें; संयुक्त होणें. २ संबद्ध होणें. ३ संभोग करणें. ४ अेकत्रित होणें; संघटित होणें.

जुड़पित्ती—स्त्री. [सं.] नायटा; त्वचेचा अेक रोग.

जुड़वाँ—वि. [सं.] जुळें. पु. जुळीं मुलें.

जुड़ाअी, जोड़ाअी—स्त्री. [सं.] गवंडीकाम किंवा त्याची मजुरी.

जुड़ाना—क्रि. अ. [सं.] १ थंड होणें; गार होणें. २ संतुष्ट होणें; प्रसन्न होणें. क्रि. स. १ गार करणें. २ संतुष्ट करणें.

जुतना—क्रि. अ. [सं.] १ जुंपणें (गाडी, नांगर). २ कामास जुंपणें किंवा लागणें.

जुतवाना—क्रि. स. [सं.] दुसऱ्याकडून जुंपून घेणें.

जुताअी, जोताअी—स्त्री. [सं.] जुंपणी; नांगरण्याचें काम; मळणी.

जुतियाना—क्रि. स. [सं.] १ जोड्यानें मारणें. २ अपमान करणें. [जथा.

जुत्थ*—पु. [सं.] झुंड; समूह;

जुदा—वि. [फा.] वेगळें; पृथक्; अलग. **जुदाअी**-वियोग; विरह.

जुद्ध*—पु. [सं.] युद्ध.

जुन्हारी-स्त्री. [सं.] ज्वारी; जोंधळा.

जुन्हाअी, जुन्हैया—स्त्री. [सं.] १ चांदणें. २ चंद्र.

जुपै*—अव्य. [सं.] जर.

जुबराज—पु. [सं.] युवराज.

जुमला—पु. [अ.] १ पूर्ण वाक्य. २ अेकूण वेरीज. वि. अेकूण. (यौ.) **फिलजुमला**-तात्पर्य हें कीं.

जुमा—पु. [अ.] शुक्रवार.

जुमेरात—स्त्री. [अ.] गुरुवार.

जुरअत—स्त्री. [अ.] साहस; हिंमत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जुरझरी—स्त्री. [सं.] १ कणकण; ताप येण्यापूर्वीची कसकस. २ थंडी.

जुरना*—क्रि. अ. [सं.] जोडलें जाणें; संयुक्त होणें.

जुरमाना, जुर्माना—पु. [फा.] दंडाची शिक्षा.

जुराफ़ा—पु. [अ.] जिराफ.

जुर्म—पु. [अ.] गुन्हा; अपराध.

जुर्रा—पु. [फा.] ससाणा (नर).

जुर्राब—स्त्री. [तु.] पायमोजा.

जुल—पु. [सं.] फसवणूक.

जुलाब, जुल्लाब—पु. [अ.] रेचक; जुलाब. [(पाणी).

जुलाल—वि. [अ.] शुद्ध; स्वच्छ

जुलाहा—पु. [फा.] विणकर; कोष्टी; साळी.

जुलूस—पु. [अ.] मिरवणूक.

ज़ुल्फ़—स्त्री. [फा.] डोक्याचे लांब सडक केस (पाठीवर रुळणारे); केसाच्या बटी; झुलूप.

ज़ुल्म—पु. [अ.] जुलूम; अत्याचार; अन्याय. (मु.) जुल्म ढाना–अत्याचार करणें.

ज़ुल्मत—स्त्री. [अ.] काळोख; अंधार. जुल्मात–स्त्री. अंधार जागा. बहरे जुल्मात–अटलँटिक महासागर.

जुस्तजू—स्त्री. [फा.] शोध; तपास; हुडकून काढण्याची धडपड.

जुहार—स्त्री. [सं.] जोहार (क्षत्रियांतील नमस्कारपद्धति).

जुहारना—क्रि. स. [सं.] मदतीची याचना करणें.

जूँ—स्त्री. [सं.] ऊ. (मु.) कानों-पर जूँ रेंगना–डोकें ताळ्यावर येणें; शुद्धीवर येणें.

जूआ—पु. [सं.] जुगार.

जूआ—पु. [सं.] १ जूं (बैलाच्या मानेवरील); जोकड. २. जात्याचा खुंटा.

जूजू—पु. [अनु.] वागुलबोवा; भोकाडी.

जूझना*—क्रि. अ. [सं.] १ लढणें; झुंजणें. २. लढून मरणें. जूझ–स्त्री. लढाऊ; युद्ध.

जूट—पु. [सं.] केसांची वट.

जूठन—स्त्री. [सं.] अुष्टें; खरकटें. जूठा–वि. अुष्टा; अुच्छिष्ट.

जूड़ा—पु. [सं.] १ आंबाडा; बुचडा. २ शेंडीची गांठ.

जूड़ी—स्त्री. [सं.] थंडीताप.

जूता—पु. [सं.] जोडा; पादत्राण. जूता अुठाना–खुशामत करणें. जूतों दाल बँटना–आपसांत तंटा होणें. जूती–स्त्री. बायकांचा जोडा.

जूताख़ोर—वि. [सं. + फा.] निर्लज्ज; बेशरम.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जूतीपैज़ार—स्त्री. [सं. + फा.] १ जोडाजोडी (जोड्यानें केलेली मारामारी). २ लढाई.

जूथ, जूह—पु. [सं.] झुंड; समूह.

जून—पु. [सं.] समय; काळ; वेळ.

जून—पु. [सं.] गवत.

जूप—पु. [सं.] द्यूत; जुगार.

जूमना*—क्रि. अ. [अ.] अेकत्र होणें; जमणें.

जूर*—पु. [सं.] संचय.

जूस—पु. [सं.] वरणाचें पाणी (पेजेप्रमाणें रोग्यास पाजतात).

जूसताक़—पु. [सं.+फा.] जुगाराचा अेक प्रकार.

जूसी—स्त्री. [सं.] अुंसाचा रस आटवितांना निघणारी मळी.

जूही—स्त्री. [सं.] जुअीचें झाड.

जे, जेथि, जेथु, जेथू*—सर्व. [सं.] जो, जी, जें.

जेंवना—क्रि. स. [सं.] जेवणें; खाणें. **ज़ेंवन**-पु. जेवण; भोजन.

जेठ—पु. [सं.] १ ज्येष्ठ महिना. २ वडील दीर. वि. थोरला; मोठा.

जेठा—वि. [सं.] वडील; मोठा. **ज़ेठाअी**-स्त्री. वडीलकी; मोठेपणा. **ज़ेठानी**-स्त्री. वडील जाअू.

जेठीमधु—स्त्री. [सं.] ज्येष्ठमध.

जेठौत—पु. [सं.] वडील दिराचा मुलगा.

जेतिक*—क्रि. वि. [सं.] ज्या प्रकारें; जितक्या प्रमाणांत.

जेते-तो*—वि. [सं] जितका. क्रि. वि. ज्या प्रकारें.

जेब—स्त्री. [अ.] खिसा. **जेबी**-वि. खिशांत ठेवण्याजोगा; अगदीं लहान.

जेबकट—पु. [अ.+सं.] खिसेकापू.

जेबखर्च-पु. किरकोळ खर्चाकरितां मिळालेले पैसे.

जेबघड़ी—स्त्री. [अ. + सं.] खिशांतील घड्याळ.

जेर—स्त्री. [दे.] वार; जार (गर्भाभोंवतालचें वेष्टण).

ज़ेरबार—वि. [फा.] खर्च किंवा कर्जानें जेरीस आलेला.

जेवनार—स्त्री. [सं.] १ पंगत; जेवणावळ. २ भोजन.

जेलख़ाना—पु. [अं.+फा.] तुरुंग.

जेवर—पु. [फा.] दागिना.

जेवरी—स्त्री. [सं.] दोरी.

ज़ेहन—पु. [अ.] धारणाशक्ति.

जेहर-रि—स्त्री. [?] तोरड्या.

जेहलख़ाना—पु. [अं.+फा.] तुरुंग.

जेद्दि*—सर्व. [सं.] ज्याला.

जै*—स्त्री. [सं.] जय; विजय.

जैतून—पु. [अ.] ऑलिव्ह झाड.

जैनु*—पु. [सं.] जेवण; आहार.

जैयद—वि. [अ.] १ अत्यंत मोठा; श्रेष्ठ. २ बळकट. ३ सुपीक. ४ अुत्तम.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज़ैलदार—पु. [अ.+फा.] महालकरी.

जैसा—वि. [सं.] १ जसा; ज्या प्रकारचा. २ जितका; जेवढ्या प्रमाणांत. क्रि. वि. जसें; ज्या प्रकारें. (मु.) जैसे तैसे–कसें तरी; मुष्किलीनें.

जैसे—क्रि. वि. [सं.] ज्या प्रकारें; जसें. [प्रकारें.

जों—क्रि. वि. [सं.] जसें; ज्या

जोंक—स्त्री. [सं.] जळूका.

जों तों—क्रि. वि. [सं.] जों जों; तों तों.

जोंधरी—स्त्री. [सं.] १ जोंधळा; ज्वारी. २ बाजरी (कांहीं ठिकाणीं).

जो—सर्व. [सं.] जो.

जो—अव्य. [सं.] यदि; जर.

जोअना, जोवना*—क्रि. स. [सं.] १ वाट पाहणें. २ पाहणें; शोधणें; हुडकून काढणें. ३ बघणें; अवलोकन करणें. [बायको.

जोअि*—स्त्री. [सं.] पत्नी;

जोखता-खिता*—स्त्री. [सं.] योषिता; स्त्री.

जोखना—क्रि.स. [सं.] १ जोखणें; तोलणें; वजन करणें. २ तपासणें.

जोखा—पु. [सं.] हिशेब.

जोखिम—स्त्री. [सं.] अरिष्ट; आपत्ति.

जोगता*—स्त्री. [सं.] योग्यता.

जोगन-गिन, जोगिनी—स्त्री. [सं.] योगीण; जोगीण. **जोगिया, जोगी**–पु. योगी.

जोगवना—क्रि. स. [सं.] १ जतन करणें; राखणें. २ संचय करणें; जमविणें. ३ आदर करणें. ४ दुर्लक्ष करणें.

जोगानल—स्त्री. [सं.] योगशक्तीनें उत्पन्न झालेला अग्नि.

जोगिंद, जोगींद्र—पु. [सं.] योगीश्रेष्ठ; योगींद्र.

जोगोटा*—वि. [सं.] योगी.

जोट*—पु. [सं.] १ जोडी; युग्म. २ साथी; जोडीदार. वि. बरोबरीचा; समान.

जोटा*—पु. [सं.] जोडी; युग्म.

जोड़—पु. [सं.] १ जोड; गांठ. २ बेरीज. ३ ठिगळ. ४ जोडीदार; बरोबरीचा. ५ बरोबरी; समानता. ६ मेळ; मिलाफ. ७ सांधा.

जोड़न—स्त्री. [सं.] विरजण.

जोड़ना—क्रि. स. [सं.] १ जोडणें; जुळविणें. २ बेरीज करणें. ३ अेकत्र करणें.

जोड़वाँ—वि. [सं.] जुळीं (मुलें).

जोड़वाअी, जोड़ाअी—स्त्री. [सं.] जोडून घेण्याचें काम किंवा मजुरी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जोड़वाना—क्रि. स. [सं.] जोडवून घेणें; जुळवून घेणें.

जोड़ा—पु. [सं.] १ जोडा; जोडी; युग्म. २ पादत्राण; जोडा.

जोत—स्त्री. [सं.] जोतें; बैल जुंपतांना गळ्यांत जूं अडकविण्याचा पट्टा.

जोतना—क्रि. स. [सं.] १ जुंपणें. २ कामास लावणें. ३ नांगरणें. **जोताई**—स्त्री. नांगरण्याचें काम किंवा मजुरी.

जोत-ति-र्ता—स्त्री. [सं.] १ जोत; ज्योत. २ तुपाचा दिवा.

जोतखी-तिखी*—पु. [सं.] ज्योतिषी.

जोता—पु. [सं.] जोतें.

जोतिस-ष—पु. [सं.] भविष्य; ज्योतिष.

जोधा*—पु. [सं.] योद्धा.

जोन-नि*—स्त्री. [सं.] योनि.

जोन्ह-न्हाई*—स्त्री. [सं.] १ चांदणें. २ चंद्र. [जरी.

जोपै, जौपै—अव्य. [सं.] यद्यपि;

ज़ोफ़—पु. [अ.] १ म्हातारपण. २ अशक्तपणा; कमजोरी.

जोबन, जौबन—पु. [सं.] यौवन; तारुण्य.

ज़ोम—पु. [अ.] १ जोम; अुत्साह. २ आवेश. ३ अभिमान.

जोय*—स्त्री. [सं.] पत्नी; बायको.

जोयना*—क्रि. स. [सं.] दिवा लावणें; पेटविणें.

जोयसी*—पु. [सं.] ज्योतिषी.

ज़ोर—पु. [फा.] १ जोर; बळ; शक्ति. २ अुत्कर्ष; वाढ. ३ अधिकार; तावा. ४ आवेश. ५ वेग; गति. ६ आश्रय; आधार. (यौ.) ज़ोरशोर-धूमधडाका; धामधूम.

ज़ोरावर—वि. [फा.] बलवान्; सामर्थ्यवान्.

जोरी*—स्त्री. [सं.] जोडी; युग्म.

जोरी*—स्त्री. [फा.] बळजबरी.

जोरू—स्त्री. [सं.] पत्नी; बायको.

जोश—पु. [फा.] १ आवेश; अुत्साह; जोम. २ मनोवेग; मनाची अस्वस्थता. (मु.) जोश खाना-अुकळणें. **जोशीला**-वि. आवेशयुक्त; जोमदार; भावनाप्रधान.

जोशन—पु. [फा.] १ बाजुबंद. २ चिलखत; कवच.

जोशाँदा—पु. [फा.] काढा (वनस्पतीचा).

जोष-षिता—स्त्री. [सं.] स्त्री; नारी.

जोष—स्त्री. [सं.] प्रेम; प्रीति.

जोह-हन*—स्त्री. [सं.] १ शोध; तपास. २ प्रतीक्षा; वाट पाहणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जोहना—क्रि. स. [सं.] १ पाहणें. २ हुडकणें; तपास करणें. ३ वाट पाहणें.

जोहारना–क्रि. अ. [सं.] लवून नमस्कार करणें; मुजरा करणें. जोहार–स्त्री. नमस्कार; वंदन; प्रणाम.

जौं*—अव्य. [सं.] जर.

जौंधैया*—स्त्री. [सं.] चांदणें; ज्योत्स्ना.

जौंराभौंरा—पु. [सं.] तळघर.

जौ—पु. [सं.] जव (अेक धान्य).

जौजा—स्त्री. [अ.] बायको; पत्नी.

जौन*—सर्व. [सं.] जो.

जौन*—पु. [सं.] यवन.

जौलौं*—क्रि. वि. [सं.] १ ज्याप्रमाणें. २ जोंपर्यंत.

जौहर—पु. [अ.] १ जवाहीर; रत्न. २ तत्त्व; सार; जौहर. जौहरी–पु. १ जवाहिऱ्या; जडजवाहीर विकणारा. २ रत्नपारखी.

ज्ञापक—वि. [सं.] सूचक.

ज्ञापन—वि. [सं.] दाखविण्याचें काम. ज्ञापित–वि. दाखविलेला.

ज़्यादती—स्त्री. [अ.] १ अधिकता. २ अत्याचार; जबरदस्ती.

ज़्यादा—वि. [अ.] अधिक; पुष्कळ.

ज़्याफ़त—स्त्री. [अ.] १ मेजवानी. २ आदरातिथ्य. [शास्त्र.

ज्यामिति—स्त्री. [सं.] भूमिति-

ज्यूँ*—अव्य. [सं.] जसें; ज्या प्रकारें.

ज्यों*—क्रि. वि. [सं.] १ जसें; ज्याप्रमाणें. २ ज्या क्षणीं. ज्यों ज्यों–जसजसें. ज्यों त्यों–कसेंबसें.

ज्योनार, ज्यौनार—स्त्री. [सं.] १ जेवणावळ; मेजवानी. २ स्वयंपाक.

ज्यौ*—अव्य. [सं.] जर.

ज्वलंत—वि. [सं.] अत्यंत स्पष्ट; धडधडीत; ठळक.

ज्वार—स्त्री. [सं.] ज्वारी; जोंधळा.

ज्वारभाटा—पु. [सं.] भरती; ओहटी.

झ

झँक-खना—क्रि. अ. [सं.] १ पश्चात्ताप करणें. २ शोक करणें; रडगाणें गाणें.

झंखड़—पु. [अनु.] १ काटेरी झाड किंवा झुडूप. २ पानें झडलेलें झाड. ३निरुपयोगी टाकाऊ वस्तूंचा समूह.

झँगा, झगा—पु. [फा.] झगा; लहान मुलांचा अंगरखा.

झंझट—स्त्री. [अनु.] भानगड; तंटाबखेडा; विनाकारण त्रास; पंचाअीत.

झंझर—पु. [सं.] पाण्याचा खुजा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झँझरा—वि. [अनु.] बारीक भोंकें असलेलें. **झंझरी**–स्त्री. १ जाळीदार वस्तू. २ जाळीची खिडकी.

झंझा—पु. [सं.] झंझावात.

झंझी—स्त्री. [दे.] फुटकी कवडी.

झँझोड़ना—क्रि. स. [सं.] हिसके मारणें; हिसडे देणें.

झंडा—पु. [सं.] झेंडा; ध्वज.

झँडूला—वि. [सं.] १ दाट पालवीचें (झाड). २ केसाळ. ३ जावळ न काढलेलें (मूल).

झंप—पु. [सं.] लांब अुडी.

झँपना—क्रि. अ. [सं.] १ झांकलें जाणें. २ झेप-झाप टाकणें; अुडी मारणें. ३ लाजणें. [पडदा.

झँपरी—स्त्री. [सं.] पालखीवरील

झँपान—पु. [सं.] डोली (डोंगरी मुलुखांतील). [झाकलेलें.

झंपित—वि. [सं.] आच्छादित;

झँपोला—पु. [सं.] लहानशी टोपली.

झँवराना—क्रि. अ. [सं.] १ काळें पडणें. २ कोमेजणें; फिकें पडणें.

झँवा—पु. [सं.] वज्री.

झँवाना—क्रि. अ. [सं.] १ काळें पडणें. २ अग्नि मंदावणें. ३ कोमेजणें. ४ वज्रीनें घासलें जाणें.

झँसना—क्रि. स. [सं.] १ठगविणें; लुबाडणें. २ डोक्याला किंवा टाळूला तेल अि. चोळणें.

झअीँ, झाअीं*—स्त्री. [सं.] १ सावली; पड छाया. २ प्रतिबिंब. ३ झळक; प्रकाश.

झक—स्त्री. [अनु.] विक्षिप्तपणा; तऱ्हेवाअीकपणा. **झक्की, झक्कड़**–वि. विक्षिप्त; तऱ्हेवाअीक; विलक्षण.

झककेतु, झखकेतु—पु. [सं.] कामदेव; मदन.

झकझक—स्त्री. [अनु.] १ हुज्जत. २ वटवट; बडबड.

झकझका—वि. [अनु.] चकचकीत; लखलखीत; झगझगीत. **झकझकाहट**–स्त्री. चकाकी; चकचकाट; लखलखाट.

झकझेलना, झकझोरना—क्रि. स. [अनु.] १ हिसके देणें; हिसडे देणें. २ खूप हलविणें; झटका देणें. **झकझोर–रा**–पु. झटका; हिसडा; हिसका.

झकाझक—वि. [अनु.] चकचकीत; सफाअीदार.

झकोरना—क्रि. अ. [अनु.] वाऱ्याचा झोत येणें. **झकोर**–पु. १ वाऱ्याचा झोत. २ झुळूक.

झक्कड़—पु. [अनु.] १ झंझावात; सोसाट्याचा वारा; तुफान वावटळ. २ विक्षिप्त; विलक्षण.

झक्की—वि. [अनु.] १ वाचाळ; तोंडाळ. २ विक्षिप्त; तऱ्हेवाअीक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झगड़ा—पु. [अनु.] भांडणतंटा.

झगड़ालू—वि. [अनु.] भांडकुदळ; भांडखोर.

झगला, झगा—पु. [दे.] झबलें.

झञ्झर—स्त्री. [सं.] खुजा.

झझकन*—स्त्री. [अनु.] संकोच.

झझकना—क्रि. अ. [अनु.] १ घाबरून थबकणें. २ गांगरणें; गोंधळून जाणें. ३ रागावणें; त्रागा करणें. ४ सावध होणें. झझक—स्त्री. भीतीनें किंवा गांगरून थबकणें; घाबरणें.

झझकाना—क्रि. स. [अनु.] भय किंवा भीति दाखवून थबकाविणें किंवा थोपविणें.

झझकारना—क्रि. स. [अनु.] १ दटावणें;दरडावणें. २तुच्छ लेखणें.

झट—क्रि. वि. [सं.] झटदिशीं; लवकर; लागलेच; झटकन्.

झटकना—क्रि. स. [सं.] १ झाडणें; झटकणें. २ हिसडा देणें. ३ लुबाडून घेणें.

झटकारना—क्रि. स. [सं.] १ झाडणें; झटकणें. २ हिसडा देणें; लुबाडून घेणें. [लगेच.

झटपट—अव्य. [अनु.] झटकन्;

झटिति*—क्रि. वि. [सं.] १ चटपट; झटपट. २ विचार न करतां.

झड़न—स्त्री. [सं.] झड.

झड़ना—क्रि. अ. [सं.] झडणें; गळून पडणें.

झड़पना—क्रि. अ. [अनु.] १ झडप घालणें; झुंजणें; भांडणें. २ हिसकावून घेणें. झड़प—स्त्री. झडप.

झड़बेरी—स्त्री. [अनु. + सं.] पडलेलीं बोरें.

झड़वाना—क्रि. स. [सं.] झाडविणें.

झड़ाझड़—क्रि.वि. [अनु.] सतत; सारखें.

झड़ी—स्त्री. [अनु.] १ झड; पावसाचा सतत वर्षाव. २ झोड.

झनकना—क्रि. अ. [सं.] १ झनझन आवाज होणें. २ रागानें हातपाय आपटणें.

झनझनाना—क्रि. अ. [अनु.] झणझण आवाज होणें.

झनिया—वि. [सं.] १ झिरझिरीत; पातळ. २ विरळ; जाळीदार. ३ किडकिडीत अशक्त.

झन्नाहट—स्त्री. [अनु.] झणत्कार.

झप—क्रि. वि. [सं.] झटदिशीं; तावडतोव; त्वरेनें.

झपक—स्त्री. [सं.] १ पापण्यांची झांपड; झांप. २ पापणी लवण्यास लागणारा वेळ; निमिष. ३ डुलकी; किंचित् झोंप.

झपकना—क्रि. अ. [सं.] १ पापणी लवणें. २ डुलकी घेणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झपकाना—क्रि. स. [अनु.] वारंवार पापण्या लवविणें.

झपकी—स्त्री. [अनु.] १ गुंगी; झांपड. २ बहाली; तंबी.

झपकौंहा*—वि. [अनु.] डोळ्यांत झोंप भरलेला; तंद्रींत असलेला.

झपटना—क्रि. अ. [सं.] अेखाद्यावर तुटून पडणें. झपट-स्त्री. झडप.

झपना—क्रि. अ. [अनु.] (पापण्या) मिटणें; बंद होणें; डुलकी घेणें.

झपाना—क्रि. स. [अनु.] डोळे मिटविणें; बंद करविणें.

झपित—वि. [अनु.] झांकलेला.

झपेटना—क्रि. स. [अनु.] झडप घालणें. झपेट-स्त्री. झडप.

झबरा-रीला—वि. [अनु.] झिपऱ्या असलेला (कुत्रा); लांब केस असलेला.

झबरैला—वि. [अनु.] झिपऱ्या असलेला.

झवा-ब्बा—पु. [अनु.] जरीचा गोंडा; गुच्छ; झुपका; गोटा.

झवार-रि*—स्त्री. [अनु.] तंटा-बखेडा.

झमकना—क्रि.अ.[अनु.]चमचमणें; चकचकणें. झमक-स्त्री. १ चमक; तेज; लकाकी. २ अुजेड; प्रकाश. ३ नखरेबाज चाल.

झमकाना—क्रि. स. [अनु.] चकाकविणें.

झमकारा—वि. [अनु.] गडगडणारे (मेघ).

झमना—क्रि. अ. [अनु.] वाकणें; लवणें.

झमाका—पु. [अनु.] १ दागिन्यांचा ध्वनि. २ पाअूस पडतांना होणारा आवाज. ३ नखरा.

झमेला—पु. [अनु.] भानगड; बखेडा. झमेलिया-वि. भानगड करणारा; भांडखोर; अुपद्व्यापी.

झर—स्त्री. [सं.] १ झरा. २ पावसाची झड. ३ दाह; झळ.

झरकना*—क्रि. अ. [सं.] १ झळकणें. २झिडकारणें. झरक-स्त्री.झळक.

झरना—पु. [सं.] झरा; झरणी.

झरना—क्रि. अ. [सं.] १ झिरपणें. २ झड लागणें.

झरपना—क्रि. अ. [अनु.] १ झोडपणें (पावसाचें). २ झडप घालणें; तुटून पडणें.

झरबी*—स्त्री. [सं.] मासा.

झरसना—क्रि. अ. [अनु.] १ होरपळून जाणें. २ कोमेजणें; सुकणें.

झरहरना—क्रि. अ. [अनु.] झरझर शब्द होणें.

झराझर—क्रि. वि. [अनु.] १ अेकसारखें; लागोपाठ. २ वेगानें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झरी—स्त्री. [सं.] पावसाची सर; झड; झरा. [गवाक्ष.

झरोखा—पु. [अनु.] झरोका; **झलक**—स्त्री. [सं.] १ चमक. २ छाया. [दार.

झलकदार—वि.[सं.+फा.] चमक-

झलकना—क्रि. अ. [सं.] चमकणें; लखलखणें.

झलकनि*—स्त्री. [सं.] झळक.

झलका—पु. [सं.] फोड.

झलकाना—क्रि. स. [सं.] चमकविणें; दर्शविणें. [चकाट.

झलझल—स्त्री. [सं.] चमक; चक-

झलझलाना—क्रि. अ. [अनु.] चमकणें. झलझलाहट–स्त्री. चकचकाट; चकाकी.

झलना—क्रि. स. [सं.] पंखा हालविणें (वाऱ्यासाठीं). क्रि. अ. हालणें; डोलणें.

झलमलाना—क्रि. अ. [सं.] मंदमंद प्रकाश होणें; लुकलुकणें. झलमल–पु. झगमग.

झलवाना—क्रि. स. [सं.] पंखा चालविणें (दुसऱ्याकडून).

झलाझल—वि. [अनु.] लकलकीत.

झलावोर—पु. [सं.] कलाबतूनें भरलेला लुगड्याचा पदर.

झल्लाना—क्रि. अ. [सं.] चिडणें; रागावणें; त्रागा करणें.

झष—पु. [सं.] लहान मासा.

झसना—क्रि. स. [अनु.] लुबाडणें; ठकविणें.

झहरना-राना*—क्रि. अ. [अनु.] झरझर आवाज होणें (पावसाच्या झडीचा आवाज). [ग्लानि.

झाँअी—स्त्री. [अनु.] भोंवळ;

झाँअी—स्त्री. [सं.] १ छाया; पडछाया. २ अंधार. ३ धोका. ४ प्रतिध्वनि. (मु.) झाँअीं वताना–फसविणें.

झाँकना-खना—क्रि. अ. [सं.] डोकावणें; हळूच पाहणें. झाँक–स्त्री. डोकावून पाहावयाची क्रिया.

झाँकी—स्त्री. [सं.] १ अेका दृष्टिक्षेपांत दिसणारें दृश्य. २ झाकी; सजावट. ३ झरोका.

झाँगला—वि.[दे.] ढिला अंगरखा.

झाँझन—स्त्री. [अनु.] पैंजण.

झाँझरी—स्त्री. [दे.] १ झांझ. २ पैंजण. [२ झापड.

झाँप—स्त्री. [सं.] १ झांकण.

झाँपना—क्रि. स. [सं.] १ झांकणें; पांघरूण घालणें. २ शरमणें; लाजणें.

झाँवना—क्रि. स. [सं.] हातपाय घासून धुणें; वज्रीनें घासणें.

झाँवर—वि. [सं.] १ काळसर २ कोमजलेला. ३ मलिन. ४ सुस्त.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाँवाँ—पु. [सं.] पाय घासण्याचा दगड; वज्री.

झाँसना—क्रि. स. [सं.] लुबाडणें; ठकविणें. झाँसा–पु. फसवणूक.

झाअू—पु. [सं.] अेक प्रकारचें नदीकांठचें झुडुप.

झाग—पु. [सं.] पाण्यावरील फेस.

झाड़—पु. [सं.] झाड; वृक्ष. (मु.) झाड़ फानूस–कांचेची हंडी; झुंबर अि.

झाड़झंखाड़—पु. [सं. + अनु.] १ झाडेंझुडुपें. २ निरुपयोगी वस्तु.

झाड़दार—वि. [सं.+फा.] दाट पालवीचें.

झाड़न—स्त्री. [सं.] १ केरकचरा. २ झटकणी. ३ झाडणी.

झाड़ना—क्रि. स. [सं.] १ झाडणें; झटकणें. २ खरडपट्टी काढणें; झाडणें. ३ भूतपिशाच काढून टाकणें.

झाड़फूक—स्त्री. [सं.] मांत्रिकाचा अुपचार. [साफसुफ.

झाड़बुहार—स्त्री. [सं.] झाडझूड; **झाड़ा**—पु. [सं.] १ झडती; तपासणी. २ शौच. ३ शौचकूप. झाड़ी–स्त्री.

झापड़—पु. [सं.] थप्पड;चपराक.

झाबर, झावा—पु. [सं.] करंडी; टोपली; हारा.

झाम*—पु. [सं.] गुच्छ; गोटा.

झायँझायँ—स्त्री. [अनु.] झणझण आवाज; वाऱ्याची सळसळ.

झावँझावँ—स्त्री. [अनु.] १ झन्झन् असा आवाज. २ बडबड; वटवट. ३ हुज्जत.

झार-रि-री—वि. [सं.]१ दाह; आग. २ आंच; झळ.

झारना—क्रि. स. [सं.] १ केस विंचरणें. २ निवडणें.

झारहीं*—अव्य. [सं.] करपल्यामुळें; भाजल्यामुळें. [गड्.

झारी—स्त्री. [सं.] झारी; तोटीचा

झाल—पु. [सं.] झांज. स्त्री. तिखटपणा; झणझणीतपणा.

झालना—क्रि. स. [?] डाग लावणें; झाळणें. [मासा.

झिंगवा—स्त्री. [सं.] अेक लहान

झिंगुली—स्त्री. [?] झगा.

झिझकना—क्रि. अ. [अनु.] १ चिडणें; त्रागा करणें. २ भीतीमुळें थबकणें. ३ सावध होणें.

झिझकारना—क्रि. स. [अनु.] झिडकारणें; दटावणें.

झिझोड़ना—क्रि. स. [दे.] ओढाताण करणें.

झिड़कना—क्रि. स. [अनु.] झिडकारणें.

झिपना—क्रि. अ. [सं.] शरमणें; लाजणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झिपाना—क्रि. स. [सं.] लाजविणें.

झिलना—क्रि. अ. [?] १ शिरणें; घुसणें. २ तृप्त होणें. ३ तल्लीन होणें.

झिलम—स्त्री. [अनु.] लोखंडी शिरटोप.

झिलमिल—स्त्री. [अनु.] १ झगमग; लुकलुकणें. २ कवच.

झिलमिला—वि. [अनु.] १ विरळ; झिरझिरीत. २ चमकणारा. ३ अस्पष्ट.

झिलमिलाना—क्रि. अ. [अनु.] लुकलुकणें.

झिलमिली—स्त्री. [अनु.] झिरझिरीत पडदा. २ चिकाचा पडदा.

झिल्लड़—वि. [सं.] झिरझिरीत; जाळीदार.

झिल्ली—स्त्री. [सं.] १ विरविरीत पातळ पडदा. २ पापुद्रा.

झिल्ली—पुं. [सं.] घुरघुरा किडा.

झींक-का—पु. [दे.] दळतांना जात्यांत घालावयाचा घांस; मूठ.

झींखना—क्रि. अ. [सं.] १ पश्चात्ताप करणें; पस्तावणें. २ रडगाणें गाणें.

झींगा—पु. [सं.] अेक प्रकारचा मासा.

झींगुर—पु. [अनु.] घुरघुरा किडा.

झींसी—स्त्री. [अनु.] पावसाचे बारीक तुषार.

झीना—वि. [सं.] पातळ; झिरझिरीत; विरविरीत.

झील—स्त्री. [सं.] सरोवर.

झीलर—पु. [सं.] लहान सरोवर.

झींवर—पु. [सं.] कोळी.

झुंझलाना—क्रि. अ. [अनु.] चिडणें; खिजणें; कावणें.

झुंड—पु. [सं.] झुंड; समूह.

झुकना—क्रि. अ. [सं.] वांकणें; लवणें; झुकणें. [बसणें.

झुकराना—क्रि. अ. [?] धक्का

झुकवाना—क्रि. स. [सं.] झुकविणें. वाकविणें (दुसऱ्याकडून).

झुकाना—क्रि. स. [सं.] वाकविणें; लवविणें; झुकविणें.

झुकाव—पु. [सं.] १ वाक. २ कल; प्रवृत्ति. ३ अुतार.

झुटपुटा—पु. [अनु.] झुंजुरकें (पहाटे व सायंकाळीं); पहाटेचा अंधुक प्रकाश; संधिप्रकाश.

झुटुंग—वि. [सं.] खवीस; केस वाढलेला.

झुठलाना—क्रि. स. [सं.] १ खोटें ठरविणें. २ खोटेंनाटे सांगून फसविणें. [असत्यता.

झुठाई—स्त्री. [सं.] खोटेपण;

झुठाना—क्रि. स. [सं.] खोटें ठरविणें.

झुनक—पु. [अनु.] झणत्कार.

झुनकना—क्रि. अ. [अनु.] झुणझुण आवाज होणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झुनझुना—पु. [अनु.] खुळखुळा.

झुनझुनाना—क्रि. अ. [अनु.] झुणझुण आवाज होणें.

झुनझुनी—स्त्री. [अनु.] हातापायांना मुंग्या येणें.

झुमका—पु. [सं.] डूल (दागिना).

झुमना—क्रि. अ. [सं.] झोक जाणें.

झुरझुरी—स्त्री. [अनु.] हुडहुडी.

झुरमुट—पु. [सं.] १ झाडझुडुप. २ झुंड; समूह.

झुरना—क्रि. अ. [सं.]१ वाळणें; कोरडें पडणें. २ झुरणें; दुःखानें क्षीण होणें.

झुरवाना—क्रि. स. [सं.] झुरविणें.

झुरसना, झुलसना—क्रि. अ. [सं.] १ भाजणें; होरपळून निघणें. २ अुन्हानें काळें पडणें.

झुर्री—स्त्री. [सं.] सुरकुती; सळ.

झुलना—पु. [सं.] झोपाळा.

झुलनी—स्त्री. [सं.] नथेंतील मोत्यांचा झुपका.

झुलसवाना—क्रि. स. [सं.] होरपळविणें. [जाळणें.

झुलसाना—क्रि. स. [सं.] भाजणें;

झुलाना—क्रि. स. [सं.] १ झोका देणें; झुलविणें. २ ताटकळत ठेवणें.

झूँक—पु. [सं.] वाऱ्याचा झोत.

झूंझल—स्त्री. [अनु.] धुसफुस.

झूँटा—पु. [सं.] झिंज्या.

झूझना—क्रि. अ. [सं.] झुंजणें.

झूठ—पु. [सं] खोटें; असत्य. झूठमूठ—क्रि. वि. खोटेंनाटें.

झूठा—वि. [सं.] १ खोटा; लबाड; खोटें बोलणारा. २ कृत्रिम; नकली.

झूमक-का—पु. [सं.] १ होळीच्या सणांत स्त्रियांचें घेरा करून झुलत-डुलत नाचतांना गावयाचें गाणें. २ कर्णफूल.

झूमड़झामड़—पु. [सं.] खोटेंनाटें; अुपद्व्याप.

झूमना—क्रि. स. [सं.] १ झुलणें; डुलणें; आंदोलणें. २ हालत-डुलत चालणें; झोके खाणें.

झूमर—पु. [सं.] डूल.

झूर-रा—वि. [सं.] १ वाळलेला; शुष्क. २ रिकामा; रिता. ३ अुष्टा.

झूरै—क्रि. वि. [सं.] व्यर्थ; निरर्थक.

झूलन—पु. [सं.] १ श्रावणांत हिंदोळ्यावर बसून गाणीं म्हणण्याचा अुत्सव. २ झोका; हिंदोळा.

झूलना—क्रि. अ. [सं.] झोका घेणें; आंदोलणें.

झूला—स्त्री. [सं.] १ झोका; झोला; हिंदोळा. २ झोपाळा; पाळणा.

झेंपना, झेपना—क्रि. अ. [सं.] खजील होणें; लाजणें; शरमणें.

झेंपू—पु. [अनु.] शरमिंदा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झेर*—स्त्री. [फा.] १ विलंब. २ तंटाबखेडा.

झेलना—क्रि. स. [सं.] १ स्वतःवर ओढून घेणें; सहन करणें. २ ढकलणें. ३ पोहतांना पाणी कापणें.

झोंक—स्त्री. [सं.] १ कल; प्रवृत्ति. २ झपाटा; जोर; वेग. ३ थाटमाट. ४ धामधूम.

झोंकना—क्रि. स. [सं.] १ झुगारणें. २ विस्तवांत फेंकणें.

झोंकवाना—क्रि. स. [सं.] फेंकविणें.

झोंका—पु. [सं.] १ झोका; हेलकावा. २ हिसडा; झटका. ३ झोक; थाटमाट. [२ फेंकणें.

झोंकाई—स्त्री. [सं.] १ झुगारणें.

झोंझ—पु. [दे.] घरटें.

झोंझल—स्त्री. [अनु.] चीड; चिरड; राग. [२ वेणी. ३ झिंज्या.

झोंटा—पु. [सं.] १ आंवाडा.

झोंपड़ा—पु. [अनु.] झोपडें; झोपडी. झोपड़ी-स्त्री.

झोंपा—पु. [अनु.] गुच्छ; गोटा.

झोंटिंग—वि. [सं.] केसाळ; झिपऱ्या असलेला.

झोरि-री—स्त्री. [सं.] १ झोळी. २ पोट. [जवळ; समीप.

झोरे—क्रि. वि. [?] निकट;

झोल—पु. [सं.] १ भाजीचा रस्सा; २ झोळ; पदर; घोळ. ३ चूकभूल. ४ कोळ्याचें जाळें.

झोलदार—वि. [सं. + फा.] झोळ असलेला.

झोला—पु. [सं.] झोळी.

झोली—स्त्री. [सं.] झोळी.

झौर—पु. [सं.] १ गुच्छ; गोटा. २ झुंड; समूह.

झौरना—क्रि. अ. [अनु.] वळकावून बसणें; झडप घालून वळकावणें.

झौंसना—क्रि. स. [सं.] भाजणें.

झौंसियत—स्त्री. [सं.] अग्नीच्या ज्वाळा.

झौड़—पु. [देश.] तंटा; भांडण.

झौर—पु. [अनु.] हुज्जत; तकार.

झौरना—क्रि. स. [सं.] झटका देऊन हालविणें. [जवळ.

झौरे—क्रि. वि. [?] समीप;

झौहाना—क्रि.अ. [अनु.] गुरकावणें.

ट

टंक—पु. [सं.] शिक्का.

टँकना—क्रि. अ. [सं.] १ टांके घालणें. २ नोंद करणें; टांचण करणें. ३ टाकी लावणें.

टँकवाना, टँकाना—क्रि.स. [सं.] १ टांके घालून घेणें. २ टाकी लावून घेणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टंकारना, टंकोरना—क्रि. स. [सं.] धनुष्याची दोरी ओढून आवाज करणें.

टंकी—स्त्री. [सं.] टांकी; पाणी सांठविण्याचें पीप.

टंकोर—पु. [सं.] टणत्कार.

टँगड़ी, टँगरी—स्त्री. [सं.] तंगडी.

टँगना—क्रि. अ. [सं.] १ टांगलें जाणें; लोंबकळणें; लटकणें. २ फांसावर लटकणें. पु. कपडे टांगण्याची दोरी.

टँगारी—स्त्री. [सं.] कुऱ्हाड.

टंच—वि. [सं.] कृपण; कंजुष.

टंटघट—पु. [अनु.] १ पूजेचें अवडंबर. २ काठकवाड.

टंटा—पु. [अनु.] १ तंटा; झगडा. २ अुपद्रव; दंगा.

टअी*—स्त्री. [सं.] युक्ति; अुपाय.

टकटका*—पु. [सं.] टक लावून पाहणें; स्थिर व अेकाग्र दृष्टि. टकटकी—स्त्री. टक; अेकसारखी नजर.

टकटोना, टकटोरना—क्रि. स. [सं.] १ चांचपडणें; हुडकणें. २ हातानें गुंडाळणें. [पडणें.

टकटोहना—क्रि. स. [सं.] चांच-

टकराना—क्रि. अ. [अनु.] १ टक्कर होणें; आदळणें; आपटणें. २ दारोदार हिंडणें. क्रि. स. १ आदळणें; आपटणें. २ लढविणें; झुंजविणें.

टकसाल—स्त्री. [सं.] टांकसाळ. टकसाली—वि. १ चालू; प्रचलित; प्रमाणित. २ टांकसाळीचा. ३ व्यवहारांतील.

टका—पु. [सं.] १ ढब्बू पैसा. २ पैसा. ३ धन; द्रव्य. टकैत—वि. धनी; श्रीमंत.

टकासी—स्त्री. [सं.] रुपयामागें दोन पैसे व्याजाचा दर.

टकुआ—पु. [सं.] टकळी.

टकोरना—क्रि. स. [सं.] १ हलका आघात करणें. २ शेकणें.

टकोर—स्त्री. [सं.] १ जखम; आघात; प्रहार (सौम्य प्रमाणांत). २ चपराक. ३ नगाऱ्याचा आवाज. ४ टणत्कार.

टखना—पु. [सं.] पायाचा घोटा.

टगड़ी—स्त्री. [सं.] तंगडी; पाय.

टटका—वि. [सं.] ताजा; नवीन; नुकताच तयार झालेला.

टटीबा—पु. [अनु.] कप्पी; चाक.

टटोलना—क्रि. स. [सं.] १ चांचपडणें. २ शोधणें; हुडकणें. ३ ठाव घेणें (अंतःकरणाचा); ताडणें (अंतःकरण); अंतःकरणाचा भाव जाणणें. ४ पारख करणें.

टट्टर—पु. [सं.] ताटवा; तट्टी.

टट्टी—स्त्री. [सं.] १ तट्टया. २ पडदा. ३ पायखाना; शौचकूप.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टट्टू—पु. [अनु.] तट्टू; लहान घोडा.

टनकना—क्रि.अ.[अनु.] १ अुन्हानें डोकें ठणकणें. २ ठणठण आवाज होणें. [सुदृढ प्रकृतीचा.

टनमन-ना—वि. [सं.] टुणटुणीत;

टप—पु. [सं.] टप; तट्या (गाडीवरील आच्छादन).

टप—पु. [अिं.] टाकी; टव.

टप—स्त्री. [अनु.] 'टप् टप्' असा आवाज.

टपक—स्त्री. [अनु.] १ टपकण्याची क्रिया. २ थांबून थांबून होणारी पीडा; वेदना; कळ.

टपकना—क्रि. अ. [अनु.] १ थेंब थेंब गळणें; टपकणें (द्रव पदार्थ). २ गळणें; खालीं पडणें (फळ). ३ ठणकणें (वेदना). ४ झळकणें. टपका-पु. १ गळून पडलेली वस्तू. २ पिकून पडलेलें फळ. ३ ठणका.

टपकाटपकी—स्त्री. [अनु.] पावसाची लहानशी सर; पाअूस पडणें; बुरबुर.

टपकाना—क्रि. स. [अनु.] १ थेंब थेंब गाळणें. २ अर्क काढणें.

टपना—क्रि. स. [सं.] १ जेवणासाठीं ताटकळत बसणें; अुपाशीं राहणें. २ तिष्ठत बसणें; खोळंबणें.

टपाना—क्रि. स. [सं.] जेवण्यासाठीं ताटकळत बसविणें.

टमटम—स्त्री. [अिं.] अेक प्रकारची घोडागाडी; व्हिक्टोरिया.

टमटी—स्त्री. [दे.] अेक प्रकारचें भांडें.

टमाटर—पु. [अिं.] टोमॅटो.

टर—स्त्री. [अनु.] १ कर्णकटु शब्द. २ असभ्य वचन. ३ बेडकाचा आवाज.

टरकना—क्रि. अ. [सं.]१ निसटणें; सटकणें.२ वाजूला होणें;निघून जाणें.

टरकाना—क्रि. स. [सं.] १ निसटण्यास प्रवृत्त करणें. २ धुडकावून लावणें. ३ टाळणें; घालवून देणें; हुसकावून देणें.

टरटराना—क्रि. अ. [अनु.] १ बडबड किंवा वटवट करणें. २ अुद्दामपणें बोलणें.

टर्राना—क्रि. अ. [अनु.] अुर्मटपणानें अुत्तर देणें. टर्रा-वि. अुर्मट; अुद्दाम. टर्रापन-पु. अुर्मटपणा; अुद्दामपणा; अुद्दामपणा (भाषणांत).

टलना—क्रि. अ. [सं.] १ निसटणें; निघून जाणें; सटकणें. २ नाहींसें होणें; न राहणें. ३ टळून जाणें. ४ आज्ञेचें अुल्लंघन करणें. ५ लांबणीवर टाकणें. (मु.) अपनी बात से टलना-प्रतिज्ञा पूर्ण न करणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टवाअी—स्त्री. [सं.] व्यर्थ भटकणें; निष्प्रयोजन हिंडणें.

टस—स्त्री. [अनु.] 'टस' असा आवाज. (मु.) टस से मस न होना-अचल राहणें.

टसक—स्त्री. [अनु.] ठणका; राहून राहून होणारी पीडा; वेदना.

टसकना—क्रि. अ. [सं.] १ निसटणें; बाजूला सरणें. २ ठणकणें; ठसठसणें.

टसकाना—[सं.] निसटूं देणें; निसटण्यास प्रवृत्त करणें.

टसुआ—पु. [सं.] आंसू; अश्रू.

टहना—पु. [सं.] झाडाची फांदी.

टहनी—स्त्री. [सं.] डहाळी; शाखा; फांदी.

टहल—स्त्री. [सं.] १ सेवा; चाकरी. २ शुश्रूषा. (यौ.) टहल टअी अथवा टहल टकोर-१ सेवा. २ नोकरी; चाकरी.

टहलना—क्रि. अ. [सं.] १ हिंडणें; फिरणें. २ सावकाश चालणें; फिरावयास जाणें; हवा खाणें. (मु.) टहल जाना-निसटणें; सटकणें.

टहलनी—स्त्री. [सं.] १ दासी; मोलकरीण. २ दिव्याची वात सरकविण्याची काडी.

टहलाना—क्रि. स. [सं.] फिरावयास नेणें; सावकाश चालविणें.

टहलुआ, टहलू—पु. [सं.] १ नोकर; सेवक. २ भटक्या. ३ वढाळ (जनावर).

टहोका—पु. [अनु.] धक्का; हिसडा. (मु.) टहोका खाना-धक्का खाणें. टहोका देना-धक्का मारणें.

टाँक—स्त्री. [सं.] १ तीन किंवा चार माशांचें वजन. २ अटकळ; अदमास.

टाँक—स्त्री. [सं.] १ लिखाण; अक्षर. २ लेखणीचें टोंक.

टाँकना—क्रि. स. [सं.] १ शिवणें; टाका घालणें; जोडणें. २ टाकीचे घाव घालणें. ३ टिपणें; लिहिणें. ४ लुबाडणें. ५ चट्ट करणें.

टाँका—पु. [सं.] १ शिवण. २ ठिगळ. ३ टाके. ४ टाकी लावण्याची छन्नी. ५ पाण्याची टाकी किंवा हौद. ६ पाण्याचें पीप.

टाँकी—स्त्री. [सं.] १ टाकी (हत्यार). २ छन्नी (टाकीनें घडलेलें चिन्ह).

टाँग—स्त्री. [सं.] पाय; टांग. (मु.) टाँग अड़ाना-विनाकारण व्यत्यय आणणें. टांगत ले ले निकलना-पराभव करणें.

टाँगन—पु. [सं.] तट्टू.

टाँगना—क्रि. स. [सं.] १ टांगणें; लटकावणें. २ फांसावर चढविणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टाँगा—पु. [सं.] १ मोठी कुऱ्हाड. २ तांगा (गाडी).

टाँच—स्त्री. [सं.] १ अडथळा; मोडता; मोडती. २ टांका (शिवण). ३ ठिगळ.

टाँचना—क्रि. स. [सं.] १ टांके घालणें. २ कापणें.

टाँट-टा—वि. [अनु.] १ कठीण; कडक; टणक. २ दृढ; मजबूत.

टाँड़—स्त्री. [सं.] १ सामान ठेवण्याची लांकडाची फळी. २ शेताची राखण करावयासाठीं घातलेला लहानसा मांडव.

टाँड़ा—पु. [सं.] १ तांडा;काफला. २ लमाण; कुटुंब; परिवार.

टाँयटाँय—स्त्री. [अनु.] वडबड; वटवट. (मु.) टाँयटाँय फिस्–काम थोडें पण बडबड फार.

टाट—पु. [सं.] तरट. (मु.) टाट में पाट की बखिया–वुढी घोडी लाल लगाम. टाट उलटना-दिवाळें निघणें.

टाटर—पु. [सं.] १ हाडांचा सांपळा. २ कवटी. [पडदा.

टाटिका—स्त्री. [सं.] तट्टया;

टानना—क्रि. स. [सं.] ताणणें; खेंचून धरणें. टान–स्त्री. ताण.

टाप—स्त्री. [सं.] १ कोंबडी ठेवण्याचा कामटी पेटारा. २ घोड्याची टाप. ३ कोळ्याचें जाळें (टोपलीच्या आकाराचें).

टापना—क्रि. अ. [सं.] वस्तू मिळविण्यासाठीं हैराण होणें; वणवण फिरणें. क्रि. स. शुडी मारणें.

टापा—पु. [सं.] १ निर्जन व ओसाड मैदान. २ झांकण घालावयाचें टोपलें. [टापू.

टापू—पु. [सं.] १ बेट. २ प्रदेश;

टाल—स्त्री. [सं.] १ रास; ढीग. २ लांकूडफाट्याची वखार.

टाल—स्त्री. [सं.] टाळाटाळी.

टालटूल, टालमटूल-टोल—स्त्री. [सं.] टाळाटाळी.

टालना—क्रि. स. [सं.] १ टाळणें; दूर करणें; बाजूला सारणें. २ नाहींसें करणें; राहूं न देणें. ३ स्थगित करणें; पुढें ढकलणें. ४ वेळ दवडणें. ५ हुसकून लावणें.

टाली—स्त्री. [दे.] जनावरांच्या गळ्यांतील घाट.

टिकट—पु. [अं.] १ तिकीट. २ कर; जकात.

टिकठी—स्त्री. [सं.] १ तिकटी. २ तिवअी. ३ तिरडी.

टिकड़ा, टिक्कड़—पु. [सं.] मोठी वाटी; रोट.

टिकना—क्रि. अ. [सं.] १ टिकणें; स्थिर राहणें. २ विरघळलेल्या पदार्थांचें तळाशीं बसणें. ३ टिकाव धरून राहणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टिकस—पु. [अं.] कर; जकात.

टिकाना—क्रि. स. [सं.] १ अुतरावयास जागा देणें; ठेवणें. २ टिकविणें.

टिकिया, टिक्की—स्त्री. [सं.] १ गोल लहान तुकडा. २ टिकली (कपाळावर लावतात ती). ३ वाटी; गाकर. ४ हुक्क्यांत घालावयाची तंबाखूची चकती.

टिकैत—पु. [सं.] १ राजाचा वारसदार; युवराज. २ सरदार; अधिकारी. [ळणें; चिघळणें.

टिघलना—क्रि. अ. [सं.] वित-

टिचन—वि. [अं.] १ हजर; तयार. २ तत्पर; अुद्युक्त.

टिटिह-हा—पु. [सं.] टिटवी. टिटिहरी-स्त्री. टिटवी.

टिड्डी—स्त्री. [सं.] टोळ.

टिढविड़ंगा—वि. [सं.] वाकडातिकडा.

टिपका*—पु. [अनु.] थेंब; बिंदू.

टिपवाना—क्रि. स. [सं.] लिहवून घेणें. [किरीट.

टिपारा—पु. [सं. + फा.] मुकुट;

टिमटिमाना—क्रि. अ. [सं.] मंद जळणें; अंधुक प्रकाश देणें; धुगधुगी असणें.

टिरफिस—स्त्री. [सं.] अुद्धटपणा; अुद्दामपणा.

टिहुनी—स्त्री. [सं.] १ पायाचा घोटा. २ हाताचें कोंपरें.

टींड़ी—स्त्री. [सं.] १ नांगराची मूठ. २ जात्याचा खुंटा.

टीकरा—पु. [दे.] अुंचवटा; टेकाड.

टीका—पु. [सं.] १ टिळा; मुद्रा; गंध (आपापल्या सांप्रदायानुसार). २ वाग्निश्चय. ३ राज्याभिषेक. ४ ठिपका; डाग; चिन्ह. ५ देवी काढणें.

टीप—स्त्री. [सं.] १ दाब; दडपण. २ अुंच तान (गाण्याची). ३ नोंद; टिपण. ४ आंगठ्याचा ठसा. ५ जन्मटिपण.

टीपना—क्रि. स. [सं.] १ दाबणें. २ हळुहळू ठोकणें. ३ लिहिणें; टिपणें. [डौल. २ टापटीप.

टीमटाम—स्त्री. [अनु.] १ डाम-

टीला—पु. [सं.] १ टेकडी. २ मातीचा मोठा अुंच ढीग. ३ अुंचवटा.

टीसना—क्रि. अ. [अनु.] थांबून थांबून वेदना होणें; ठणका लागणें. टीस-स्त्री. ठणका; ठसठस.

टुंटा, टुंडा—वि. [सं.] १ थोटा. २ फांद्या नसलेलें; मुंडें.

टुक—वि. [सं.] अल्प; थोडें.

टुकड़ा—पु. [सं.] तुकडा. टुकड़ी-स्त्री. १ लहान तुकडा. २ टोळी; झुंड.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टुच्चा—वि. [सं.] तुच्छ; क्षुद्र.
टूँड़—पु. [सं.] किड्याची सोंड.
टूँडी—स्त्री. [सं.] बेंबी.
टूक—पु. [सं.] तुकडा.
टूटना—क्रि. अ. [सं.] १ तुटणें. २ फुटणें. ३ सांधा निखळणें. ४ रोडावणें. ५ गति खुंटणें; व्यत्यय येणें.
टूटा—वि. [सं.] १ तुटलेला; खंडित. २ अशक्त; दुबळा.
टूठना*—क्रि. अ. [सं.] संतुष्ट होणें; प्रसन्न होणें.
टूढनि*—स्त्री. [सं.] संतोष; समाधान.
टेंट—स्त्री. [सं.] कनवट.
टेंट—स्त्री. [सं.] कापसाचें बोंड.
टेंटी—स्त्री. [सं.] पानें नसलेलें कांटेदार झुडुप.
टेंटी—पु. [अनु.] हुज्जत घालणारा.
टेंटें—स्त्री. [अनु.] १ निरर्थक बडबड; वटवट. २ पोपटाचा शब्द.
टेक—स्त्री. [सं.] १ टेकण; टेकू. २ आश्रय; आधार. ३ दृढ निश्चय; टेक. ४ हट्ट; दुराग्रह. ५ सराव; संवय. ६ निश्चय; प्रतिज्ञा.
टेकना—क्रि. स. [सं.] १ टेकणें. २ लवंडणें; विसांवा घेणें. [वेड.
टेकला*—स्त्री. [सं.] नाद; छंद;
टेकान—स्त्री. [सं.] टेकू; टेकण.
टेकाना—क्रि. स. [सं.] अचलून देण्यास मदत करणें.
टेकी—पु. [सं.] १ दृढनिश्चयी माणूस; टेकीचा माणूस. २ हट्टी; दुराग्रही माणूस.
टेकुआ—पु.[सं.] चरख्याची चाती.
टेकुरी—स्त्री.[सं.] १ टकळी; चाती. २ दोर वळण्याचें चाक. ३ अरी (चांभाराचें टोंचण्याचें हत्यार).
टेढ़बिड़ंगा—वि. [सं.] वांकडातिकडा.
टेढ़ा—वि. [सं.] १ वांकडा; तिरपा. २ कठीण; दुष्कर. ३ अुर्मट; अुद्दाम. टेढ़ी खीर–दुष्कर, कठीण काम. टेढ़ाअी–स्त्री. वांकडेपणा. टेढ़ापन–पु. वक्रता; वांकडेपणा.
टेढ़े—क्रि. वि. [सं.] वांकडेंतिकडें.
टेना—क्रि.स. [सं.] १ धार लावणें; पाजळणें. २ मिशीवर पीळ देणें.
टेम—स्त्री. [सं.] दिव्याची ज्योत.
टेर—स्त्री. [सं.] १ धावा; आर्त स्वरानें मारलेली हांक. २ तान; अुंच स्वर.
टेरना—क्रि. स. [सं.] १ आर्त स्वरानें हांक मारणें; धांवा करणें. २ अुंच स्वरांत गाणें. [व्यसन.
टेव—स्त्री. [सं.] संवय; सराव;
टेसू—पु. [सं.] पळसाचें फूल.
टोंटा—पु. [सं.] तोटी; नळ. टोंटी–स्त्री.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टोकना—क्रि. स. [सं.] हटकणें; अडवणें. [मंत्रतंत्र.

टोटका—पु. [सं.] तोडगा;

टोटकेहाअी—स्त्री. [सं.] मंत्रतंत्र करणारी बाअी.

टोनहा—वि. [सं.] जादूटोणा करणारा; मांत्रिक.

टोनहाया—पु. [सं.] जादूटोणा करणारा माणूस; मांत्रिक.

टोना—पु. [सं.] जादूटोणा; मंत्रतंत्र.

टोप—पु. [सं.] शिरस्त्राण; टोप.

टोल—स्त्री. [सं.] १ संस्कृत पाठशाळा. २ टोळी; झुंड.

टोला—पु. [सं.] १ पेठ; मोहल्ला; गंज; वस्तीचा अेक मोठा भाग. २ दगड किंवा विटेचा तुकडा.

टोली—स्त्री. [सं.] १ टोळी; झुंड. २ पेठ;विभाग; वस्तीचा लहान भाग.

टोह—स्त्री. [सं.] १ तपास; चौकशी; शोध. २ देखरेख.

ठ

ठंठ—वि. [सं.] पानें नसलेला; बोडका (वृक्ष).

ठंठार—वि. [सं.] रिकामा.

ठंढ—स्त्री. [सं.] गारवा; गारठा; थंडी. [थंडी. २ संतोष; तृप्ति.

ठंढक—स्त्री. [सं.] १ गारवा; गारठा; **ठंढा**—वि. [सं.] १ थंड; थंडगार. २ शांत; गंभीर. ३ विझलेला. ४ आवेश किंवा जोम नसलेला; अुदासीन. ठंढी साँस–निःश्वास (दुःखाचे); अुसासा. ठंढेठंढे–१ मुकाट्यानें. २ आनंदानें; हंसत-खेळत.

ठंढाअी—स्त्री. [सं.] गुलाबाच्या पाकळ्या, खरबुजाच्या बिया इत्यादि वस्तु टाकून बनविलेलें थंड पेय.

ठकठक—स्त्री. [अनु.] १ कटकट. २ टकटक आवाज. ३ तंटा; झगडा; भानगड.

ठकठकाना—क्रि. स. [अनु.] १ ठोठावणें. २ टकटक करणें.

ठकुरसुहाती—स्त्री. [सं.] खुशामत; आर्जव.

ठकुराअिन—स्त्री. [सं.] मालकीण.

ठकुराअी—स्त्री. [सं.] १ मोठेपणा; प्रौढी; टेंभा. २ ठाकुरांची जहागिर.

ठकुरानी—स्त्री. [सं.] १ मालकीण. २ सरदाराची बायको.

ठग—पु. [सं.] ठक; कपटी; धूर्त.

ठगना—क्रि. स. [सं.] फसविणें; ठकविणें. क्रि. अ. फसणें; चकणें; फसविलें जाणें. **ठगी**–स्त्री. फसवे-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गिरी; धूर्तपणा. **ठगपना**—पु. फसवेगिरी; धूर्तपणा.

ठगनी—स्त्री. [सं.] १ फसवणारी स्त्री. २ कुंटीण.

ठगमूरी—स्त्री. [सं.] वेशुद्ध करणारी अेक वनस्पति (ठग, लुच्चे लोक वापरीत असत).

ठगवाना—क्रि. स. [सं.] दुसऱ्याकडून फसविणें.

ठगविद्या—स्त्री. [सं.] फसवेगिरी.

ठगिन-नी—स्त्री. [सं.] फसविणारी स्त्री.

ठगोरी—स्त्री. [सं.] जादूटोणा.

ठट-ट्ट—पु. [सं.] १ वस्तूंचा किंवा लोकांचा अेकाच ठिकाणीं जमलेला थवा. २ रचना; सजावट; बनावट.

ठटकना—क्रि. अ. [सं.] १थवकणें; अडणें. २ नटणें; थाटमाट करणें.

ठटकीला—वि. [सं.] सजलेला; नटलेला.

ठटना—क्रि. स. [सं.] १ ठरविणें; निश्चित करणें. २ तयार करणें. ३ आरंभ करणें. क्रि. अ. १ अडणें; दृढ निश्चयानें अुभें राहणें. २ सुसज्जित होणें.

ठटनि*—स्त्री. [सं.] रचना;बनावट.

ठटरी—स्त्री. [सं.] १ हाडांचा सापळा. २ गवत, चारा अि. बांधण्याचें जाळें. ३ तिरडी. ४ सांचा.

ठट्ठा—पु. [सं.] थट्टा; विनोद.

ठठअी—स्त्री. [सं.] थट्टामस्करी; विनोद.

ठठाना—क्रि. स. [अनु.] मारणें; चोप देणें.

ठठाना—क्रि. अ. [सं.] खदखदून हंसणें; जोरानें खिदळणें.

ठठेरा—पु. [अनु.] भांडीं बनविणारा; तांबट. **ठठेरी**—स्त्री. तांबटाची बायको; किंवा त्याचें काम.

ठठोल—पु. [सं.] थट्टेखोर; विनोदी.

ठठोली—स्त्री. [सं.] थट्टामस्करी; विनोद; चेष्टा.

ठनकना—क्रि. अ. [अनु.] ठणकणें; दुखणें.

ठनठन गोपाल—पु. [अनु.] १ दरिद्री; कंगाल; गरीब. २ पोकळ; दिखाअू; निःसत्त्व वस्तु.

ठनना—क्रि. अ. [सं.] १ ठरणें; निश्चित किंवा पक्कें होणें. २ तत्परतेनें कामाला सुरुवात होणें. ३ मनाचा निश्चय होणें. ४ अुद्युक्त असणें; तयार असणें.

ठप्पा—पु. [सं.] १ वेलबुट्टीच्या कापडावर छापण्याचा ठसा; छाप. २ ठशानें काढलेली वेलबुट्टी.

ठमक—स्त्री. [सं.] ठुमकत चालणें.

ठमकना—क्रि. अ. [सं.] १ ठमकत चालणें. २ थांबणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठयना—क्रि. स. [सं.] १ स्थापन करणें; बसविणें. २ ठाम निश्चयानें आरंभ करणें. ३ ठरविणें. क्रि. अ. स्थिर होणें; जमणें; बसणें.

ठवनी—स्त्री. [सं.] बसण्याची किंवा उभें राहण्याची ढब; बैठक; आसन.

ठस—वि. [सं.] भरीव.

ठसक—स्त्री. [सं.] १ अभिमान; गर्व. २ ताठा; टेंभा, तोरा.

ठसाठस—क्रि. वि. [सं.] ठासून भरलेला; भरगच्च.

तूदा—पु. [फा.] १ मातीचा ढीग. २ अुंचवटा. ३ बांध.
तूफ़ान—पु. [अ.] १ वावटळ; २ वादळ; तुफान. ३ आपत्ति; संकट. ४ तटाबखेडा. ५ आळा.
तूम—पु. [सं.] पिंजलेला कापूस.
तूमतड़ाक—स्त्री. [फा.] थाटमाट; डामडौल. [ज्याची).
तूमड़ी—स्त्री. [सं.] पुंगी (गारु-
तूमना—क्रि. स. [सं.] कापूस पिंजणें; कापूस विरळ करणें.
तूमार—पु. [अ.] पाल्हाळ; लांबलचक गोष्ट.
तूल—पु. [अ.] १ लांबी. २ विस्तार.
तृखा*—स्त्री. [सं.] तृषा; तहान.
तें*—प्रत्य. [सं.] १ शीं, द्वारा (त्रितीया). २ पासून (पंचमी).
तेंदुआ—पु. [दे.] चित्ता.
तेग़—स्त्री. [अ.] खड्ग; तलवार.
तेग़ा—पु. [अ.] खंजीर.
तेज़—वि. [फा.] १ तीक्ष्ण. २ चपल. ३ तिखट; झणझणीत. ४ महाग. ५ चलाख. ६ बुद्धिमान. (यौ.) तेज़मिज़ाज–तापट; रागीट. तेज़ी–स्त्री. १ तीक्ष्णता; २ घाअी; जलदी.
तेजस्वी—वि. [सं.] तेजस्वी.
तेतना*—वि. [सं.] तितका.
तेता, तेतिक, तेतो*—वि. [सं.] तितका; तितकाच.
तेरस—स्त्री. [सं.] त्रयोदशी.
तेरहीं—स्त्री. [सं.] तेरावा (श्राद्धाचा).
तेलहन—पु. [सं.]गळिताचें धान्य.
तेलिया—वि. [सं.] तेलासारखा तुळतुळीत व चकचकीत.
तेवर—पु. [?] रागीट नजर; क्रुद्ध दृष्टि.
तेह-हा*—पु. [सं.] १ राग; क्रोध. २ अहंकार; गर्व.
तेहरा—वि. [सं.] १ तिहेरी. २ तिप्पट. [अुत्सव.
तेहवार—पु. [सं.] सण; पर्व;
तेहि*—सर्व. [सं.] त्याला.
तेही—पु. [सं.] १ रागीट. २ घमेंडखोर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तैं*—क्रि. वि. [सं.] द्वारा. सर्व. तू.

तै*—क्रि. वि. [सं.] तितका.

तैनात—वि. [अ.] नियुक्त. **तैनाती**–स्त्री. नेमणूक; नियुक्ति.

तैयार—वि. [अ.] १ तयार. २ धष्टपुष्ट.

तैयो, तैवौ—क्रि. वि. [सं.] तेव्हां; त्या वेळीं.

तैरना—क्रि. अ. [सं.] पोहणें. **तैराक**–वि. पटाअीत पोहणारा.

तैश—पु. [अ.] राग; संताप; त्वेष. [वेळीं.

तों*—क्रि. वि. [सं.] तेव्हां; त्या

तोंद—स्त्री. [सं.] ढेरी; पोट सुटणें. **तोंदल**–वि. ढेरपोट्या. [तेव्हां.

तो*—सर्व. [सं.] तुझा. अव्य.

तोअि*—पु. [सं.] पाणी.

तोखना—क्रि. स. [सं.] तृप्त करणें; संतुष्ट करणें; प्रसन्न करणें. क्रि. अ. तृप्त होणें. **तोख**–पु. संतोष.

तोटका—पु. [सं.] तोडगा.

तोड़—पु. [सं.] १ नदीचा जोराचा प्रवाह. २ युक्ति; तोड.

तोड़ना—क्रि. स. [सं.] तोडणें.

तोड़वाना—क्रि.स. [सं.] तोडविणें.

तोतला—वि. [अनु.] बोबडा तातरा.

तोता—पु. [फा.] पोपट.

तोताचश्म—पु. [फा.] बेमुर्वत; निर्लज्ज. [पु. गोलंदाज.

तोप—स्त्री. [तु.] तोफ. **तोपची**–

तोपना—क्रि. स. [सं.] झांकणें.

तोबड़ा—पु. [फा.] तोबरा.

तोर-रा*—वि. [सं.] तुझा.

तोशक—स्त्री. [फा.] लहान गादी.

तोशदान—पु. [फा.] १ फराळाचा डबा. २ काडतुसांची चामड्याची पिशवी.

तोशा—पु. [फा.] फराळ (प्रवासास जातांना बरोबर घेतलेले फराळाचे पदार्थ).

तोशाख़ाना—पु. [तु. + फा.] राजांचें वस्त्रागार.

तोहफ़ा—पु. [अ.] १ बक्षिस. २ नजराणा; देणगी. [आळ.

तोहमत—स्त्री. [अ.] आरोप;

तोहर-रा, तोहार*—सर्व. [सं.] तुमचा.

तोहि-हे*—सर्व. [सं.] तुला.

तौंस*—स्त्री. [सं.] तहान.

तौंसना—क्रि. अ. [सं.] होरपळणें; भाजून निघणें.

तौंसा—पु. [सं.] अुष्णता; अुष्मा.

तौंसियत—स्त्री. [सं.] विस्तवाची आंच.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तौफ़िक—स्त्री. [अ.] १ ईश्वराची कृपा. २ श्रद्धा; भक्ति. ३ सामर्थ्य; शक्ति.

तौर—पु. [अ.] १ वर्तन; वागणूक. २ दशा; स्थिति. ३ तऱ्हा; पद्धत.

तौलगि*—अव्य. [सं.] तोंपर्यंत.

तौलना—क्रि. स. [सं.] १ तोलणें; वजन करणें. २ ओंगण घालणें.

तौलिया—स्त्री.,पु. [अं.] टॉवेल.

तौहीन—स्त्री. [अ.] अपमान; बेअिज्जत; अप्रतिष्ठा.

त्यों—अव्य. [सं.] १ तेव्हां; तत्काल. २ त्याप्रमाणें.

त्योरी—स्त्री. [सं.] दृष्टि; नजर.

त्योहार—पु. [सं.] सण; पर्व.

त्रिदिव—पु. [सं.] स्वर्ग.

त्रिसना*—स्त्री. [सं.] तृष्णा.

त्रुटि—स्त्री. [सं.] अुणीव; चूक.

थ

थंब-भ—पु. [सं.] स्तंभ; खांब.

थंभित*—वि. [सं.] १ स्तंभित. २ अचल; स्थिर.

थकना—क्रि. अ. [सं.] १ थकणें; दमणें. २ कंटाळणें. ३ वार्धक्यानें थकणें. **थकान**-स्त्री. थकावट.

थकाना-क्रि. स. [सं.] थकविणें.

थका-माँदा—वि. [सं.] थकलेला; भागलेला.

थकावट-हट—स्त्री. [सं.] थकवा.

थकौहाँ*—वि. [सं.] थकलेला; भागलेला; श्रांत.

थगित—वि. [सं.] स्थगित.

थन—पु. [सं.] चतुष्पाद प्राण्यांचें स्तन.

थनी—स्त्री. [सं.] अजागल स्तन.

थनेला—पु. [सं.] स्त्रियांच्या स्तनांवर होणारा फोड.

थनैत—पु. [सं.] १ गांवाचा पुढारी. २ जमीनदाराचा खंड वसूल करणारा गुमास्ता.

थपकना—क्रि. स. [अनु.] थोपटणें; गोंजारणें. **थपकी**-स्त्री. थापटी (प्रेमानें थोपटणें).

थपन*—पु. [सं.] स्थापना.

थपना, थपाना, थापना—क्रि.स. [सं.] १ स्थापना करणें. २ लौकिक गाजविणें; नांव मिळविणें.

थपेड़ा—पु. [अनु.] १ थप्पड. २ प्रहार; आघात.

थमकारी*—वि. [सं.] १ संयमी. २ थोपवून धरणारा.

थमना—क्रि. अ. [सं.] १ थांबणें; थबकणें. २ धीर धरणें. ३ बंद होणें; चालू नसणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थरकना, थरथराना, थर्राना—क्रि. अ. [अनु.] थरथर कांपणें.

थल—पु. [सं.] १ स्थळ; जागा; ठिकाण. २ कोरडी जमीन. ३ वाळवंट; रेताड जमीन.

थलथल—वि. [सं.] वातानें अंग सुटलेला. [ठिकाण; थांग.

थलबेड़ा—पु. [सं.] पत्ता; ठाव-

थली—स्त्री. [सं.] १ स्थान; ठिकाण. २ तळ. ३ बैठक. ४ वाळवंट.

थवथवी—पु. [सं.] गवंडी.

थहना*—क्रि. स. [सं.] ठाव घेणें.

थहराना—क्रि. स. [अनु.] थरथर कांपणें.

थहाना—क्रि. स. [सं.] १ थांग लावणें. २ अेखाद्याच्या विद्वत्तेविषयीं किंवा योग्यतेविषयीं अंदाज करणें.

थाँग—स्त्री. [सं.] १ चोर किंवा डाकूंचें गुप्त स्थान. २ थांग; शोध.

थाँगी—पु. [सं.] १ चोरीचा माल विकत घेणारा. २ चोरांचा मुख्य. ३ चोरांना चोरीची माहिती देणारा. ४ गुप्त हेर.

था—क्रि. अ. [सं.] होता ('है' चें पुल्लिंगी अेकवचनी भूतकाळचें रूप).

थाति-ती—स्त्री. [सं.] १ ठेव; अनामत. २ वेळीं अुपयोगी पडावी म्हणून राखून ठेवलेली वस्तु. ३ स्थैर्य.

थान—पु. [सं.] १ स्थान; ठिकाण. २ राहण्याची जागा; निवासस्थान. ३ देवस्थान. ४ तवेला. ५ कपड्याचें ठाण. ६ संख्या.

थाना—पु. [सं.] पोलीसचौकी.

थानेदार—पु. [सं.+फा.] फौजदार; पोलीसचौकीवरील अधिकारी.

थाप—स्त्री. [सं.] १ थाप (तवल्याची). २ थप्पड. ३ ठसा. ४ प्रतिष्ठा; मर्यादा. ५ प्रमाण. ६ शपथ.

थापन—पु. [सं.] स्थापन; प्रतिष्ठापना.

थापना—क्रि. स. [सं.] १ स्थापणें; बसविणें. २ बनविणें. स्त्री. स्थापना; प्राणप्रतिष्ठा.

थापा—पु. [सं.] १ हाताच्या पंजाचा छाप, ठसा. २ शेतांत धान्याच्या राशीवर मातीनें किंवा शेणानें केलेली खूण. ३ ढीग; रास.

थामना—क्रि. स. [सं.] १ थांबविणें; अडविणें. २ थोपवून धरणें; धरून ठेवणें. ३ सहाय्यता करणें; मदत करणें. ४ सांभाळणें. ५ जवाबदारी घेणें.

थाल—पु. [सं.] मोठी परात. थाली-स्त्री. ताट; थाळी; परात. (मु.) थाली का बैंगन-पगडी वदलणारा.

थाहना—क्रि. स. [सं.] अंदाज पाहणें; ठाव घेणें; थांग पाहणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थाह–स्त्री. १ थांग; खोली. २ थांग; पत्ता. ३ सीमा; अंत.

थाहरा*—वि. [सं.] अुथळ.

थिगली—स्त्री. [सं.] ठिगळ.

थिर*—वि. [सं.] १ स्थिर; अचल. २ शांत. ३ स्थायी; टिकाअू.

थिरकना—क्रि. अ. [सं.] नाचणें.

थिरक–पु. नृत्यांतील पादविक्षेप; पदविन्यास.

थिरना—क्रि. अ. [सं.] १ तरंग-रहित होणें; शांत व संथ होणें (पाण्याचा प्रवाह). २ निवळणें. ३ तळाशीं जमणें.

थिराना—क्रि. अ. [सं.] स्थिर होणें. क्रि. स. स्थिर होअूं देणें.

थीना*—पु. [सं.] १ स्थैर्य. २ शांति; धैर्य.

थुक्का फ़जीहत—स्त्री. [सं.+अ.] १ छीः थु; फजिति. २ भांडण; झगडा.

थुड़ी—स्त्री. [अनु.] छीः थु; धिक्कार. (मु.) थुड़ी थुड़ी करना–छीः थु करणें.

थुरहथा—वि. [सं.] १ लहान हाताचा. २ मितव्ययी; कंजूष.

थूकना—क्रि. अ. [सं.] १ थुंकणें. २ धिक्कारणें; निंदा करणें. **थूक**–पु. थुंकी.

थूथन—पु. [दे.] लांबट तोंड. (अुंट अि.).

थूथरा—पु. [सं.] १ नागाचा फणा. २ लांब तोंड. [२ आधार.

थून-नी—स्त्री. [सं.] १ खांब.

थूल-ला*—वि. [सं.] १ स्थूल; जाड. २ बेढब. **थूला**–वि. स्थूल.

थूहर—पु. [सं.] शेरीचें झाड.

थेअाथेअा—वि. [अनु.] थयथय (नाचणें).

थेगली—स्त्री. [सं.] ठिगळ.

थैला—पु. [सं.] १ पिशवी; थैली. २ खिसा. **थैली**–स्त्री.

थोक—पु. [सं.] १ ढीग; रास. २ समूह. ३ ठोक विक्री. (मु.) थोक करना–अेकत्र करणें.

थोड़ा—वि. [सं.] थोडा; अल्प; कमी. क्रि. वि. अल्प प्रमाणांत. थोड़ा ही–जवळ जवळ नाहीं.(यौ.) थोड़ा बहुत–थोडें फार; थोडें बहुत.

थोथा—वि. [दे.] १ पोकळ; रिकामा. २ तथ्य नसलेला. ३ बोथट. ४ कुचकामाचा.

थोपड़ी—स्त्री. [सं.] थप्पड;चपराक.

थोपना—क्रि. स. [सं.] १ थापणें; लिंपणें. २ गळ्यांत घालणें; माथीं मारणें.

थोरिक*—वि. [सं.] थोडा; अल्प.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द

दंग—वि. [फा.] थक्क; विस्मित.

दंगअी—वि. [फा.] १ दंगा-धोपा करणारा. २ अुपद्व्यापी; अुपद्रवी. ३ प्रचंड; भयंकर.

दंगल—पु. [फा.] १ कुस्तीचा आखाडा. २कुस्तीची शर्यत. ३समूह; जमाव. ४ मोठी गादी. ५ चढाओढ.

दंड—पु. [सं.] १ दंड; सोटा. २ दंड; जोर (व्यायाम). ३ साष्टांग नमस्कार; दंडवत. ४ दंड; शिक्षा.

दंडक—पु. [सं.] १ दंडा; काठी. २ शास्ता.

दंडना—क्रि. स. [सं.] शिक्षा देणें; दंड करणें.

दँतिया—स्त्री. [सं.] लहान दांत.

दँतुला—वि. [सं.] मोठ्या दांतांचा; दातरा.

दंद—पु. [सं.] द्वंद; तंटा; झगडा. **दंदी**–वि. भांडखोर.

दंदाना—पु. [फा.] दाते; दात्यांची ओळ (फर्णा, करवत अि.चे दाते). **दंदानेदार**–वि. दाते-दार; दाते असलेला.

दंदाशिकन—वि. [फा.] १ सडेतोड (अुत्तर). २ दात काढणारा.

दंपा*—स्त्री. [अनु.] वीज.

दँघरी—स्त्री. [सं.] धान्याची मळणी.

दंस*—पु. [सं.] दंश.

दअी*—पु. [सं.] १ अीश्वर. २ दैव; प्रारब्ध. (मु.) **दअी का घाला**–दुर्दैवी; कमनशिबी. **दअीमारा**–वि. दैवी अपत्तींत सांपडलेला.

दक़ियानूसी—वि. [अ.] अत्यंत प्राचीन; अतिशय पुरातन.

दक़ीक़ा—पु. [अ.] १ युक्ति; अुपाय. २ सुक्ष्म गोष्ट.

दक्खिन—पु. [सं.] १ दक्षिण दिशा. २ दक्षिणेकडील प्रदेश.

दख़ल—पु. [अ.] १ अधिकार; ताबा. २ हस्तक्षेप; ढवळाढवळ. ३ प्रवेश; शिरकाव.

दख़लयाबी—स्त्री. [अ. + फा.] अधिकार किंवा ताबा मिळविणें.

दख़ील—वि. [अ.] ताबा ठेवणारा. **दख़िलकार**–पु. बारा वर्षांच्या वहिवाटीचा हक्क सांगणारा.

दगड़—पु. [?] नगारा.

दगदगा—पु. [अ.] १ भय; भीति. २ संशय; शंका; धुगधुग. ३ अेक कंदील. **दगदगी**–स्त्री.

दगधना—क्रि. अ. [सं.] जळणें. क्रि. स. १ जाळणें. २ दुःख देणें.

दगना—क्रि.अ.[सं.]१सुटणें (बंदूक, तोफ अि.). २ करपणें; जळून जाणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३ डागळलें जाणें; डाग पडणें. ४ प्रसिद्ध; प्रख्यात होणें. [विलंब.

दगर-रा*—पु. [सं.] अुशीर;

दग़ल—पु. [अ.] १ दगा; कपट; धोका. २ वहाणा. [अंगरखा.

दगला—पु. [?] डगला; जाड

दगहा—वि. [सं.] १ प्रेताला अग्नि देणारा व क्रियाकर्म करणारा. २ डाग पडलेला.

दगहा—वि. [सं.] डाग दिलेला; चरका दिलेला. [२ फसवणूक.

दग़ा—स्त्री. [अ.] १ कपट; धोका.

दग़ादार, दग़ावाज़—वि. [अ. + फा.] दगावाज; कपटी.

दगैल—वि. [अ.] १ डागळलेला. २ दोष असलेला. पु. दगाबाज.

दचकना—क्रि. अ. [अनु.] १ ठेच किंवा धक्का लागणें. २ दबणें. ३ हिसका बसणें. क्रि. स. १ धक्का देणें. २ दाबणें. [खालीं येणें.

दचना—क्रि. अ. [अनु.] पडणें;

दच्छकुमारी*—स्त्री.[सं.] पार्वती.

दढ़ियल—वि. [सं.] दाढी राखणारा; दाढीवाला.

दतवन, दतुअन, दतुवन—स्त्री. [सं.] १ दातवण (बाभूळ, लिंब अि.चें). २ तोंड धुणें. [सासरा.

ददिया ससुर—पु. [सं.] आजे-

ददिहाल—पु. [अनु.] कूळ; वंश.

ददोरा—पु. [सं.] गांध.

दध-धि—पु. [सं.] १ दही. २ वस्त्र; कपडा.

दधि*—पु. [सं.] समुद्र.

दधिकाँदो—पु. [सं.] गोकुळ अष्टमीच्या दिवशीं दह्यांत हळद मिसळून अेकमेकांचे अंगावर फेंकतात तो अुत्सव.

दधिसुत—पु. [सं.] १ कमळ. २ चंद्र. ३ मोती. ४ विष.

दधिसुत—पु. [सं.] लोणी.

दपटना—क्रि. अ. [सं.] दटावणें; दरडावणें. दपेट-स्त्री. दटावणी; दरडावणी. [घमेंड.

दप्पु*—पु. [सं.] दर्प; अहंकार;

दफ़्तर, दप्तर—पु. [फा.] १ कचेरी; कार्यालय. २ सविस्तर वृत्तान्त.

दफ़्ती—स्त्री. [अ.] पुठ्ठा (पुस्तकाचा); पुष्टीपत्र.

दफ़्नाना—क्रि. स. [अ.] पुरणें; गाडणें. दफ़न-पु. प्रेत पुरण्याचा विधि.

दफ़ा—स्त्री. [अ.] १ वेळा; खेपा. २ कायद्याचें कलम. वि. दूर केलेला; तिरस्कृत. (मु.) दफ़ा लगाना-कायद्याचे कलमाखालीं खटला भरणें.

दफ़ादार—पु. [अ. + फा.] नाअीक; फौजदार.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दफ़ीना—पु. [अ.] पुरलेलें धन.
दफ़्तरी—पु. [अ.] बुक बाअिंडर.
दबंग—वि. [सं.] प्रभावशाली; रुबाबदार.
दबगर—पु. [दे.] १कातड्याचें बुधलें बनविणारा. २ ढाल बनविणारा.
दबना—क्रि. अ. [सं.] १ दबणें; चेपलें जाणें. २ टिकाव न धरणें; मागें हटणें. ३ लाचार होणें. ४ फिक्कें पडणें. ५ वजन पडल्यामुळें नम्र होणें. ६ लाजणें; संकोच करणें. (मु.) दबी ज़बान से कहना–ध्वनित करणें; स्पष्ट न बोलणें.
दबसट—पु. [सं.] दाब; दडपण.
दबाना—क्रि. स. [सं.] १ दाबणें; चेपणें. २ मागें हटविणें. ३ दडपण घालणें; दाब आणणें. ४ बळकावणें. ५ असहाय करून सोडणें. ६ पुरणें; गाडणें. ७ दमन करणें. ८ बळकाविणें.
दबाव—पु. [सं.] दाब;दडपण;वजन.
दबीज़—वि. [फा.] दाट; घट्ट.
दबैल—वि. [सं.] १ अंकित; ताबेदार. २ नमून वागणारा.
दबोचना—क्रि. स. [सं.] १ लपविणें; छपविणें. २ झडप घालून दाबणें; दडपणें.
दबोरना*—क्रि. स. [सं.] १ समोर अुभें राहूं न देणें. २ दाबणें.

दम—पु. [सं.] १ संगम. २ शिक्षा. ३ घर. ४ चिलखत.
दम—पु. [फा.] १ श्वास; दम. २ चिलिमीचा दम; झुरका. (मु.) दम अुखड़ना–श्वास थांबणें. दम घोंटकर मारना–गळा दाबून मारणें. दम खींचना–१ गप्प बसणें. २ श्वास घेणें. दम घुटना–श्वास कोंडणें. दम तोड़ना–शेवटचा श्वास घेणें. दम फूलना–दम लागणें; धापा टाकणें. दम भरना–अभिमानपूर्वक अेखाद्याची स्तुति करणें. दम मारना, दम लेना–विसांवा घेणें. दम खुश्क होना अथवा सूखना–भीतीनें गांगरल्यामुळें श्वास थांबणें. नाक में दम आना–नाकीं नअू येणें. दम देना–फसविणें. (यौ.) दम झांसा–फसवणूक. दम दिलासा अथवा दमपट्टी–खोटी आशा.
दमकना—क्रि. अ. [सं.] चकाकणें; लकलकणें. दमक–स्त्री. तेज; चमक.
दमकल—स्त्री. [फा.+सं.]१आगीचा बंब. २पाणी हापसण्याचा बंब. ३पंप. दमकला–पु. रंग किंवा गुलाबपाणी शिंपण्याचें पिचकारी असलेलें भांडें.
दमख़म—पु. [फा.] १ दृढता; मजबुती. २ जीवनशक्ति; प्राण. ३ तलवारीचें पातें किंवा धार.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दमचूल्हा—पु. [सं.] लोखंडी शेगडी. [फसवणूक.

दमदिलासा—पु. [फा.] थाप; **दमन**—पु. [सं.] १ दडपून टाकणें. २ संयम. ३ शिक्षा.

दमवाज़—वि. [फा.] फूस देणारा.

दमाद—पु. [सं.] जावअी.

दमामा—पु. [फा.] नगारा.

दमारि*—पु. [सं.] वणवा; दावानल. [नाहींसें करणारा.

दमैया*—वि. [सं.] हरणारा;

दयानत—स्त्री. [अ.] दानत; अिमान; विश्वासूपणा. [विश्वास्.

दयानतदार—वि. [अ. + फा.]

दयाना*—क्रि. अ. [सं.] द्रवणें; दयाळू होणें. [२ दयेस पात्र.

दयावना*—वि. पु. [सं.] १ दीन.

दयिना—स्त्री. [सं.] पत्नी; बायको.

दरआमद—स्त्री. [फा.] १ आगमन; आंत येणें. २ मालाची आयात.

दर—पु. [सं.] १ भेग; फट. २ दरी; गुंफा; कंदरा. ३ भीति. ४ शंख.

दर—पु. [सं.] दल; झुंड; समूह.

दर—पु. [फा.] दार; दरवाजा. स्त्री. १ दर; भाव. २ पुरावा. (मु.) दर दर मारा मारा फिरना—दारोदार हिंडणें.

दरकना—क्रि. अ. [सं.] अुलणें; फाटणें.

दरकाना—क्रि.स. [सं.] फाडणें.

दरका—पु.१ भेग; चीर. २ मार; तडाखा.

दरकार—वि. [फा.] आवश्यक; जरूरीचा. स्त्री. जरूरी; आवश्यकता.

दर-किनार—क्रि. वि. [फा.] वेगळें; बाजूला. [दरमजल.

दरकूच—क्रि. वि. [फा.] मजल

दरख़्वास्त—स्त्री. [फा.] १विनंति; प्रार्थना. २ अर्ज; विनंतीपत्र.

दरख़्त—पु. [फा.] वृक्ष; झाड.

दरगाह—स्त्री. [फा.] १ दरगा (मुसलमानांचें समाधिस्थान). २ अुंबरठा; प्रवेशद्वार. ३ दरबार; कचेरी.

दर-गुज़र—वि. [फा.] १ वेगळा; अलग. २ माफी मिळालेला.

दरज—स्त्री. [सं.] भेग; चीर; फट.

दरद, दर्द—पु. [फा.] १ पीडा; वेदना; दुःख. २ दया; करुणा.

दर-दर—क्रि. वि. [फा.] दारोदार; घरोघर.

दरदराना—क्रि. स. [सं.] भरडणें; ठेचणें. दरदरा—वि. भरड दळलेला.

दरना—क्रि. स. [सं.] १ दळणें. २ चेचणें. ३ नाश करणें.

दरप*—पु. [सं.] दर्प; घमेंड.

दरपना—क्रि. अ. [सं.] १ संतापणें; रागावणें. २ गर्व करणें; घमेंड करणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दरपनी—स्त्री. [सं.] लहान आरसा.

दर-पेश—क्रि. वि. [फा.] पुढें; समोर.

दर-पै—क्रि.वि. [फा.]अेखाद्याच्या पाठीमागें; अेखाद्याच्या शोधांत. (मु.) **किसी के दर-पै होना**–अेखाद्याच्या पाठीस लागणें; अेखाद्याला त्रास देणें.

दरब, दर्ब*—पु. [सं.] १ धन; द्रव्य. २ सोनें चांदी अि. धातू.

दरबा—पु. [फा.] खुराडें; खोपा; कबुतरखाना.

दरबान—पु. [फा.] पहारेकरी; द्वारपाल. **दरबानी**–स्त्री. पहारा; पहारेकऱ्याचें काम.

दरभ—पु. [सं.] दर्भ.

दरमा—पु. [दे.] चटअी.

दरमान—पु. [फा.] १ औषध; दवा. २ चिकित्सा; अुपाय.

दरमाहा—पु. [फा.] दरमहा; मासिक वेतन.

दरमियान—पु. [फा.] मध्य. क्रि. वि. दरम्यान; मध्यंतरीं.

दरमियानी—वि. [फा.] मधला. पु. समेट घटवून आणणारी व्यक्ति; मध्यस्थ.

दरवेश—पु. [फा.] १ फकीर; [दरवेशी. २ भिकारी.

दरस—पु. [सं.] १ ओझरती भेट; दृष्टादृष्ट. २ रूप; सौंदर्य. ३ दर्शन.

दरसना*—क्रि. अ. [सं.] दृष्टीस पडणें. क्रि. स. पाहणें. [दर्पण.

दरशनी-सनी—स्त्री.[सं.]आरसा;

दरसाना—क्रि. स. [सं.] दर्शविणें; दाखविणें. [कप्पा.

दराज—स्त्री. [अि.] टेबलाचा खण;

दराज़—वि. [फा.] मोठा.

दराज—स्त्री. [सं.] भेग; फट.

दरारना—क्रि. अ.[सं.] भेग पडणें; फाटणें. **दरार**–स्त्री. चीर; फट; भेग.

दरारा—पु. [सं.] रेटा; धक्का.

दरिंदा—पु. [फा.] हिंसक पशू.

दरिया—पु. [फा.] १ नदी.२ समुद्र. **दरियाअी**–वि. १ नदीसंबंधी; नदीजवळचा. २ समुद्रासंबंधी.

दरियादिल—वि. [फा.] अुदार.

दरियाफ़्त—वि. [फा.] ज्ञात; माहितीचा; पत्ता लागलेला.

दरिया-बरार—पु. [फा.] मळींची जमीन.

दरियाबुर्द—पु. [फा.] नदीच्या प्रवाहानें वाहून गेलेली जमीन.

दरी—स्त्री. [सं.] १ दरी. २ गुंफा.

दरी—स्त्री. [सं.] सतरंजी.

दरीख़ाना—पु. [सं.+फा.] पुष्कळ दरवाजे असलेलें घर.

दरीचा—पु. [फा.] १ झरोका; खिडकी. २ खिडकी जवळची बसण्याची जागा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दरीबा—पु. [फा.] पानतंबाखूचें दुकान किंवा बाजार.

दरेग़—पु. [फा.] १ दुःख; खेद. २ पश्चात्ताप. ३ कमतरता; अुणीव.

दरेरना—क्रि. स. [सं.] चेंदामेंदा करणें; रगडणें; वाटणें.

दरेरा—पु. [सं.] १ रेटा; धक्का. २ पाण्याची ओढ.

दरोग़—पु. [फा.] खोटें; असत्य. **दरोग़हलफ़ी**–स्त्री. खरें बोलण्याची शपथ घेअून खोटें बोलणें (विशेषतः कोर्टांत).

दर्ज़—वि. [फा.] नमूद; लिखित.

दर्ज़—स्त्री. [फा.] भेग; फट.

दर्जा—पु. [अ.] १ पद; दर्जा. २ श्रेणी; वर्ग. ३ हुद्दा.

दर्जी—पु. [फा.] शिंपी.

दर्द—पु. [फा.] १ दुःख; पीडा. २ दया; करुणा. (मु.) **दर्द खाना**–दया दाखविणें.

दर्दनाक—वि. [फा.] करुणाजनक.

दर्दमंद—वि. [फा.] १ दुःखी; पीडित. २ दयाळू.

दर्रा—पु.[फा.] १ डोंगरांतील दरी. २ डोंगरांमधील अरुंद वाट; घाट.

दर्राना—क्रि. अ. [अनु.] वेधडक निघून जाणें.

दल—पु. [सं.] १ पान; दळ. २ फुलाची पाकळी. ३ तमालपत्र. ४ समूह. ५ फाज; सैन्य. ६ गट; पक्ष.

दलक—स्त्री. [अ.] गोधडी.

दलक—स्त्री. [सं.] १ आघातामुळें अुत्पन्न झालेला कंप. २ ठणका; ठसठस. **दलकन**–स्त्री. १ कंप; थरकांप. २ आघात.

दलकना—क्रि. अ. [सं.] १ भेग पडणें; फाटणें. २ सावध होणें. ३ त्रासणें. ४ थरकांप होणें. क्रि. स. भिवविणें.

दलदल—स्त्री. [सं.] दलदल. **दलदला**–वि. दलदलीची.

दलना—क्रि. स. [सं.] १ दळणें. २ वाटणें. ३ चेंदामेंदा करणें; चिरडणें. ४ मळणें. [संघटना.

दलबंदी—स्त्री. [सं. + फा.] पक्ष

दलबल—पु. [सं.] फौजफाटा.

दलबादल—पु. [सं.] १ मेघसमूह. २ मोठी फौज. ३ मोठा मंडप.

दलमलना—क्रि.स. [सं.] १ मळणें; अेकजीव करणें. २ चेंदामेंदा करणें; चिरडणें. ३ नाश करणें.

दलहन—पु. [सं.] डाळीचीं धान्यें.

दलान, दालान—पु. [फा.] दालन. [वि. दरिद्री.

दलिद्दर—पु. [सं.] दारिद्र्य.

दलिया—पु. [सं.] १ भरडलेलें धान्य. २ रवा.

दलील—स्त्री. [अ.] १ युक्तिवाद. २ वादविवाद.

दव—पु. [सं.] १ दावाग्नि. २ जंगल. ३ अग्नि.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दवकैया—पु. [सं.] जरीची तार तयार करण्यासाठीं सोनें, रुपें ठोकून पत्रा तयार करणारा.

दवन*—पु. [सं.] नाश; पाडाव.

दवनी—स्त्री.[सं.] धान्याची मळणी.

दवरिया*—स्त्री. [सं.] वणवा; दावाग्नि. [वणवा; दावाग्नि.

दवागि, दवागिन—स्त्री. [सं.]

दवा, दवाअी—स्त्री. [अ.] १ औषध. २ अुपचार; अिलाज.

दवात—स्त्री. [अ.] दौत.

दवामी—वि. [अ.] चिरकाल टिकणारा; स्थायी.

दवामीबंदोबस्त—पु. [अ. + फा.] कायमधारापद्धति.

दवारी*—स्त्री. [सं.] दावानल.

दशहरा—पु. [सं.] १ ज्येष्ठ शुद्ध दशमी (यास गंगादशहरा असें म्हणतात). २ विजयादशमी.

दशाह—पु. [सं.] मृतकाचा दहावा दिवस.

दस—वि. [सं.] दहा.

दसन*—पु. [सं.] १ दांत. २ कवच. ३ शिखर.

दसना—क्रि. अ. [सं.] पसरणें; फैलावणें. क्रि. स. पसरणें; अंथरूण घालणें. पु. बिछाना; अंथरूण.

दसमाथ*—पु. [सं.] दहा शिरें असलेला रावण.

दसी—स्त्री. [सं.] १ वस्त्राचा शेवटचा भाग; दशा. २ कापडाचें ठाण.

दस्तंदाज़ी—स्त्री. [फा.] हस्तक्षेप; ढवळाढवळ; लुडबुड.

दस्त—पु. [फा.] १ जुलाबाचें औषध; रेचक. २ जुलाब. ३ हात.

दस्तक—स्त्री. [फा.] १ टिचकी; दार ठोठावणें. २ महसूलवसुलीसाठीं अटक किंवा वसुलीचा परवाना. ३ मालवाहतुकीचा परवाना. ४ महसूल.

दस्तकार—पु. [फा.] हस्तकौशल्याचें काम करणारा; कारागीर.
दस्तकारी—स्त्री. हस्तकौशल्य; शिल्पकला. [सही.

दस्तख़त—पु. [फा.] हस्ताक्षर;

दस्तगीर—वि. [फा.] संकटांत साहाय्य करणारा.

दस्तबरदार—वि. [फा.] अेखाद्या वस्तूवरील आपला तावा सोडणारा.

दस्तयाब—वि. [फा.] हस्तगत; प्राप्त.

दस्तरख़ान-ख़्वान—पु. [फा.] जेवणाच्या वेळीं ताटाखालीं अंथरावयाची चादर.

दस्ता—पु. [फा.] १ मूठ (काठी किंवा शस्त्र). २ फुलांचा गुच्छ. ३ कागदाचा दस्ता. ४ मूठ (हातांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राहील अितकें). ५ शिपायांची तुकडी.

दस्ताना—पु. [फा.] हातमोजा.

दस्तार—स्त्री. [फा.] पगडी.

दस्तार-बंद—पु. [फा.] पगडी बांधणारा.

दस्तावर—वि. [फा.] रेचक.

दस्ती—वि. [फा.] हाताचें. स्त्री. १ मशाल. २ लहान मूठ. ३ लहान कलमदान.

दस्तूर—पु. [फा.] १ पद्धत; वहिवाट; चाल. २ नियम; कायदा. ३ पारशी धर्मगुरु. [कमिशन.

दस्तूरी—स्त्री. [फा.] दलाली;

दह—वि. [फा.] दहा (संख्या).

दह—पु. [सं.] डोह; खोल पाण्याची जागा.

दह—स्त्री. [सं.] जाळ;आगीचा डोंब.

दहकना—क्रि. अ. [सं.] १ चेतणें; पेट घेणें; भडकणें. २ अंग तापणें.

दहकाना—क्रि. स. [सं.] चेतविणें; पेटविणें; शिलगावणें.

दहड़दहड़—क्रि. वि. [सं.] धडाडून (पेटणें).

दहना—क्रि. अ. [सं.] १ जळणें; भस्म होणें. २ रागावणें; जळफळणें. क्रि. स. १ जाळणें. २ दुःख देणें.

दहना—क्रि. अ. [सं.] रुतणें; खचणें.

दहनि*—स्त्री. [सं.] दहन; जळणें.

दहपटना—क्रि. स. [फा.] अुध्वस्त करणें; जमीनदोस्त करणें. दहपट—वि. १ अुध्वस्त; जमीनदोस्त. २ तुडविलेला; पायाखालीं चिरडलेला. [कुंड.

दहर—पु. [सं.] १ डोह. २ हौद;

दहरना*—क्रि. अ. [सं.] थरकांप होणें; भयभीत होणें.

दहलना—क्रि. अ. [सं.] थरकांप होणें. दहल—स्त्री. थरकांप.

दहला—पु. [फा.] दश्या (पत्त्यांतील). [विणें.

दहलाना—क्रि. स. [सं.] भिव-

दहलीज़—स्त्री. [फा.] अुंबरा; अुंबरठा.

दहा—पु. [फा.] १ मोहरमचा महिना. २ मोहरमचे दहा दिवस. ३ तावूत.

दहाअी—स्त्री. [फा.] १ दहावा; दशांश. २ संख्येंतील 'दहं' स्थान.

दहाड़ना—क्रि. अ. [अनु.] गर्जना करणें; किंकाळी फोडणें. (मु.) दहाड़ मारना—१ किंकाळी फोडणें. २ धाय मोकलून रडणें; मोठ्यानें रडणें. दहाड़—स्त्री. १ हिंस्र पशूची गर्जना; किंकाळी. २ आर्तस्वर.

दहाना—पु. [फा.] १ बंद तोंड. २ नदीचें मुख. ३ मोरी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दहिना—वि. [सं.] अुजवा.

दहिने—क्रि. वि. [सं.] अुजवीकडे. (मु.) दहिने होना–अनुकूल होणें. (यौ.) दहिने बाअें–दोन्ही बाजूंस.

दहु*—अव्य. [सं.] १किंवा;अथवा. २ कदाचित्.

दहेंड़ी—स्त्री. [सं.] दही विरज-ण्याचें मातीचें भांडें.

दहेज़—पु. [अ.] हुंडा, आंदण अि. लग्नांत वरपक्षास दिलें जाणारें धन.

दाँ—पु. [फा.] जाणणारा; तज्ज्ञ; माहितगार.

दाँत—पु. [सं.] दांत. (मु.) दाँतो अुँगली काटना किंवा दाँतो तले अुँगली दबाना–१चकित होणें; मुग्ध होणें. २ खेद प्रकट करणें. दाँत काटी रोटी–जीवश्वकंठश्व मैत्री. दाँत चबाना–रागानें दांत खाणें. दाँत पीसना–रागानें दांत खाणें. दाँत तोड़ना–हैराण करणें. दाँत बैठ जाना–दांतखीळ बसणें. दाँतोंमें तिनका लेना–दांतीं तृण धरणें.

दाँताकिटकिट—स्त्री. [सं.+अनु.] १ बाचाबाची; झगडा. २शिवीगाळ.

दांति—स्त्री. [सं.] १ अिंद्रिय-निग्रह; अिंद्रियदमन. २ अधीनता. ३ नम्रता; विनय.

दाँती—स्त्री. [सं.] कोयता; विळा.

दाँती—स्त्री. [सं.] बत्तिशी (दंतपंक्ति).

दाँवरी—स्त्री. [सं.] दावें; दोर.

दाअुँ—पु. [सं.] पाळी; खेप.

दाअू—पु. [सं.] १ वडील भाअू. २ कृष्णाचा वडील भाअू बलदेव.

दाख*—स्त्री. [सं.] १ द्राक्ष. २ मनुका. ३ वेदाणा; किसमीस.

दाख़िल—वि. [अ.] १ हजर; दाखल झालेला. २ शिरकाव झालेला. ३ मिसळलेला; भाग घेतलेला. (मु.) दाख़िल करना–दाखल करणें; जमा करणें.

दाख़िल-ख़ारिज—पु. [अ.+फा.] सरकारी कागदपत्रांत संपत्तीच्या वारसांच्या नांवाची केलेली नोंद.

दाख़ल-दफ़्तर—वि. [अ.+फा.] निकालांत निघालेला; दप्तरीं जमा झालेला (कागद).

दाख़िला—पु. [अ.] प्रवेश; शिरकाव.

दाग़—पु. [फा.] १ डाग; डागळ-ल्याची खूण. २अग्निसंस्कार.३ दाह.

दागना—क्रि. स. [फा.] १ डाग पाडणें.२पोळविणें;डागणें. ३जाळणें. ४ डागणें (बंदूक, तोफ).

दागवेल—स्त्री. [फा.+सं.] १ पाया खोदण्यासाठीं आंखलेल्या रेघा. २ पाया.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दाघ*—पु. [सं.] १ अुष्णता. २ अीर्ष्या; मत्सर.

दाजन-झन*—स्त्री. [सं.] १दाह. २ अीर्षा. [२ द्वेष करणें.

दाजना*—क्रि. अ. [सं.] १जळणें.

दाड़िम—पु. [सं.] डाळिंब.

दाढ़—स्त्री. [सं.] डरकाळी; गर्जना.

दाढ़ना*—क्रि. स. [सं.] जाळणें; भस्म करणें.

दाढ़ीजार—पु. [सं.] १ दाढी जळालेला. २ अेक शिवी (स्त्रिया रागावल्यावर पुरुषांना देतात).

दात, दातार*—पु. [सं.] दाता; देणारा. [दांतवण.

दातुन, दातौन—स्त्री. [सं.]

दाद—स्त्री. [सं.] अेक चर्मरोग; गजकर्ण.

दाद—स्त्री.[फा.] न्याय; दाद. (मु.) दाद देना–१ न्याय करणें. २ स्तुति करणें.

दादनी—स्त्री. [फा.] १ परत फेडीची रक्कम. २ ऋण; कर्ज.

दादा—पु. [सं.] आजोबा (वडिलांचे वडील). २ थोरला भाअू. ३ वृद्धांसाठीं आदरसूचक शब्द. दादी–स्त्री. आजी. [मागणारा.

दादा—पु. [फा.] फिर्यादी; दाद

दादु*—स्त्री. [सं.] गजकर्ण.

दादुर—पु. [सं.] बेडूक.

दाध*—स्त्री. [सं.] दाह; दुःख; ताप. [नष्ट करणें.

दाधना*—क्रि. स. [सं.] जाळणें;

दान—पु. [सं.] १ दान. २ देण्यांत आलेली वस्तू. ३ कर; वसूल.

दान-दाँ—वि. [फा.] १ ज्ञाता; माहितगार. २ आश्रयदाता.

दानवारि—पु. [सं.] हत्तीचा मद.

दाना—पु. [फा.] १ धान्याचा कण. २ धान्य. ३ भाजलेलें धान्य. ४ बी. ५ दाणा (मोती अि.). ६ मणी. ७ रवा. ८ कण. (मु.) दाने दाने को तरसना–खावयास न मिळणें. दाने दाने को मुहताज–अत्यंत गरीब.

दाना—वि. [फा.] १ बुद्धिमान्; हुषार. २ ज्ञानी. ३ चतुर.

दानाअी—स्त्री [फा.] बुद्धिमत्ता; हुशारी.

दानादानी—पु. [फा. + सं.] १ खाणें पिणें. २ अुपजीविका.

दानिश—स्त्री. [फा.] अक्कल; हुशारी.

दानिशमंद—वि. [फा.] बुद्धिवान्; समजूतदार. दानिशमंदी–स्त्री. बुद्धिमत्ता. [रवाळ.

दानेदार—वि. [फा.] दाणेदार;

दानी—वि. [सं.] अुदार; दानशूर.

दानौ*—पु. [सं.] दानव.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दाप—पु. [सं.] १ दर्प; अहंकार. २ ताकद; शक्ति. ३ राग; क्रोध. ४ उत्साह. ५ दुःख; मनस्ताप.

दापना*—क्रि. स. [सं.] १ दाबणें. २ मनाअी करणें.

दाम—पु. [सं.] १ दोरी. २ माळ; लड. ३ समूह; रास.

दाम—पु. [सं.] १ मूल्य; किंमत. २ धन. ३ रुपया. (मु.) **दाम चुकाना**–किंमत देणें; पैसे देणें.

दाम—पु. [फा.] पाश; बंधन.

दामन—पु. [फा.] १ पदर; अंचल. २ डोंगराचा पायथा. ३ कोट; अंगरखा अि.चा खालचा भाग.

दामाद—पु. [फा.] जांवअी.

दामी—स्त्री. [सं.] महसूल; कर. वि. बहुमोल. [२ पाळी.

दायँ-य—पु. [सं.] १ खेप; वेळ.

दायज-जा—पु. [सं.] हुंडा.

दायर—वि. [अ.] १ रुजू; दाखल (दावा, फिर्याद). २ चालता; फिरता. (मु.) **दायर करना**–फिर्याद दाखल करणें.

दायरा—पु. [अ.] घेर; परीघ; वर्तुळ.

दाया—स्त्री. [फा.] दाअी.

दाया*—स्त्री. [सं.] दया; कृपा.

दायाद—पु. [सं.] १ वांटेकरी (संपत्तीचा). २ गोत्रज. ३ मुलगा. वि. वांटेकरी.

दायित्व—पु. [सं.] जबाबदारी.

दायें—क्रि. वि. [सं.] अुजवीकडे. (मु.) **दायें होना**–अनुकूल होणें; प्रसन्न होणें.

दारचीनी—स्त्री. [सं.] दालचिनी.

दारमदार—पु. [फा.] १ आधार; आश्रय. २ अवलंब; आसरा.

दारि*—स्त्री. [सं.] डाळ.

दारिअुँ*—पु. [सं.] १ डाळिंब. २ वेलदोडा.

दारिका*—स्त्री. [सं.] १ बालिका; मुलगी. २ कन्या. [निर्धनता.

दारिद*—पु. [सं.] दारिद्र्य; गरीबी;

दारू—स्त्री. [फा.] १ मद्य; दारु. २ औषध. ३ बंदुकीची दारू.

दारोग़ा—पु. [फा.] फौजदार.

दाल—स्त्री. [सं.] डाळ.

दालमोट—स्त्री. [सं.] खारी डाळ; तळलेली मसालेदार डाळ.

दावँ—पु. [सं.] १ पाळी; खेप; फेरा. २ संधि; योग. ३ डाव; पेंच. ४ कपट; युक्ति.

दावँना-वना—क्रि. स. [सं.] मळणें (धान्य).

दावत—स्त्री. [अ.] मेजवानी.

दावा—पु. [अ.] १ हक्क; दावा; अधिकार. २ फिर्याद. ३ आरोप. ४ ठांसून सांगणें. (मु.) **दावा करना**–१ठासून सांगणें; निश्चयपूर्वक सांगणें. २ दावा, फिर्याद करणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दावा—स्त्री. [सं.] वणवा.

दावात—स्त्री. [अ.] दौत.

दावादार—पु. [अ.+फा.] दावेदार; हक्क सांगणारा. [वृत्तांत.

दास्तान—स्त्री. [फा.] कहाणी;

दाहना-हिना—वि. [सं.] अुजवा.

दिअली—स्त्री. [सं.] १ पणती. २ जखमेवरील खपली.

दिआ—पु. [सं.] दिवा; पंती.

दिक़्—स्त्री. [सं.] दिशा; बाजू.

दिक़—वि. [अ.] १ त्रस्त; हैराण. २ अस्वस्थ; आजारी. (मु.) दिक़ करना-त्रास देणें; सतावणें. पु. क्षयरोग.

दिक़्कत—स्त्री. [अ.] १ अडचण. २ त्रास; संकट. ३ कठिणता.

दिखलाना—क्रि. स. [सं.] दाखविणें. **दिखलाअी**—स्त्री. पाहण्याची किंवा तपासण्याची फी.

दिखहार*—पु. [सं.] दर्शक; पाहणारा. [वरपांगी.

दिखावटी—वि. [सं.] दिखाअू;

दिखावा—पु. [सं.] अवडंबर; देखावा; ढोंग; दिखाअूपणा.

दिखैया*—पु. [सं.] १ पाहणारा; प्रेक्षक. २ दाखविणारा.

दिखौआ—वि. [सं.] दिखाअू; बाह्यात्कारी.

दिगर—वि. [फा.] अन्य; दुसरा.

दिग्घ*—वि. [सं.] दीर्घ; लांब.

दिठाना—क्रि. अ. [सं.] दृष्ट लागणें. क्रि.स. दृष्ट लावणें. **दिठौना**—पु. तीट (दृष्ट लागूं नये हणून).

दिढ़*—वि. [सं.] दृढ; मजबूत.

दिढ़ाना—क्रि. स. [सं.] दृढ करणें.

दिन—पु. [सं.] दिवस. (मु.) **दिन चढ़ना** अथवा **निकलना**—सूर्योदय होणें. **दिन छिपना** अथवा **डूबना**—सूर्य मावळणें. **दिन ढलना**—संध्याकाळ होणें. **दिन दूना रात चौगुना होना**—१ शुक्लेंदुवत् वृद्धिंगत होणें. २ भरभराट होणें. **दिन दहाड़े**—दिवसा ढवळ्या; भर दिवसा. **दिन काटना** अथवा **पूरे करना**—१ वेळ घालविणें. २ गुजराण करणें; निर्वाह करणें.

दिनराअि*—पु. [सं.] सूर्य. [पदार्थ.

दिनाअी*—स्त्री. [सं.] विषारी

दिनार—पु. [फा.] मोहोर (नाणें). वि. जुना.

दिनौंधी—स्त्री. [सं.] दिवसा न दिसणें; दिनांधत्व (रोग).

दिपति*—स्त्री. [सं.] दीप्ति; प्रकाश; तेज. [चकाकणें.

दिपना*—क्रि. अ. [सं.] प्रकाशणें;

दिब*—पु. [सं.] दिव्य; परीक्षा.

दिमाग़—पु. [अ.] १ मेंदू; मस्तिष्क. २ बुद्धि; अक्कल. **दिमाग़ी**—वि. बौद्धिक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिमाग़दार—वि. [अ. + फा.] १ बुद्धिमान्. २ गर्विष्ठ. [ठाणअी.

दियट—स्त्री. [सं.] ठाणवअी;

दियना*—पु.[सं.] दिवा. [जमीन.

दियारा—पु. [फा.] मळींची

दिरम—पु. [अ.] १ चांदीचें अेक नाणें. २ साडेतीन मासे वजन.

दिरद*—पु. [सं.] हत्ती. [अुपचार.

दिरमान—पु. [फा.] अिलाज;

दिल—पु. [फा.] १ हृदय; अंतःकरण. २ मन. (मु.) दिल कड़ा करना–हिंमत बांधणें. दिल का बादशाह–१ अत्यंत अुदार. २ लहरी. दिल के फफोले फोड़ना–आपला राग काढणें. दिल देना–प्रेम करणें. दिल से–मनापासून; मन लावून. [र्षक; मनोहर.

दिलकश-शा—वि. [फा.] आक-

दिलगीर—वि. [फा.] १ अुदास. २ दुःखी.

दिलचला—वि. [फा. + सं.] १ साहसी; धाडसी. २ शूर. ३ स्वच्छंदी.

दिलचस्प—वि. [फा.] मनोवेधक; चित्ताकर्षक. दिलचस्पी–स्त्री:आवड; गोडी.

दिलजमअी—स्त्री. [फा.] १ संतोष. २ मिलाफ. ३ खातरजमा; विश्वास.

दिलजला—वि. [फा.+सं.] जीव पोळलेला; दुःखी.

दिलबर—पु. [फा.] प्रियकर. स्त्री. प्रेयसी; प्रिया.

दिलरुबा—पु. [फा.] प्रियकर; प्रेमपात्र. स्त्री.–प्रियकरी.

दिलवाना, दिलाना—क्रि. स. [सं.] देवविणें.

दिलावर—वि. [फा.] १ शूर; बहादुर. २ अुत्साही.

दिलासा—पु. [फा.] धीर; सांत्वन.

दिली—वि.[फा.]१हार्दिक.२घनिष्ट.

दिलेर—वि. [फा.] १ बहादुर; शूर. २ साहसी. दिलेराना–वि. वीरोचित.

दिल्लगी—स्त्री. [फा. + सं.] थट्टा; मस्करी; विनोद. दिल्लगीबाज़–पु. थट्टेखोर; विनोदी. (मु.) दिल्लगी अुड़ाना–अुपहास करणें.

दिव—पु. [सं.] १ स्वर्ग. २ आकाश. ३ वन. ४ दिवस.

दिवाला—पु. [सं.] दिवाळें. (मु.) दिवाला मारना–दिवाळें काढणें. दिवालिया–वि. दिवाळखोर.

दिष्टि, दिसिटि—स्त्री. [सं.] दृष्टि.

दिस-सि*—स्त्री. [सं.] दिशा.

दिसावर—पु. [सं.] परदेश.

दिसैया*—वि. [सं.] १ पाहणारा. २ दाखविणारा.

दिहंदा—वि. [फा.] दाता; देणारा.

दिहाड़ा—पु. [सं.] १ वाअीट स्थिति. २ दिवस.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दीअट, दीआ—पु. [सं.] दिवा.

दीखना—क्रि. अ. [सं.] दिसणें; दृष्टिगोचर होणें.

दीगर—वि. [फा.] अन्य; दुसरा.

दीघी—स्त्री. [सं.] १ मोठी विहीर. २ तलाव.

दीठ*—स्त्री. [सं.] १ दृष्टि. २ दृष्ट; वाओट नजर. ३ कृपादृष्टि. (मु.) दीठ जलाना–दृष्ट काढणें.

दीदा—पु. [फा.] १ दृष्टि; नजर. २ डोळा. दीदा लगना–मन लावणें. दीदे का पानी ढल जाना–निर्लज्ज बनणें.

दीदार—पु. [फा.] दर्शन; भेट.

दीदा व दानिस्ता—क्रि. वि. [फा.] जाणून बुजून; बुद्धिपुरस्सर.

दीदी—स्त्री. [सं.] वडील बहिणीला हांक मारण्याचें टोपण नांव; अक्का.

दीन—पु. [अ.] धर्म.

दीनदार—वि. [अ.+फा.] धार्मिक; आपल्या धर्मावर श्रद्धा ठेवणारा.

दीन-दुनिया—स्त्री. [अ.] अिहलोक व परलोक.

दीनार—पु. [फा.+सं.] १ सोन्याचा दागिना. २ मोहर; स्वर्णमुद्रा.

दीपत*—स्त्री. [सं.] १ दीप्ति; कांति; चमक. २ कीर्ति; प्रताप.

दीपना*—क्रि. अ. [सं.] चकाकणें; प्रकाशणें. क्रि. स. प्रकाशित करणें.

दीबाचा—पु. [फा.] प्रस्तावना; भूमिका.

दीमक—स्त्री. [फा.] वाळवी (पुस्तकें खराब करणारा किडा).

दीयट-वट—स्त्री. [सं.] १ दिवा ठेवण्याची तिवअी; ठाणअी. २दिवा.

दीया—पु. [सं.] दिवा.

दीयासलाअी—स्त्री. [सं.] आगकाडी. [लांवट. २ मोठा.

दीरघ*—वि. [सं.] १ दीर्घ;

दीर्घश्रुत—वि. [सं.] १ दूरवर अैकूं जाणारा. २ नांवाजलेला; विख्यात.

दीवान—पु. [अ.] १ राजसभा. २ दिवाण; राजाचा मंत्री. ३गज्जल–संग्रह.

दीवाना—वि. [फा.] १ छांदिष्ट; नादी. २ अेखाद्या ध्येयानें वेडा झालेला. [२ दिवाणी कचेरी.

दीवानी—स्त्री. [फा.] १दिवाणगिरी.

दीवार-ल—स्त्री. [फा.] भिंत.

दीवारगीर–पु. १ दिवा ठेवण्यासाठीं भिंतीला केलेली जागा. २ भिंतीला टांगण्याचा दिवा. [नजरेस येणें.

दीसना—क्रि. स. [सं.] दिसणें;

दुंद—पु. [सं.] १ द्वंद; दोन मनुष्यांतील युद्ध अथवा झगडा. २ अुत्पात; अुपद्रव. ३ जोडा; युग्म.

दुंद—पु. [सं.] नगारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुंबा—पु. [फा.] मेंढा.

दु—वि. [सं.] 'दो' चें संक्षिप्त रूप. (समासांत वापरण्यासाठीं. अ. दुविधा.)

दुआ—स्त्री. [अ.] १ प्रार्थना; विनंति. २ आशीर्वाद.

दुआबा—पु. [फा.] दोआब; दोन नद्यांमधील प्रदेश.

दुआर—पु. [सं.] दरवाजा; द्वार. दुअरिया-स्त्री.

दुआरी—स्त्री.[सं.] लहान दरवाजा.

दुआल—स्त्री. [फा.] १ कातडें. २ कातड्याचा पट्टा. **दुआली**-स्त्री. धार लावण्याचा यंत्राचा पट्टा.

दुकाल—पु. [सं.] दुष्काळ.

दुकूल—पु. [सं.] रेशमी वस्त्र.

दुकेला-पु. [सं.] सोबती असलेला. (यौ.) **अकेला दुकेला**-अेकटा-दुकटा. **दुकेले**-क्रि. वि. दुसऱ्या-बरोबर.

दुक्का—वि. [सं.] जोडी. (यौ.) **अिक्का दुक्का**-अेकटादुकटा.

दुक्की—स्त्री. [सं.] पत्त्यांतील दुरी.

दुखंडा—वि. [सं.] दुमजली.

दुखड़ा—पु. [सं.] १ करुण कहाणी; रडगाणें. २ कष्ट; विपत्ति. (मु.) **दुखड़ा रोना**-स्वतःची करुण कथा सांगणें; दुःख सांगणें.

दुखना—क्रि. अ. [सं.] १ दुखणें; दुखावणें. २ पीडा होणें.

दुखरा*—पु. [सं.] १ दुःखाची कथा. २ संकट; आपत्ति.

दुखारा-री, दुखियारा—वि. [सं.] दुःखी; कष्टी.

दुखौहाँ*—वि. [सं.] दुःखदायक.

दुगअी—स्त्री. [दे.] व्हरांडा.

दुगदुगी—स्त्री.[अनु.] १ छातीच्या मध्यभागाचा खोल भाग. २ अेक दागिना.

दुगना—वि. [सं.] दुप्पट.

दुग्ग*—पु. [सं.] दुर्ग; किल्ला.

दुचंद—वि. [फा.] दुप्पट.

दुचित*—वि. [सं.] १ गोंधळलेला; अस्थिर. २ चिंतायुक्त. **दुचितअी**-स्त्री. आशंका; द्विविधा मनस्थिति.

दुचिताअी*—स्त्री. [सं.] १ संदेह; चित्ताची अस्थिरता. [ब्राह्मणश्रेष्ठ.

दुजेश*—पु. [सं.] द्विजेश;

दुटूक—वि. [सं.] दोन तुकडे झालेला; तुटलेला. (मु.) **दुटूक बात**-थोड्क्यांत पण स्पष्ट कथन.

दुतकारना—क्रि. स. [अनु.] धुडकावून लावणें; झिडकारणें. **दुतकार**-स्त्री. धिक्कार; झिडकार.

दुति—स्त्री. [सं.] १ कांति; तेज. २ शोभा; सौंदर्य. ३ किरण.

दुतिया-तीया*—स्त्री. [सं.] द्वितीया (तिथि).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुदलाना—क्रि. स. [अनु.] झिडकारणें.

दुधार, दुधैल—वि. [सं.] पुष्कळ दूध देणारी; दुधाळ.

दुधिया, दूधिया—वि. [सं.] १ दुधाच्या रंगाचा. २ दुधाचा; दूध मिसळलेला.

दुनवना*—क्रि.अ. [सं.] दुमडणें.

दुनियाँ*—स्त्री. [अ.] जग. (यौ.) दीन-दुनिया-लोक परलोक.

दुनियादार—वि. [अ. + फा.] १संसारांत गुरफटलेला. २व्यवहारकुशल. दुनियादारी-स्त्री. प्रपंच; व्यवहार (कार्य साधून घेण्याचा).

दुनियासाज़—वि. [अ. + फा.] व्यवहारचतुर.

दुनी*—स्त्री. [अ.] दुनिया; जग.

दुपट्टा—पु. [सं.] दुपेटा; अुपरणें. (मु.) दुप्पटा तानकर सोना-निश्चिंत झोपणें; पांघरूण घेअून स्वस्थ झोपणें.

दुपहर, दुपहरिया, दुपहरी—स्त्री. [सं.] दुपार.

दुफ़सली—वि. [सं. + अ.] दोन्ही हंगामांत होणारें पीक.

दुबधा—स्त्री. [सं.] १ बुचकळा; द्विधा चित्त; अनिश्चितपणा. २ संदेह; संशय. ३ चिंता; काळजी.

दुबराना—क्रि. अ. [सं.] दुबळें होणें; क्षीण होणें.

दुबला—वि. [सं.] १ दुबळा; अशक्त. २ सडपातळ; कृश. दुबलापन-पु. क्षीणता; कृशता.

दुबारा, दोबारा—क्रि. वि. [फा.] दुसऱ्यांदा; फिरून. [मजली.

दुमंज़िला—वि. [सं.+फा.] दोन

दुम—स्त्री. [फा.] शेपूट. [आअी.

दुमाता-वि. स्त्री. [सं.] सावत्र

दुरद, द्विरद*—पु. [सं.] हत्ती.

दुरदाम*—वि. [सं.] दुर्दम; कष्टसाध्य. [कावणें; झिडकारणें.

दुरदुराना—क्रि. स. [सं.] धुड-

दुरना*—क्रि. अ. [सं.] दूर होणें; नजरेआड होणें; छिपणें.

दुरपदी*—स्त्री. [सं.] द्रौपदी.

दुरमुस—पु. [सं.] चोपणी; पिटणी; ठोकणी.

दुराना—क्रि. अ. [सं.] १ दूर असणें; लांब असणें. २ छिपून राहणें. क्रि. स. १ दूर करणें. २ टाकणें; सोडणें. ३ लपविणें; गुप्त ठेवणें.

दुराव—पु. [सं.] १ गुपित; गौप्य. २ कपट.

दुरुखा—वि. [सं.+फा.] १ दोन्ही बाजूंस तोंडें असलेला; दोमुखी. २ दोन्ही बाजूंस दोन रंग असलेला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुरुस्त—वि. [फा.] १ चांगल्या स्थितींत असलेला. २ योग्य; उचित. ३ नीट; व्यवस्थित. **दुरुस्ती** स्त्री. सुधारणा; दुरुस्ती.

दुरुह—वि. [सं.] दुर्बोध; गूढ.

दुरेफ, द्विरेफ—पु. [सं.] भ्रमर; भुंगा.

दुर्गत—वि. [सं.] दुर्गतीस प्राप्त झालेला; दरिद्री. स्त्री. दुर्गती.

दुर्गपाल, दुर्गाध्यक्ष—पु. [सं.] किल्लेदार.

दुर्घटना—स्त्री. [सं.] १ अपघात. २ संकट; आपत्ति.

दुर्र—पु. [अ.] मोतीं.

दुर्रा—पु. [फा.] चाबूक.

दुलत्ती—स्त्री. [सं.] दुगाणी.

दुलभ*—वि. [सं.] दुर्लभ; दुर्मिळ.

दुलहन, दुलहिया, दुलही—स्त्री. [सं.] नवविवाहित स्त्री; नवरी मुलगी. [सुलगा; नवरा. २ पति.

दुलहा, दूल्हा—पु. [सं.] १ नवरा

दुलहेटा—पु.[दे.] लाडका मुलगा.

दुलारना—क्रि. स. [सं.] लाड करणें. **दुलार**-पु. लाड; प्रेम. **दुलारा**-वि. लाडका; प्रिय.

दुशवार—वि. [फा.] १ अवघड; कठीण. २ दुस्सह; असह्य.

दुशाला—पु. [सं.+फा.] शाल.

दुशासन*—पु. [सं.] दुःशासन (धृतराष्ट्राचा पुत्र).

दुश्मन—पु. [फा.] दुष्मन; शत्रु. **दुश्मनी**-स्त्री. वैर; शत्रुता.

दुसरिहा*—वि.[सं.] १ जोडीदार; मित्र. २ प्रतिस्पर्धी.

दुसाल—पु. [सं.] आरपार भोंक.

दुसूती—स्त्री. [सं.] अेक प्रकारची चादर.

दुसेजा—पु. [सं.] मोठा पलंग.

दुहता—पु. [सं.] दोहित्र; नातू; मुलीचा मुलगा.

दुहत्था—वि. [सं.] दोन्ही हातांनीं केलेलें; दुहाती (काम).

दुहना—क्रि. स. [सं.] १ धार काढणें; दूध काढणें. २ पिळून काढणें; निःसत्त्व करणें.

दुहनी—स्त्री. [सं.] धार काढण्याचें भांडें.

दुहाई, दुहावनी—स्त्री. [सं.] १ धार काढण्याचें काम. २ धार काढण्याची मजुरी.

दुहाई—स्त्री. [सं.] १ करुण हांक; धांवा. २ घोषणा; दवंडी. ३ शपथ. ४ जयजयकार. (मु.) **दुहाई देना**–अेखाद्याचें नांव घेऊन मदतीसाठीं हांक मारणें; जयजयकार करणें.

दुहाग—पु. [सं.] १ दुर्भाग्य. २ वैधव्य. **दुहागिन**-स्त्री. विधवा.

दुहागी—वि. स्त्री. [सं.] अभागिनी.

दुहाना—क्रि. स. [सं.] धार काढविणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुहिन*—पु. [सं.] ब्रह्मदेव.

दुहेला—वि. [सं.] १ कठीण; दुःसाध्य. २ दुःखी. पु. कठीण, त्रासदायक काम. [(तिथि).

दूअिज—स्त्री. [सं.] द्वितीया

दूक*—वि. [सं.] कांहीं.

दूखना*—क्रि. स. [सं.] दोष लावणें; दोष देणें.

दूज—स्त्री. [सं.] द्वितीया (तिथि). (मु.) दूज का चाँद होना–दर्शन दुर्लभ होणें.

दूध पिलाअी—स्त्री. [सं.] १ दूध पाजणारी दाअी. २ लग्नांतील अेक रीत. ३ दुग्धपान.

दूध-पूत—पु. [सं.] संतति-संपत्ति (लाक्षणिक).

दूधमुँहा—वि. [सं.] १ अंगावर पिणारें (मूल). २ अगदीं लहान. दूधमुख–अंगावर पिणारा.

दूधिया—वि. [सं.] दुधाच्या रंगाचा; पांढरा स्वच्छ.

दून—स्त्री. [सं.] दुपटी (संख्या). (मु.) दून की लेना अथवा हाँकना–प्रौढी मिरविणें; बाता मारणें.

दूना—वि. [सं.] दुप्पट. [२ दोन्ही.

दूनौ*—वि. [सं.] १ दोघेहि.

दूब—स्त्री. [सं.] दुर्वा; हरळी.

दूबदू—क्रि. वि. [फा.] समोरा-समोर; प्रत्यक्ष.

दूबरा—वि. [सं.] दुबळा; अशक्त.

दूभर—वि. [सं.] कठिण; अवघड.

दूमना*–क्रि. अ. [सं.] हलणें; डोलणें.

दूरंदेश—वि. [फा.] दूरदर्शी.

दूरबीन—स्त्री. [फा.] दुर्बीण.

दूरी—स्त्री. [सं.] अंतर; लांबी.

दूसरा—वि. [सं.] दुसरा.

दूहा*—पु. [सं.] दोहा.

दे, देअी*—स्त्री. [सं.] स्त्रियांचा आदरसूचक शब्द; देवी.

देखनहारा*—पु. [सं.] पाहणारा; निरीक्षक.

देखना—क्रि. स. [सं.] १ पाहणें. २ तपासणें; पाहणी करणें; परीक्षा करणें. ३ शोधणें; हुडकणें. ४ देख-रेख ठेवणें. ५ अनुभव करणें. ६ विचार करणें; समजणें. ७ ठीक करणें; निश्चित करणें. (मु.) देखना सुनना–माहिती करून घेणें.

देखभाल—स्त्री. [सं.] देखरेख; निरीक्षण; पाहणी.

देखराना-रावना*—क्रि.स. [सं.] १ दाखविणें. २ समजाविणें.

देखादेखी—स्त्री. [सं.] भेट; दर्शन. क्रि. वि. दुसऱ्याचें पाहून; अनुकरण करून.

देखाव—पु. [सं.] १ दृष्टीचा टप्पा. २ थाटमाट.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देखावट—स्त्री. [सं.] १ देखावा; दिग्दर्शन. २ थाटमाट.

देग—पु. [फा.] हंडा (अन्न शिजण्याकरितां). **देगचा**–पु. लहान भांडें. **देगची**–स्त्री.

देन—स्त्री. [सं.] १ देणगी; दिलेली वस्तु. २ दान (देण्याची क्रिया).

देनदार—पु. [सं. + फा.] ऋणी; देणेकरी.

देना—क्रि. स. [सं.] १ देणें. २ सोंपविणें. ३ ठेवणें. ४ लावणें. ५ बंद करणें.

देमान*—पु. [फा.] दिवाण; मंत्री.

देर–री—स्त्री. [फा.] १ अशीर; विलंब. २ वेळ.

देव—पु. [सं.] देव.

देव—पु. [फा.] १ दैत्य; राक्षस. २ धिप्पाड माणूस.

देवता—पु. [सं.] देव.

देवधुनि—स्त्री. [सं.] गंगानदी.

देवर—पु. [सं.] १ दीर. २ नवऱ्याचा धाकटा भाऊ. **देवरानी**–स्त्री. धाकट्या दीराची बायको; धाकटी जाऊ.

देवल—पु. [सं.] पुजारी; पंड्या.

देवल—पु. [सं.] देऊळ.

देवाल—वि. [सं.] १ दाता; देणारा. २ देणेदार.

देशनिकाला—पु. [सं.] हद्दपार केलेला.

देशीय—वि. [सं.] स्वदेशी; देशांत तयार झालेलें.

देस—पु. [सं.] देश. [वि. परदेशी.

देसावर—पु. [सं.] विदेश; देशांतर.

देहपात—पु. [सं.] मृत्यु.

देहरा—पु. [सं.] १ देव्हारा. २ देऊळ; मंदीर.

देहरा*—पु. [सं.] देह; शरीर.

देहरी–ली*—स्त्री. [सं.] अुंबरा; अुंबरठा.

देहात—पु. [फा.] खेडें; गांव. **देहाती**–वि. १ ग्रामीण; खेड्यांत राहणारा. २ अडाणी.

दैन*—पु. [सं.] दैन्य.

दैन—पु. [अ.] कर्म.

दैयत*—पु [सं.] दैत्य; राक्षस.

दैया*—पु. [सं.] दैव. अव्य. आश्चर्य किंवा दुःखोद्गार.[अकस्मात्.

दैवात्—क्रि. वि. [सं.] अचानक; अकस्मात्.

दोआब—पु. [फा.] दुआब; दोन नद्यांमधील प्रदेश.

दोग़ला—वि. [फा.] लेकावळा; जारज; अकुलीन.

दोगा—पु. [सं.] १ जाड पांघरूण. २ गिलावा; चुना.

दोच—स्त्री. [सं.] १ बुचकळा. २ धाक; दटावणी. ३ दुःख; कष्ट.

दोज़ख़—पु. [फा.] नरक. **दोज़ख़ी**–वि. महान् पापी. [टेकून (बसणें).

दोज़ानू—क्रि. वि. [फा.] गुडघे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोतरफ़ा—वि. [सं.+फा.] दोन्ही बाजूंचा; दोन्हीकडचा. क्रि. वि. दोन्हीकडे; दोन्ही बाजूंस

दोन—पु. [सं.] दरी.

दोन—पु. [सं.] १ संगम. २ दोन नद्यांमधील प्रदेश. ३ संगमस्थान.

दोना—पु. [सं.] द्रोण.

दोनों—वि. [सं.] दोघेहि.

दोपल्ली—वि. [सं.] दोन पदरी. स्त्री. अेक प्रकारची टोपी (कापडाचे दोन तुकडे शिवून तयार केलेली). [दोन वेळां.

दोबारा—क्रि. वि. [फा.] दोनदां;

दोमुँहा साँप—पु. [सं.] १ दुतोंडी साप. २ दुतोंड्या. ३ कुटिल; कपटी.

दोरंगी—स्त्री. [सं.] १ दोन रंग असलेला. २ कपट; फसवणूक.

दोराहा—पु. [सं. + फा.] दोन रस्ते फुटतात तें ठिकाण.

दोरुखा—वि. [सं.+फा.] १ दोन्ही बाजूंचा. २ ज्याच्या दोन्ही बाजूंस सारखे रंग आहेत असा. ३ अेका बाजूस अेक रंग व दुसऱ्या बाजूस दुसरा रंग असलेला.

दोश—पु. [फा.] खांदा. दोश-ब-दोश-खांद्याला खांदा लावून; समानतेनें.

दोस*—पु. [सं.] दोष.

दोसूती—स्त्री. [सं.] दोसुती चादर.

दोस्त—पु. [फा.] मित्र. दोस्ती-स्त्री. मैत्री.

दोस्ताना—पु. [फा.] दोस्ती; मैत्री.

दोहता—पु. [सं.] दोहित्र; नातू (मुलीचा मुलगा). दोहती-स्त्री. नात. [हातांनीं मारलेली थप्पड.

दोहत्थड़—पु. [सं.] दोन्ही

दोहद—स्त्री.[सं.] डोहाळे.

दोहन—पु. [सं.] धार काढणें.

दोहर—स्त्री. [सं.] दोन पदरी चादर. [२ दुप्पट.

दोहरा—वि. पु. [सं.] १ दुहेरी.

दोहराना—क्रि. स. [सं.] पुनरावृत्ति करणें; अुजळणी करणें.

दोहाअी—स्त्री. [सं.] १ करुण हांक; धांवा. २ शपथ. ३ घोषणा. ४ जयजयकार.

दोहाक-ग*—पु. [सं.] दुर्भाग्य.

दौं*—अव्य. [सं.] १ अथवा; किंवा; तर. २ कोण जाणे.

दौ*—स्त्री. [सं.] वणवा.

दौड़ धूप—स्त्री. [सं.] १ धांवपळ. २ प्रयत्न; अुद्योग; परिश्रम.

दौड़ना—क्रि. अ. [सं.] १ धांवणें; पळणें. २ प्रयत्न करणें; धावपळ करणें. (मु.) चढ दौड़ना-हल्ला चढविणें; आक्रमण करणें. दौड़ान-स्त्री. धाव; धावपळ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दौड़ाना—क्रि. स. [सं.] १ पळविणें; धावविणें. २ घिरट्या घालावयास लावणें. ३ ये जा करावयास लावणें. ४ पाठलाग करणें.

दौना—पु. [सं.] १ दवणा. (सुगंधी रोपटें).

दौर—पु. [अ.] १ चक्कर; फेरी. २ भ्रमण; संचार. ३ प्रभाव. ४ क्रम; पाळी. (यौ.) दौर दौरा—प्रभाव; प्राबल्य.

दौरान—पु. [फा.] १ संचार; व्याप्ति. २ प्रवास. ३ पाळी; खेप.

दौलतख़ाना—पु. [अ. + फा.] घर; निवासस्थान (आदरार्थी).

द्यौस*—पु. [सं.] दिवस.

ध

धंका*—पु. [सं.] १ धक्का. २ प्रहार; आघात.

धंधक, धंधरक—पु. [सं.] संसारांतील गुंतागुंत; जंजाळ.

धंधकधोरी—पु. [सं.] रात्रंदिवस कामांत गढलेला.

धँधला—पु. [सं.] १ पाखंड; ढोंग; कपट. २ बहाणा. [अुद्योग.

धंधा—पु. [सं.] धंदा; व्यवसाय;

धँवना—क्रि. स. [सं.] भाता फुंकणें किंवा चालविणें.

धँसना—क्रि. अ. [सं.] १ घुसणें; जोरानें आंत शिरणें. २ रुतणें; फसणें.

धक—स्त्री. [अनु.] धडधड (हृदयांतील); धकधक. (मु.) जी धकधक करना—१ अूर धडधडणें. २ आश्चर्यचकित होणें.

धकधकाना—क्रि. अ. [अनु.] १ धडधडणें; अूर खालीवर होणें. २ धगधगणें; भडभड पेटणें.

धकधकी—स्त्री. धडधड; धुगधुगी. (हृदयाची).

धकपकाना—क्रि. अ. [अनु.] घाबरणें; गांगरून जाणें; भयभीत होणें.

धका*—पु. [सं.] धक्का; आघात.

धकियाना—क्रि.स. [सं.] १ धक्का देणें; ढकलणें. २ गच्चाडी देणें.

धकेलना—क्रि. स. [सं.] ढकलणें.

धक्कामुक्की—स्त्री. [सं.] धक्काबुक्की; मारामारी.

धगड़ा—पु. [सं.] जार.

धज—स्त्री. [सं.] १ आरास; शोभा. २ सुंदर मांडणी.

धज्जी—स्त्री. [सं.] १ चिंधी. २ कागदाची पट्टी. ३ लोखंडाची लांब पट्टी. धज्जियाँ अुड़ाना-टर अुडविणें; फजिती करणें.

धड़ंग—वि. [सं.] नागडा अुघडा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धड़—स्त्री. [अनु.] अेखादी वस्तु वरून खालीं पडतांना धाडकन् होणारा आवाज. [खोड.

धड़—पु. [सं.] १ धड. २झाडाचें

धड़क—स्त्री. [अनु.] धडकी; भय; भीति. [धडकी.

धड़कन—स्त्री. [अनु.] धडधड; धड़कना—क्रि. अ. [सं.] धड-धडणें; छाती धुडणें (भीतीनें).

धड़का—पु. [अनु.] १ धडधड. २ धडकी. ३ बुजगावणें.

धड़काना—क्रि. स. [सं.] भिव-विणें; घाबरविणें.

धड़ल्ला—पु. [अनु.] धडका; सपाटा. धड़ल्लेसे अथवा धड़ल्ले के साथ–बेधडक; अेकदम.

धड़ा—पु. [सं.] वजन; जोख (शेर, अच्छेर अि.).

धड़ाका—पु. [अनु.] गडगडाट; धडधड असा आवाज. (मु.) धड़ाके से–झटपट. [ण्याचा आवाज.

धड़ाम—पु. [अनु.] खालीं पड-

धड़ी—स्त्री. [सं.] १ चार किंवा पांच शेरांचें वजन. २ पान खाल्ल्या-वर ओंठांवर अुठणारी तांबडी रेषा.

धतकारना—क्रि. स. [अनु.] धुडकावणें; झिडकारणें.

धधकना—क्रि. अ. [अनु.] धग-धगणें; भडकणें. धधक–स्त्री. १ आगीचा भडका; आगीचा डॉब. २ आंच.

धधकाना—क्रि. स. [अनु.] आग पेटविणें.

धनक—पु. [सं.] १ धनुष्य. २ अेक प्रकारची ओढणी.

धनतेरस—स्त्री. [सं.] धनत्रयो-दशी (आश्विन वद्य त्रयोदशी).

धनधाम—पु. [सं.] घरदार व धनदौलत.

धनधारी—पु. [सं.] धनाढ्य; श्रीमंत.

धना–नि*—स्त्री. [सं.] स्त्री; युवती.

धनि*—वि. [सं.] धन्य.

धनिया—पु. [सं.] १ कोथिंबीर. २ धणे.

धनुकबाअी—स्त्री. [सं.] धनुर्वात.

धनुहाअी*—स्त्री. [सं.] धनुर्युद्ध.

धन्ना*—वि. [सं.] धन्य.

धन्यवाद—पु. [सं.] १ शाबा-सकी; प्रशंसा. २ आभार. ३ अभि-नंदन.

धन्वा—पु. [सं.] १ धनुष्य. २ जलहीन प्रदेश.

धप—स्त्री. [अनु.] धपकन खालीं पडल्याचा आवाज.

धप—पु. [अनु.] धपका; धपाटा.

धपना—क्रि. अ. [सं.] १ जोरांत चालणें; भरभर चालणें. २ मारणें. धप्पा–पु. १ धपका; रट्टा; ठोसा. २ तोटा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धब्बा—पु. [दे.] १ डाग; ठिपका. २ कलंक.

धमकना—क्रि. अ. [अनु.] १ धपकन खालीं पडणें. २ दुखणें (डोकें). **धमक**-स्त्री. १ धपकन खालीं पडल्याचा आवाज. २ आघात; मार.

धमकाना—क्रि. स. [अनु.] १ धमकावणें. २ दटावणें.

धमाका—पु. [अनु.] १ मोठी किंवा जड वस्तु वरून खालीं पडल्याचा आवाज. २ अपघात; धक्का.

धमाचौकड़ी—स्त्री. [अनु.] १ धांगडधिंगा; धिंगामस्ती. २ अुपद्रव; कोलाहल. [दांडगाअी.

धमार—स्त्री. [अनु.] अुपद्रव;

धयषना*—क्रि. स. [सं.] १ चूर्ण करणें. २ मर्दन करणें; दाबणें.

धरक*—स्त्री. [अनु.] १ धडकी. २ धुगधुग. ३ शंका.

धरता—पु. [सं.] कर्जदार; देणेदार. [२ जमीन.

धरती*—स्त्री. [सं.] १ पृथ्वी.

धरन—स्त्री. [सं.] १ तुळअी. २ गर्भाशयाची आधार नलिका. ३ हट्ट.

धरना—क्रि. स. [सं.] १ धरणें; पकडणें. २ थांबविणें. ३ ठेवणें (रखेली). ४ गहाण ठेवणें. ५ अनामत ठेवणें. ६ धारण करणें; वापरणें. ७ स्वीकारणें. **धरना**-धरणें. (मु.) **धरना देना**-धरणें धरून वसणें.

धरसना—क्रि. अ. [सं.] घाबरणें; भिणें; भयभीत होणें. क्रि. स. १ अपमान करणें. २ दाबून टाकणें.

धरहरा—पु. [सं.] मनोरा.

धराअू—वि.[सं.]१ बहुमोल. २ पुष्कळ दिवसांचा ठेवलेला; ठेवणीचा.

धरातल—पु. [सं.] १ पृथ्वी. २ क्षेत्रफळ.

धराना—क्रि. स. [सं.] १ पकडविणें. २ निश्चित करणें; ठरविणें. ३ ठेवविणें.

धरोहर—स्त्री. [सं.] ठेव; अनामत.

धर्षण—पु. [सं.] १ अनादर; अपमान. २ आक्रमण; हल्ला. ३ असहिष्णुता. ४ दमन.

धस—पु. [सं.] बुंडी; डुबकी.

धसक—स्त्री. [अनु.] ढास; कोरडा खोकला.

धसकना—क्रि. अ. [सं.] १ रुतणें. २ द्वेष करणें; मत्सर करणें. ३ भिणें.

धसना*—क्रि. अ. [सं.] ध्वस्त होणें; नष्ट होणें. [घुसडणें.

धसाना—क्रि. स. [सं.] खुपसणें;

धाँधना—क्रि. स. [दे.] १ बंद करणें. २ आधाशीपणानें खाणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धाँधल-ली—स्त्री. [अनु.]१धांदल; गडबड. २ कपट; फसवेगिरी. **धाँधली**-वि. १ गडबड्या; धांदरट. २ लुच्च्या; फसव्या.

धाक—स्त्री. [अनु.] १ भय; भीति. २ प्रसिद्धि. ३ प्रभाव. (मु.) **धाक बाँधना**-वर्चस्व बसविणें.

धाड़ना—क्रि. अ. [दे.] रागावणें; क्रोध करणें.

धाता*—पु. [सं.] १ ब्रह्मदेव. २ शिव. वि. पालक; रक्षक.

धात्री*—स्त्री. [सं.] १ आजी; माता. २ दाआी. ३ पृथ्वी.

धाधि—स्त्री. [सं.] ज्वाळा.

धान—पु. [सं.] साळी; भात.

धानपान—वि. [सं.] सडपातळ; नाजूक.

धाना*—क्रि. अ. [सं.] १ धावणें; पळणें. २ प्रयत्न करणें.

धानी—स्त्री. [सं.] १ साळीच्या पानांच्या रंगासारखा रंग; फिकट हिरवा रंग. २ स्थान.

धानी—स्त्री. [सं.] भाजलेले गहू किंवा जोंधळे.

धाप—पु. [सं.] १ अेक मैल किंवा दोन मैलांचें अंतर. २ लांब रुंद मैदान. ३ शेताच्या मोजणीचें माप.

धापना*—क्रि. अ. [सं.] १ संतुष्ट होणें; तृप्त होणें. क्रि. स. संतुष्ट करणें. **धाप**-संतोष; तृप्ति.

धापना—क्रि. अ. [सं.] धावणें; पळणें.

धा-भाअी—पु. [सं.] दूधभाअू.

धायँ—स्त्री. [अनु.] तोफेचा किंवा बंदुकीचा आवाज; धाम असा आवाज.

धाय—स्त्री. [सं.] दाअी; धात्री.

धार—पु. [सं.] १ पावसाची जोराची वृष्टि. २ ऋण; कर्ज. ३प्रांत; विभाग; प्रदेश.

धार—स्त्री. [सं.] १ धारा; प्रवाह. २ शस्त्राची धार. ३ किनारा. ४ सेना. ५ दिशा; बाजू. (मु.) **धार निकालना**-दूध काढणें.

धारक—वि. [सं.] १ धारण करणारा. २ ऋणको; कर्ज काढणारा.

धारना*—क्रि. स. [सं.] १ धारण करणें. २ जबाबदारी पत्करणें. ३ऋण करणें; अुधार घेणें.

धारा—स्त्री. [सं.] १ पाण्याचा प्रवाह. २ पावसाची सर. ३ समूह; झुंड. ४ रेघ; रेषा. ५ कायद्याचें कलम.

धारावाही—वि. [सं.] प्रवाही.

धारासभा—स्त्री. [सं.] विधिमंडळ; लोकप्रतिनिधी सभा.

धारि*—स्त्री. [सं.] १ अखंड प्रवाह. २ समूह; झुंड. ३ सेना.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धारीदार—वि. [सं. + फा.] रेघारेंघाचें कापड; धारीदार कापड.

धावना*—क्रि. अ. [सं.] धावणें; पळणें. धावनि–हल्ला; चढाओ.

धावरी*—स्त्री. [सं.] पांढऱ्या रंगाची गाय. वि. शुभ्र; स्वच्छ.

धावा—पु. [सं.] १ हल्ला; चढाओ. २ दौड.

धिंग—स्त्री. [सं.] दंगामस्ती; धिंगाणा. धिंगाओ–स्त्री. दांडगाओ; मस्ती.

धिंगा—पु. [सं.] निर्लज्ज.

धिंगाना—क्रि. स. [सं.] धिंगाणा घालणें; खोड्या करणें.

धिक्, धिग*—अव्य. [सं.] तिरस्कारसूचक शब्द; धिक्; छीः.

धिय, धीया—स्त्री. [सं.] कन्या; मुलगी.

धिरवना*, धिराना*—क्रि. स. [सं.] धमकाविणें; दरडावणें.

धींग—पु. [सं.] धट्टाकट्टा; मजबूत. वि. १ धट्टाकट्टा. २ पापी.

धींगड़-ड़ा, धींगरा, धींगा—पु. [सं.] १ पाजी; बदमाश. २ धट्टाकट्टा; आडदांड.

धींगाधींगी—स्त्री. [सं.] १ धांगडधिंगा; अपद्रव. २ जबरदस्ती.

धी—स्त्री. [सं.] १ बुद्धि; अक्कल. २ मन. ३ कर्म.

धी—स्त्री. [सं.] कन्या; मुलगी.

धीजना—क्रि. स. [सं.] १ ग्रहण करणें; स्वीकाणें; अंगीकारणें. २ धीर धरणें. ३ प्रसन्न होणें.

धीम-मा—वि. [सं.] १ शांत. २ धीमा; मंद; ३ नरम; सहनशील.

धीरज*—पु. [सं.] धैर्य; धीर.

धीरता—स्त्री. [सं.] १ धीर वृति; धैर्य. २ संतोष; समाधान. ३ मनाची खंबीरता.

